छात्र

प्रबोधन

वर्ष ३, अंक ९
सौर चैत्र, शके १९१७



वासंतिक विशेषांक

ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे अभिनव मासिक!

॥ सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमत्त्व येथे ॥

छात्र प्रबोधन ...निव्वळ मासिक नव्हे!.. कृतिशील उपक्रमांचा स्रोत!!
महाराष्ट्रात एकाच वेळी १५ शिबिरे !

मुलांसाठी : सांगली, सातारा, कोल्हापूर, धुळे, नाशिक, ठाणे, रत्नागिरी, लातूर, परभणी.
मुलींसाठी : सांगली, सातारा, धुळे, नाशिक, ठाणे, लातूर.

व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या शिबिरांमध्ये सहभागी व्हा !



कालावधी : १ ते ७ जून १९९५. वेळ : रोज सकाळी १०.३० ते संध्याकाळी ६.३०
शुल्क : रु. ५०/- (समासदांसाठी रु.४०/-) वयोगट : इ. ५ वी ते ९ वी.

शिबिरस्थान, नावनोंदणी व अन्य तपशीलांसाठी छात्र प्रबोधनच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधावा. (पत्ते पान ९६ वर पाहावेत.)

शिबिराचे शुल्क भरून लवकरात लवकर आपले नाव निश्चित करा
आपल्या मित्रमैत्रिणींनाही शिबिरात सामील करून घ्या !

आठवण इतर शिबिरांची

N.T.S. मार्गदर्शन - १६ ते २४ मे, शुल्क रू. २५०/-, पुण्यात निवासाची व्यवस्था करणे शक्य नसल्यास निवास भोजन शुल्क रू. २००/- जास्तीचे भरावे लागतील.

नेतृत्व शिबिर - २५ मे ते ३१ मे, शुल्क रू. २००/-, निवड झाल्यास १ ते ७ जून शिबिरे घेण्यासाठी पुण्याबाहेर पाठविणार. (शिबिरांच्या अधिक तपशिलासाठी यंदाचा अंक ७ पाहावा)

ॐ

छात्र प्रबोधन

वर्ष ३. अंक ९
सौर चैत्र, शके १९१७
वासंतिक विशेषांक

इवली शल्ये रुपती खुपती, मात करु दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी, ने ज्योतिर्जगतात।

संपादक, प्रकाशक
महेन्द्र सेठिया

संपादक मंडळ
महेन्द्र सेठिया B. E. M. Ed.
विवेक पोंक्षे M. SC. B. Ed.
अनघा लवळेकर M. A. B. Ed.
शैलजा देशमुख M. A., m. Ed.

मुखपृष्ठ व आतील चित्रे
देविदास पेशवे, पुणे

मुखपृष्ठ पारदर्शिका
मिलिंद ढेरे

अक्षर जुळवणी
XLNC GRAFIKS
कर्वे रोड, पुणे.

संपर्क
'छात्र प्रबोधन'
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०
☎ ४७७६९१

मुद्रक
प्रबोध संपदा, पुणे - २
वार्षिक वर्गणी
रु. ७५/-
नोंदणी क्रमांक
PHM/153/VIII

या अंकात दडलंय काय ?

संवाद २
कथा--कुणी दत्तक घेता का? ३
विज्ञानाच्या चष्म्यातून - सुरेल खेळणे ९
कविता पानोपानी १२
बुद्धीच्या प्रांगणात निर्णय क्षमता विकास १३
तुम्हीच संपादक व्हा ! -निर्णय १८
कात्रण एक संदर्भ सृष्टी २३
असे हे गणित.. असे हे गणिती २७
वाचलेच पाहिजे असे काही-मृत्युंजय २९
भटकायला चला ! ३१
स्पर्धा परीक्षांची तयारी-राष्ट्रीय रक्षा प्रबोधिनी ३५
खग्रास सूर्यग्रहण ४१
माकडं मजुरी करतात तेव्हा ! ४५
चित्रकथा -दिसतं तसं नसतं ४८
गंध मोहवी काव्याचा..कवी कुसुमाग्रज ५५
भारतीय सौर कालगणना ६१
गिर्यारोहण गाथा - आयगर स्वप्नपर्वत ६५
कल्पक बनू या - स्मरणाची भटकंती ७१
कथा - गुप्तधन - भाग २ ..... ८१
करून तर पाहा - सदाबहार गुलाब ८७
आभाळ मुठीत आलंसं वाटतं तेव्हा ! ९१
खुलासा व आवाहन ९५
स्थानिक कार्यालयांचे पत्ते ९६

संवाद

प्रिय प्रबोधक मित्र-मैत्रिणींनो,

सुट्टीच्या प्रारंभी छात्र प्रबोधनचा वासंतिक विशेषांक तुमच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. नेहमीप्रमाणेच ज्ञान- मनोरंजन, कृती, विचार इ.नी नटलेला हा अंक तुम्हालाही आवडेल असा विश्वास वाटतो. मासिकातील गोष्टी तर तुम्ही जरूर वाचाव्यातच, पण त्याचबरोबर काही विचार करायला लावणारे लेखही तुम्ही वाचायला हवेत. त्यातून स्वत:चे विचार, स्वत:ची मते स्वतंत्रपणे मांडायला तुम्ही शिकावं हीच अपेक्षा !

शालेय अभ्यास व परीक्षा यामुळे कदाचित आधीच्या अंकांमधील काही लेख वाचायचे, तर काही लेखांमध्ये सुचविलेली कृती, प्रयोग करण्याचे राहून गेले असेल. सुट्टीमध्ये ती सर्व मासिके पुन्हा एकदा वाचून त्याप्रमाणे कृती करण्याचा प्रयत्न केला तर, सुट्टी मजेत जाईलच, शिवाय काही नवीन केल्याचा अनुभवही मिळेल.

जूनमध्ये जेथे जेथे व्यक्तिविकास शिबिरे होणार आहेत त्या सर्व ठिकाणी १५ ते २५ एप्रिल दरम्यान सभासदांचे मेळावे होतील. त्या त्या ठिकाणच्या तारखा तुम्हाला शाळेतून कळल्या असतीलच. या मेळाव्यामध्ये आवर्जून सहभागी व्हा. जूनमधील शिबिरांच्या नावनोंदणीसाठी व त्याच्या पूर्वतयारीसाठी जास्तीत जास्त जणांनी कामे वाटून घेऊन ती पूर्ण करा. छोटे छोटे गट तयार करून आपापल्या गावांमध्ये लहान मोठे कार्यक्रम करा. जवळपासच्या ठिकाणांना अभ्यासपूर्ण भेटी देणे, काही व्यक्तींच्या मुलाखती घेऊन त्यांनी यश कसे मिळविले याबाबत चर्चा करणे, आसपासच्या खेड्यांमध्ये जाऊन तेथील मुलामुलींशी गप्पागोष्टी करणे, त्यांच्याबरोबर खेळणे, त्यांना मासिकातील छान छान गोष्टी वाचून दाखवणे असे कितीतरी उपक्रम गटांनी मिळून करता येतील. धडपडणारे प्रबोधक होण्यासाठी या सुट्टीचा छान उपयोग तुम्ही कराल अशी आशा आहे. तुमची अशाप्रकारची धडपड आमच्यापर्यंतही जरूर पोहोचवा.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपण स्वकीय लिपीत स्वाक्षरी करण्याचा संकल्प केला. त्यातून आपण आपले भारतीयत्व प्रकट करण्याचा प्रयत्न केला. अजून अशा अनेक गोष्टी आहेत की ज्यातून आपण आपले भारतीयत्व प्रकट करू शकू. भारतीय सौर कालगणनेचा वापरही त्यातीलच एक. यासंदर्भात स्वतंत्र लेख अंकात वाचालच. आपले मासिक व मासिकाशी निगडित पत्रव्यवहार आपण भारतीय सौर कालगणनेप्रमाणे करतो हे एव्हाना तुमच्या लक्षात आले असेलच. शास्त्रशुद्ध पायावर आधारलेली ही कालगणना तुमच्यापैकी अनेकांनी वापरण्यास प्रारंभ करावा. ही अपेक्षा.

वार्षिक परीक्षेत व वर्षभरात अन्य क्षेत्रात (क्रीडा, वक्तृत्व, नाट्य, संगीत, लेखन, चित्रकला इ.) काही विशेष यश तुमच्यापैकी कोणी मिळविले असेल, तर जरूर आम्हाला कळवा. आम्हालाही त्याचा निश्चितच आनंद होईल.

सस्नेही तुमचा

सुट्टी आनंददायी, उत्साहवर्धक अन् अनुभवांची शिदोरी मिळवून देणारी व्हावी यासाठी खूप शुभेच्छा.

समक्ष भेटूयात, विविध शिबिरांच्या निमित्ताने !

(महेन्द्र सेठिया)

कुणी दत्तक घेता का ?

– आशा भाजेकर

निखिलला सुट्टी लागल्याबरोबर तो इंडियात आला. तसं ठरलंच होतं मुळी. निखिलच्या आजोबांचं पत्र आलं होतं. त्यांना निखिलला बघावंसं वाटत होतं. शिवाय त्यांच्या वयाला पंच्याहत्तर वर्ष पूर्ण झाली म्हणून समारंभ होता.

त्यासाठी दादाआजोबांनी सगळ्यांना बोलावलं होतं. पण पपांना कामासाठी इंडोनेशियाला जायचं होते आणि आईचा सेमिनार होता. तेव्हा दोघांचा प्रतिनिधी म्हणून निखिलला पाठवायचं ठरलं.

निखिलला खूप आनंद झाला. मागे तो इंडियात आला तेव्हा पाच वर्षांचा होता. निखिलला ते घर आणि दादाआजोबा, नानीआजी खूप आवडली होती. इथे परदेशात खूप सुखसोयी होत्या, खेळायला खूप खेळणी होती, मुलांना स्वतंत्र खोल्या होत्या.पण निखिलला आठवत होतं, तेव्हा आपण आजीच्या कुशीत झोपल्याचं. इथे ममी पपांना 'गुडनाईट' म्हणायचं आणि आपल्या खोलीत एकटंच झोपायचं. सोबतीला असायचा फक्त टेडी बेअर!(अस्वल) भीती वाटली की त्यालाच घट्ट मिठी मारायची, त्याच्या केसाळ छातीत तोंड लपवायचं. इंडियात आजीचा हात अंगावर असायचा. मग मुळीच भीती वाटायची नाही. संध्याकाळी झोपाळ्यावर बसून दादाआजोबा रामायण महाभारतातल्या गोष्टी सांगायचे आणि आजीजवळ तर गोष्टींचा प्रचंड साठा होता. आजी रोज नवी गोष्ट सांगायची.

आता तो मोठा झाला होता, तरी इंडियात गेलं की आजीकडून रोज एक गोष्ट ऐकायची आणि आजोबांबरोबर पहाटे उठून टेकडीवर फिरायला जायचं त्यानं ठरवून टाकलं होतं.

बऱ्याच वर्षांनी नातू येणार म्हणून आजीआजोबांनाही खूप आनंद झाला. आजोबा आणि मामा त्याला घ्यायला मुंबईच्या विमानतळावर आले होते आणि तिथून टॅक्सी करून थेट घरी आले.

'किती उंच झालास रे सोन्या'

त्याच्यावरून तुकडा उतरून टाकत आजी म्हणाली आणि तिने त्याला मिठीत घेतलं.

'अग मोठा नाही का झाला तो?

'तुम्हाला असेल! मला अजून तो लहानच आहे. चल आत देवाच्या पाया पड'.

आजीने त्याला कवेत घेऊनच आत नेलं.

आल्या आल्या आणलेल्या वस्तू सगळ्यांना देण्यात आणि तिकडच्या घरच्या बातम्या सांगण्यात दोन दिवस गेले.

रात्री निजताना निखिल आजोबांना म्हणाला, 'आजोबा उद्या सकाळी मी पण तुमच्या बरोबर टेकडीवर फिरायला येणार हं. मला लवकर उठवा.'

'निखिल, मला आता टेकडी चढायची बंदी आहे.'

'का ?'

'अरे, म्हातारा झालो ना ?'

'छट्, तुम्ही कसले म्हातारे! आमच्याकडे नव्वदीची माणसंसुद्धा सकाळी तुरुतुरु फिरायला जातात, व्यायाम करतात.'

'मी सुद्धा करतो रे व्यायाम पण ऊन आल्यावर. थंडी खूप आहे ना सध्या? तू सुद्धा थंडीचा उठू नको लवकर.'

'हट्, ही कसली थंडी! आमच्याकडे मायनस वीस टेंपरेचर जातं, तरी आम्ही सकाळी शाळेत जातो.'

'निखिल, आजोबांना थंडीचं बाहेर न्यायचं नाही. तुला जायचं असेल तर दीपकला घेऊन जा.' आजी आतून ओरडली.

'ऐकलंस ना निखिल, हर हायनेसचा हुकूम झाला आहे. आता अपील नाही रे बाबा.'

....सकाळी उजाडायच्या आत निखिल आणि दीपक टेकडीवर निघाले. दोघे सारख्याच वयाचे असल्याने गप्पा रंगल्या. टेकडीवर कधी पोचलो ते त्यांना कळलंच नाही. टेकडीवरनं सूर्योदय खूप छान दिसत होता.

'किती भाग्यवान आहात रे तुम्ही! रोज सूर्यदर्शन घडतं इथं.'

'अरे बाबा जे तिथं आहे ते इथं नाही. तुमच्याकडे बर्फ पडताना किती छान दिसतं! दूरदर्शनवर पाहतो ना आम्ही. इथं कधी गारांचा पाऊस पडला तर तोच आमचा बर्फ.'

बोलत बोलत दोघं टेकडी उतरले.आता उजाडलं होतं. रस्त्यावर रहदारी सुरू झाली. रिक्षाचे, बसचे आवाज कानावर येत असतानाच ठिकठिकाणच्या कचराकुंड्या ओलांडत ते चालले होते. निखिलला ही घाण नवी होती. त्याच्या गावात रस्त्यावर कागदाचा एक कपटाही दिसायचा नाही. थुंकणं नाही, शिंकरणं नाही...सगळं कसं स्वच्छ स्वच्छ.

'निखिल, काल तुला इथली देवळं दाखवली. गणपतीचं, मारुतीचं, रामाचं. इथं गल्लोगल्ली देवळं आहेत.'

'सकाळी रामाच्या देवळातली घंटा ऐकताना किती छान वाटत होतं. काकड आरती का काय म्हणतात ना त्याला. ममा सांगते की ती तिच्या लहानपणी नेहमी काकड आरतीला देवळात जायची.'

'अरे, आता आम्ही कुणीच काकड आरतीला जात नाही. वेळ कुणाला असतो इथं. आज मी तुला इथलं जॉगिंग पार्क दाखवतो.'

संध्याकाळी दोघं नव्यानेच सुरू झालेल्या जॉगिंग पार्कपाशी आले. आत सुंदर हिरवीगार झाडं लावलेली होती. अशोक, निलगिरी, साग...फुलांचे छान ताटवे होते...

पण पार्कच्या फाटकाजवळ एक कचराकुंडी होती. लोकांनी कचरा त्या कुंडीत न टाकता बाहेरच टाकला होता. सडलेलं अन्न, नासकी फळं, कागदाचे, कापसाचे बोळे, प्लास्टिकच्या पिशव्या, काचा, गंजलेल्या तारा...

काय नव्हतं त्यात! सगळा कचरा कुंडीबाहेर पडला होता. डुकरं, कुत्री तो उचलत होती. विलक्षण दुर्गंधी सुटली होती. लोक नाकाला रुमाल लावून तिथनं जात होते. कचरा उचलत नाही म्हणून प्रशासनाला शिव्या घालत होते. पण आपल्या हातातला कचरा मात्र तिथंच टाकत होते.

ते सगळं पाहून निखिल म्हणाला,

'काय रे ही घाण इथं?'

'हो ना म्युनिसिपालटी उचलतच नाही. बाबा म्हणतात माणसं आजकाल कामचोर झाली आहेत' बोलता बोलता दीपकनं हातातला कचरा दुरून फेकला तोही, त्याच

कचऱ्यात जाऊन पडला.

'काय फेकलंस रे?'

'अरे, आईनं कचरा टाकायला दिला होता.'

'छान, दीपक तूही कामचोरच आहेस.'

'निखिल,' दीपकचा आवाज किंचित चढला.

'रागावू नकोस दीपक, पण तू कचरा कुंडीत का नाही टाकलास?'

'किती घाण आहे तिथं, कोण जाईल त्या घाणीत ?'

'असंच प्रत्येकानं म्हटलं, तर रस्त्यावर कचऱ्याचे ढीग साठणारच.'

'पण मी कुंडीत टाकला तरी बाकीचे बाहेर टाकणारच. माझा काय येवढासा कचरा.'

'प्रत्येकाचा येवढासाच असतो पण सगळ्यांचा मिळून केवढा ढीग होतो. इतकं सुंदर गाव आहे पण ही घाण.. छे, काही तरी केलंच पाहिजे.'

'आपण काय करणार? फार तर बाबांना सांगू या, म्हणजे ते कुलकर्णी काकांना सांगतील कॉर्पोरेशनमध्ये कळवायला. त्यांची ओळख आहे. त्यांनी फोन केला की दोन दिवसात गाडी येते.'

'हे म्हणजे चाकराला पडचाकर असं आजी म्हणते तसंझालं.नेहमीच सगळ्याच कामाच्या बाबतीत आपण दुसऱ्यावर अवलंबून..तसं नको, आपणच काहीतरी करू या.'

'काय करायचं?'

'दीपक, ती कुंडी बघ कशी आ वासून आपल्याकडे बघते आहे. म्हणते आहे,

'मला कुणी दत्तक घेता का? कुणी पालक आहे का मला? दीपक, आपण ही कचराकुंडी दत्तक घेऊया.'

'काय म्हणालास?'

'तू ऐकलंस तेच. मागे तुमच्या महाराष्ट्रात भूकंप झाला होता, तेंव्हा लोकांनी गावं दत्तक घेतली असं मी ऐकलं होतं. आपण ही कुंडी दत्तक घेऊन तिचं पुनर्वसन करू या.'

'म्हणजे काय करायचं?'

'सांगतो, हे बघ या गल्लीत मुलं किती आहेत?'

'आपल्या वयाची सात आठ असतील. भूषण, देवेन, पक्या, सुऱ्या, नाऱ्या...'

'मग त्या साऱ्यांना बोलाव.'

'आत्ता आणतो... तू इथंच थांब.' दीपक धावत गेला.

दीपकचा भाऊ परदेशातून आल्याचं सगळ्यांनाच समजलं होतं. त्यानं बोलावलं आहे म्हटल्यावर सगळे हजर झाले.

'ए निखिल, आम्हाला तिथल्या गमतीजमती सांग ना.'

'तू टेनिस खेळतोस का रे?'

'हो खेळतो. मित्रांनो, माझ्या डोक्यात एक आयडिया आहे.'

'काही नवा खेळ आहे?'

'तिकडे गोल लाकडी बॅटीने चेंडू उडवतात तो कुठला खेळ रे?'

'निखिल आम्हाला रग्बी शिकवशील?'

'गप रे, तुम्हाला खेळाशिवाय काही सुचतंय् का,' प्रकाश म्हणाला.

'दोस्त, कुठे पिकनिकला जायचंय?'

'जाऊया', निखिल म्हणाला. लगेच मुलांनी गिल्ला केला.' हुर्रेऽऽ मग -- कुठं जायचं?'

'थांबा, आधी एक काम करायचं.'

'काय?'

'दोस्त, तुम्ही या कॉलनीत राहता. ही वसाहत किती सुंदर आहे. छोटे छोटे बंगले, हिरवीगार झाडी पण हे काय इथं? ही कचराकुंडी पाहिलीत?हा बाहेर पडलेला केर.'

'शीऽ तिला काय पहायचं ? रोजच जातायेता नाकाला रुमाल लावून आम्ही इथनं जातो.' भूषण म्हणाला.

'पण कधी असं मनात येत नाही का, की अरे आपण किती घाणीतून जातोय. त्यातले किती रोगजंतू, दूषित हवा आपल्या शरीरात जाते आहे. अरे आरोग्यशास्त्र शिकता ना?'

'निखिल, मला तर रोज वाटतं. माझे वडील डॉक्टर आहेत. ते म्हणतात ह्या घाणीमुळेच रोगराई पसरते.'

'पण कचराकुंडी ही कचऱ्यासाठीच असते ना?'

'हो, पण केतन, कचरा कचराकुंडीत आहेच कुठं? तो तर रस्त्यावर पसरला आहे आणि कचराकुंडी आ वासून सांगते आहे, 'अरे कचरा माझ्या पोटात टाका, बाहेर टाकू नका.'

'पण सगळेजण कचरा बाहेरच टाकतात.'

'तेच तर आपल्याला थांबवायचं आहे.'

'पण कसं?'

'ही कचराकुंडी दत्तक घेऊन'

'काय?' सगळेच ओरडले ' शीऽऽ घाण!'

'शीऽ काय तुमच्यापैकी प्रत्येकाचा कचरा या घाणीत आहे. आहे ना?'

'हो पण--- दत्तक घ्यायची म्हणजे काय करायचं?'

'तिच्या भोवतालची सगळी घाण उचलून कुंडीत टाकायची.'

'असले घाणेरडे काम आम्ही नाही करणार!'

'पण घाण करणार असंच ना? अरे आपल्या राष्ट्रपिता गांधींनी काय सांगितलंय? ते विसरलात? ते स्वत: झाडू

घेऊन रस्त्यावरची घाण साफ करत असत. पुस्तकात वाचता ते काय फक्त पेपरमध्ये उत्तर लिहिण्यासाठी?' त्याचं बोलणं ऐकत येवढा वेळ तिथेच उभ्या असलेल्या दादाआजोबांनी विचारलं, 'अरे हा मुलगा परदेशात राहतो, चिमूटभर घाण कधी त्याला माहिती नाही. तरी तो आपला देश, आपलं गाव, आपला परिसर स्वच्छ करण्यासाठी पुढे आला आहे आणि तुम्ही?'

'आजोबा, तुम्ही कधी आलात?'

'मघाशीच. पोरा, तुझे विचार खरंच चांगले आहेत. कुणी आलं नाही तरी मी उद्या तुझ्याबरोबर सफाईला येईन. आम्हा मोठ्यांना सुचलं नाही ते तुझ्या मनात आलं – मला तुझा अभिमान वाटतो.'

'पण समजा आपण ही जागा स्वच्छ केली, तरी पुन्हा लोक घाण टाकणारच. कॉर्पोरेशनची गाडी येऊन गेली तरी संध्या-काळपर्यंत पुन्हा कचरा साठतो बाहेर.'

'त्यासाठी माझ्या डोक्यात एक कल्पना आहे. आपण कचरा साफ केल्यावर ह्या कुंडीच्या भोवती सुंदर छोटी छोटी झाडं लावू. कुंडीभोवतालचा परिसर हिरवागार करू. कुंडीकडे जाण्यासाठी मधे थोडी वाट ठेवू. 'कचरा कुंडीतच टाका' अशा पाट्या लावू आणि प्रत्येकाने आपल्या घराच्या आणि आजूबाजूच्या लोकांना सांगायचं, तुम्ही कचरा टाकलात तर आम्ही उचलू. आपल्या मुलांनी घाणीत हात घातलेला कुठल्या पालकाला आवडेल!'

'किती समजूतदारपणे मोठ्या माणसासारखं बोलतो आहेस रे पोरा.'

हो-ना करता मुलं तयार झाली. घराघरात ही बातमी गेली. रात्री जेवणाच्या टेबलावर प्रत्येक घरी हीच चर्चा. रातोरात कुलकर्णीकाकांनी कळ फिरवली आणि दिवस उजाडताच गाडी बोलावून सगळा कचरा साफ करून नेला.

लगेच मुलांनी कुदळी फावड्यांनी कुंडीभोवतालची जमीन खणून काढली. बंगल्याबंगल्यातून झाडं आणून लावली.पाणी घालण्याच्या पाळ्या ठरवून घेतल्या. तसेच कुंडीबाहेर कुणी कचरा टाकत नाही ना यावरही लक्ष ठेवले. कुणी टाकला तरी मुलं लगेच तो उचलून आत टाकीत. लोकांची सवय मोडण्यासाठी कचरा टाकणाऱ्यांना दंड ठेवला. मुलांनी मनावर घेतल्यावर मोठ्यांनीही तोंडात बोट घालावे अशा वेगाने कामे झाली. कुंडीभोवतालचा परिसर स्वच्छ झाला. लोकांना कुंडीतच कचरा टाकण्याची सवय लागली. त्यामुळे उंदीर, डुकरे, कुत्री यांचा त्रास कमी झाला. सुट्टी संपवून निखिल परत निघाला. त्याचा सत्कार झाला.

जाताना वाटेत पुन्हा अनेक कचराकुंड्या लागल्या – अस्वच्छ, रस्त्यापर्यंत केर पसरलेल्या. त्यांच्याकडे पहात निखिल म्हणाला, ' दादाआजोबा एक कचराकुंडी आपण दत्तक घेऊन साफ केली पण या असंख्य कचराकुंड्या आ वासून विचारताहेत,

'मला कुणी दत्तक घेता कां?'

विज्ञानाच्या चष्म्यातून

सुरेल खेळणे

विद्यार्थी मित्रांनो, एखादे शास्त्रीय उपकरण किंवा शास्त्रीय तत्त्वावर आधारित खेळणे तयार करायचे तर त्यासाठी बऱ्याच वस्तू विकत घ्याव्या लागतात हा तुमचा अनुभव असेल. पण आज तुम्ही असे एक खेळणे बनवणार आहात की ज्यासाठी कुठलीही विशेष वस्तू खरेदी करायला लागणार नाही. आपल्यापैकी ज्यांनी 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक वाचले असेल त्यांना आठवत असेल की, कचऱ्यातील डबे-बाटल्यातून कार्व्हरने टस्कगीच्या शाळेत प्रयोगशाळा उभी केली. आपणही तसेच वाया गेलेल्या वस्तूंतून एक सुरेल खेळणे बनवू या.

साहित्य : फिल्म - रोलची रिकामी डबी (तत्सम कोणतीही डबी), जुने स्केच-पेन,

वापरलेली जुनी रिफिल, एक फुगा, कात्री, कंपास, गोंद.



कृती : १) प्रथम प्लॅस्टिकच्या डबीच्या झाकणाच्या मधोमध आकृतीत दिल्याप्रमाणे एक मोठे भोक पाडा. त्यासाठी टोकदार सुरी, कात्री याचा वापर करा किंवा मोठ्या सुईचे टोक मेणबत्तीवर गरम करून भोक पाडा. आकार कसाही

असला तरी चालेल.

२) बाटलीच्या तळाला साधारण मध्यावर स्केचपेन आत घुसेल इतकेच मोठे भोक वरीलप्रमाणे पाडा. स्केचपेन आणि बाटली यातून हवा बाहेर जाता कामा नये याची खबरदारी घ्या.

३) स्केचपेनवरील निमुळते टोक कापा. कापलेल्या भागापासून सुमारे १ सें.मी. व ३सें. मी. अंतरावर छोटी भोके पाडा. (बासरीप्रमाणे)

४) बाटलीच्या पृष्ठभागावर पेनची रिफिल आत जाईल इतके छोटे भोक वरच्या तोंडापासून थोड्या अंतरावर पाडा व त्यातून रिकामी रिफिलची कापलेली नळी बसवा.

५) रबरी फुगा ताणून बाटलीच्या उघड्या तोंडावर बसवा. त्यावर तो पडदा व्यवस्थित ताणलेला रहावा म्हणून झाकण लावा.

६) बाटलीच्या तळाला पाडलेल्या भोकातून स्केचपेन हळूच आत सरकवा. फुग्याला त्याचा स्पर्श व्हायला हवा.

आता गारूड्याच्या पुंगीसारखे आवाज करणारे आपले सुरेल खेळणे तयार झाले. रिफिलच्या नळीतून फुंकर मारली की छान सुरेल आवाज येईल. चांगला आवाज येईपर्यंत फुगा व स्केचपेन यांच्यातील अंतर योग्य ठेवा.

यामागील शास्त्रीय तत्त्व कोणते?

सुरुवातीला स्केचपेन फुग्याच्या ताणलेल्या पडद्याला स्पर्श करत आहे. तुम्ही नळीतून हवा फुंकली की हवेचा वेग (Velocity) वाढतो. त्यामुळे स्केचपेन व फुग्याचा पडदा यामध्ये हवेचा दाब कमी होतो. त्यामुळे फुग्याचा पडदा कंप पावतो. डबीचे कार्य हे Sound Box सारखे आहे तर स्केचपेनला पाडलेल्या भोकावर आपली बोटे ठेवून त्यांची उघडपझाप करून तुम्ही सूर काढू शकता. ज्याला सुरांची जाण आहे अशी व्यक्ती या वाद्यावर छानशी सुरावटही वाजवू शकते.

असे हे छोटेसे सुरेल खेळणे तुम्ही स्वत: बनवून आपल्या मित्रांना वाढदिवसाला भेट म्हणून देऊ शकाल.

या खेळाण्यामध्ये खालील पद्धतीने बदल करून आवाजात काय फरक पडतो हे प्रयोग करून पाहा.

१. पेनाची रिफिल व स्केचपेन यांच्या जागेची अदलाबदल केली तर काय होईल?

२. फुग्याऐवजी अजून काय काय वापरता येऊ शकेल?

३. डबीचा आकार बदलला तर आवाजात काय फरक पडेल?

४. सा-रे-ग-म ही सुरावाट येण्यासाठी स्केचपेनवर किती अंतरावर भोके पाडायला हवीत? त्यासाठी दोन भोकांमधील अंतर कोणकोणत्या गोष्टींवर अवलंबून असते?

५. डबी-रिफिल-स्केचपेन या प्लॅस्टिकपासून बनविलेल्या साहित्याऐवजी



धातूच्या त्यासारख्याच वस्तू वापरल्या तर आवाजात काही फरक पडेल का?

६. स्केचपेनच्या जागी, तसेच रिफिलच्या जागी आता आहे त्यापेक्षा लहान त्रिज्येची अथवा मोठ्या त्रिज्येची नळी वापरली तर काय फरक पडेल?

७. डबीत अर्धे पाणी भरले तर काय होईल?

प्रयोग करून पाहा. त्याचे निष्कर्ष नोंदवा

तुमच्या निरीक्षणांना व निष्कर्षांना शास्त्रीय तत्त्वांचा आधार शोधा आणि ते लिहून आमच्याकडे पाठवून द्या. या सर्वांतून अधिक सुरेल खेळणे करण्यासाठी वर दिलेल्या साहित्य वा कृतीत काय सुधारणा कराव्यात असे तुम्हाला वाटते तेही लिहून पाठवा. वर्षभरात सुचवलेले विविध प्रयोग, शास्त्रीय उपकरणे सुट्टीमध्ये करून पाहा.

(**Science Reporter** मासिकातील **Muscial Balloons** या श्री. अरविंद गुप्ता यांच्या लेखा आधारे).

कविता पानोपानी

चैत्र वैशाखी महिना

आला आल्हाददायक चैत्र वैशाखी महिना
घरी दारी वसंताच्या शुभशकुनी या खुणा

वठलेल्या तरुलता पल्लवाने बहरती
हसू लागल्या त्या पुन्हा नव्या सुमनांसंगती
छेडू लागल्या कोकिळा ललकारीतुनी धुना
घरी दारी वसंताच्या शुभशकुनी या खुणा

आला गंध, गार वारा आलापित मंद ताना
हळुवार झुळुकांनी मिळे मोद तना मना
रूंजी घालिताना कुंजी धीर नसे भृंगगणा
घरी दारी वसंताच्या शुभशकुनी या खुणा

धुंद करीत अवनी आला वासंतिक सण
सडा शिंपीत सुखाचा आले आनंदाचे घन
दिसू लागे नवलाचा नवा उत्सव नयना
घरी दारी वसंताच्या शुभशकुनी या खुणा

–गंगाधर महाम्बरे

अभिवादन

हे शिवसुंदर आद्य शुभंकर बुद्धीच्या ईश्वरा
सहस्त्र प्राणांचे अभिवादन सादर स्वीकारा ।।धृ।।

वेदांचा उद्‌गाता तूची प्रज्ञेची सावुली
स्वरवीणा झंकारत आली शब्दांची माऊली
अर्थाचे डमरू घुमवित ये तांडव ओंकारा ।।१ ।।

अगणित बाहू स्फुरण पावले तुझ्या अक्षराने
राष्ट्राच्या ओठावर लिहिले क्रांतीचे गाणे
बलिदानाचा मंत्र दिला तू तेजोमय भास्करा ।।२।।

धगधगत्या आगीत उमलते इथे चांदरात
इथेच फुटती काट्यांनाही कुसुमांचे हात
इथे वादळा मिळे किनारा नभास गाभारा ।।३ ।।

मानवतेचा घोष चालला अखंड हृदयात
ज्ञानपीठ हे सत्यशिवाचे या भूलोकात
नक्षत्रांची इथे दिवाळी तमास ना थारा ।।४ ।।

हे वाग्देवी मधुरभाषिणी शब्द पालवित ये
नादब्रम्ह तू ललकारीचा गुलाल उधळित ये
गंगेच्या तीर्थाने केला उत्सव हा साजरा ।।५ ।।

– किशोर पाठक, नाशिक



विज्ञानाच्या चष्म्यातून

निर्णयक्षमता विकास – ३

डॉ. वनिता पटवर्धन

निर्णय घेण्याचे काम आपल्याला रोजच करावे लागते. काही निर्णय चटकन घेता येतात, तर काहींना खूप वेळ लागतो. निर्णय घेण्यामागे विविध भावना असतात. समाधान, आत्मविश्वास, तर कधी भीती, ताण अशा भावना असतात. निर्णय घेणे खूपच अवघड असेल तर मनातल्या मनात संघर्षही उभा राहतो!

स्वयंनिर्णय हा अधिकार :

सगळे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य तुम्हा मुलामुलींना नसते. पालक, अध्यापक, समाज हे तुमच्यासाठी बरेच निर्णय घेऊन टाकतात. उदा. कोणत्या डॉक्टरांचे औषध आणावे, मराठी की इंग्लिश माध्यमाच्या शाळेत जावे, विषय कसा शिकवावा, वाहन रस्त्याच्या डाव्या बाजूनेच चालवावे, इत्यादी. पण तरीही कोणत्या विषयाचा अभ्यास करायचा, कसा करायचा, कोणाशी मैत्री करायची, एखाद्या कामात सहभाग घ्यायचा की नाही अशा कितीतरी गोष्टी तुमच्या तुम्हीच ठरवायच्या असतात. त्या तुम्ही ठरवता का, की इतरच कुणी ठरवते? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी 'बौद्धिक खेळियाड'मधला एक खेळ खेळू या.

जाड कागदाचा चांदणीचा आकार कापून घ्या. तळहाताएवढी चांदणी झाली तरी पुरे. त्यावर 'स्वयंनिर्णयाचा अधिकार' असे रंगीत शब्द लिहा. ही चांदणी हातात धरा. खाली दिलेल्या प्रसंगांपैकी कोणत्या प्रसंगांमध्ये स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याची संधी तुम्ही

गमावलेली आहे? एकेक प्रसंग वाचा आणि संधी गमावल्यामुळे चांदणीचा एकेक छोटा भाग फाडून फेकून द्या!

१. 'तुझ्या वाढदिवसाला कोणता खाऊ करू ते तू सांगितलेच नाहीस, मग मी शिरा केला.'

२.दूरदर्शनवर जाहिरातीमध्ये दाखवले की हाच चहा उत्तम आहे, म्हणून मी तो वापरते.

३.'मुलींनी लेझीम खेळायचं नाही'असे वडिलांनी सांगितल्यामुळे मी लेझीम खेळणे बंद केले.

४. 'काय करू ते मला कळत नाही तूच सांग ना.'

५.'खरं म्हणजे मला खेळायला जायचं होतं. पण मित्रानं ठरवलं की आपण सिनेमा पाहू या.'

६.तुम्ही अशी केशरचना केलीत तर नीटनेटके दिसाल, असे त्या मासिकात लिहिले आहे.

७. त्यांच्या सल्ल्यानुसार वागलेलेच बरे.

८.सगळेजण हसतील अशी भीती वाटते,म्हणून मी नृत्य शिकत नाही.

९.माझी मैत्रीण सहलीला जाणार असेल तर मी जाईन.

१०. शाळा बुडवून लग्नाला जाण्याची माझी मुळीच इच्छा नव्हती, पण बाळूचा आग्रह मोडवेना.

फाडता फाडता चांदणीचा किती भाग शिल्लक राहिला? निर्णयाची संधी तुम्ही घेता की गमवता? काही उदाहरणे, या विषयीची मते लिहून पाठवाल? वैयक्तिक निर्णय स्वत:च घ्यायला हवेत, हे नक्की! त्यासाठी विचार-विनिमय करावा, माहिती घ्यावी, सल्ला विचारावा, पण नंतर स्वत:च्या जबाबदारीने स्वत:च निर्णय घ्यायचा. अर्थातच हेका, हट्टीपणा किंवा अविचार न करता सारासार विचाराने हे काम करायचे.

जोखीम स्वीकारणे :

स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात अशी जोखीम असते की, 'चुकले तर काय होईल?' इतरजण हसतील, रागवतील, कमी लेखतील, नावे ठेवतील अशी भीती असते. म्हणतील की 'तरी मी सांगत होतो/होते असं करू नकोस. तेव्हा ऐकलं नाहीस,' 'शिंग फुटली आहेत ना? अगदी स्वत:च्या मनासारखं करतेस/करतोस!' स्वयंनिर्णयातली जोखीम स्वीकारायलाच हवी! एकतर निर्णय योग्य पद्धतीनेच घ्यायचा म्हणजे चुकणारच नाही, आणि जर चुकलाच, तर चूक सुधारता येत नाही का? शिवाय बऱ्याचदा एखाद्या निर्णयामध्येच फायदे-तोटे असतात, ते दोन्हीही स्वीकारावे लागतात. फायदे जास्त आणि तोटे कमी असे मात्र हवे. मनीष खूप दूर असलेल्या चित्रकलेच्या वर्गाला जायचा. जाण्या-येण्यात वेळ आणि श्रम खर्च व्हायचे. पण त्याला चित्रकलेची खूप आवड असल्याने त्याला आनंदच वाटायचा.

तुम्ही किती जोखीम घेऊन निर्णय घेता ते पाहण्यासाठी खालील प्रश्नावली सोडवा. त्यातील कृती करण्याची वेळ आली आहे अशी कल्पना करा. तुम्ही प्रत्येक कृती करण्यास कितपत तयार आहात त्यानुसार प्रत्येक कृतीला गुण द्या. अजिबात तयार नसल्यास एक गुण , अलिप्तपणे करायची

म्हणून करणार असल्यास दोन गुण आणि निश्चितपणे करणार असल्यास तीन गुण द्यायचे.

नि र्ण य क्ष म ता प्रश्नावली : जोखीम

१. नुकतेच सायकल चालवायला शिकल्यावर सायकल – स्पर्धेमध्ये भाग घेणे.

२. कुणीही ओळखीचे नाही अशा ठिकाणी एका व्याख्यानाला एकटेच जाणे.



३. मैत्रीण/मित्र रूसेल असे वाटत असतानासुद्धा तिची/त्याची चूक दाखवून देणे.

४. ही प्रश्नावली सोडवून पाठवणे.

५. शेजारच्या पाहुण्या मुला/मुलीशी इंग्लिशमध्ये संभाषण करणे.

६. एकट्याने जाऊन बँकेत खाते उघडणे.

७. लो. टिळक पुण्यतिथीनिमित्ताने शाळेत ५ मिनिटांचे भाषण करणे.

८.चुरशीच्या सामन्याच्या वेळी कर्णधारपद स्वीकारणे.

९. स्वत: लिहिलेली एखादी कविता, गोष्ट किंवा लेख नियतकालिकामध्ये प्रसिद्धीला पाठवणे.

१०. अपरिचित भाषा बोलली जाते अशा ठिकाणी सुट्टीसाठी जाणे.

११. वर्गप्रमुख होण्यासाठी नाव देणे.

१२. डोंगरांचे कडे चढून जाण्याचे प्रशिक्षण घेणे..

१३. नवीन पद्धतीचे कपडे घालण्याचा पहिला मान मिळवणे.

१४. एकट्याने जाऊन रेल्वे किंवा एस.टी.चे तिकिट काढणे.

१५.अध्यापकांच्या विचारांच्या विरोधी विचार असल्यास ते मांडणे.

सर्व कृतींना गुण देऊन झाल्यावर त्यांची बेरीज करा. तुमच्याविषयी म्हणता येईल की,

१५ ते २४ गुण मिळवणारे जोखीम घ्यायला अजिबात तयार नसतात,

२५ ते ३४ गुण मिळवणारे अलिप्तपणे जोखीम घेतात, तर

३५ ते ४५मिळवणारे बहुतेक वेळा जोखीम घेतात

ही एक चुणूक झाली. खरे म्हणजे, पुराच्या पाण्यात पोहणे, चोरांशी लढा देऊन त्यांना परतवणे, आगीत होरपळणाऱ्याचे प्राण वाचवणे अशी जोखमीची आणि धाडसी कामे कधीकधी अतिशय तत्परतेने केली जातात; तेव्हा निमिषार्धात निर्णय घेतला जातो. काही वेळा तर मागचा-पुढचा विचार न करताच हे होते!

निर्णय कसे घ्यायचे?

धीटपणाने स्वयंनिर्णयाचा अधिकार बजावायचा असे आपण ठरवले. मग हे निर्णय जास्तीत जास्त अचूक असले पाहिजेत ही आपलीच जबाबदारी आहे. त्यासाठी काय काय करायचे? निर्णय घेताना कोणकोणत्या पायऱ्या चढून जायच्या? या पायऱ्या खाली दिल्या आहेत. निर्णयाचा प्रसंग किंवा पेचप्रसंग याच्या स्वरूपानुसार या पायऱ्यांचे महत्त्व आणि त्या चढण्यासाठी लागणारा वेळ कमी जास्त होईल. कधी एखादी पायरी वगळावी लागेल. या पायऱ्या अशा आहेत.

१. स्वत:ला ओळखा.

२.निर्णयाची बाब किंवा पेचप्रसंग नेमकेपणाने मांडा.

३. संबंधित बाबी, घटना, मुद्दे इ.ची माहिती घ्या.

४. त्यानुसार पेचप्रसंग पुन्हा नेमकेपणाने सांगा.

५. अनेक पर्याय सुचवा.

६. त्यांच्या परिणामांविषयीअंदाज बांधा.

७. पर्यायांमधून निवड करा, निर्णय घ्या.

८. त्यानुसार कृती करा.

९. आपला निर्णय पडताळून पहा.

एवढ्या पायऱ्या चढणे खूप अवघड आहे, असे नाही ना वाटत? महत्त्वाच्या आणि अवघड निर्णयांबाबत या पायऱ्या चढायलाच हव्यात. एखाद्या उदाहरणाच्या आधारे या पायऱ्या समजावून घेऊ. दहावीनंतर काय करायचे याविषयी रेणुकाला ठरवायचे आहे. 'आई-वडील म्हणतील ते' 'माझ्या प्रिय मैत्रिणीने अमुक केले, म्हणून मीही तेच करणार,' किंवा 'मोठ्या बहिणीचं दहावीनंतर लग्न नाही का झालं? तसंच माझंही होईल, असे न म्हणता विचारपूर्वक तो निर्णय घ्यायचा आहे.

१) 'स्वत:ला ओळखायचे' म्हणजे आपल्याला अभ्यासात किती गोडी आहे, कोणकोणते विषय आवडतात आणि नावडतात, परीक्षेत साधारण किती मार्क पडतात, काय महत्त्वाचे आहे - ज्ञान, पैसे कमावणे, काम, वेळ घालवणे, की लग्न, याविषयीचे चित्र रेणुकाने रेखाटायचे आहे. तुम्ही म्हणाल, 'स्वत:च स्वत:ला ओळखत नाही की काय?' तर, पूर्णपणे, स्पष्टपणे आणि नि:पक्षपातीपणे ओळखत नाही. म्हणून हे करायचे, नंतर २) पेचप्रसंग नेमकेपणाने मांडायचा. रेणुकाने दहावीनंतर काय करावे ते ठरवायचे आहे. त्यासाठी ३) संबंधित गोष्टींची माहिती घ्यावी लागेल. समजा, स्वत:विषयी माहिती घेतली आणि पुढे शिक्षण घेण्याचे ठरवले. मग कोणकोणत्या शाखा, विषय, अभ्यासक्रम आहेत, त्यातील उपलब्ध कोणते आहेत, खर्च किती, स्वत:ची आवड, कल,

बुद्धिमत्ता काय आहे, याविषयीची माहिती घ्यावी लागेल. त्यासाठी अनेकांशी बोलावे लागेल.शैक्षणिक मार्गदर्शनाविषयीची पुस्तके वाचावी लागतील. तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागेल. मग ४) आणखी नेमकेपणाने पेचप्रसंग सांगायचा. उदा. रेणुकाला शास्त्र शाखेचा अभ्यास करायचा आहे पण वाणिज्य पदवीनंतर लवकर नोकरी मिळू शकेल, तर काय करावे? यानंतर ५) निर्णयाचे अनेक पर्याय नोंदवायचे. ते असे होऊ शकतील, – शास्त्र शाखेचे शिक्षण घ्यायचे आणि दुकानात हिशेब ठेवण्याचे काम करायचे. बारावीपर्यंत शास्त्र शाखेचा अभ्यासक्रम करायचा आणि नंतर पुन्हा निर्णय घ्यायचा. एका शाखेचे शिक्षण पूर्ण करून मग दुसऱ्याही शाखेचे शिक्षण घ्यायचे, इ. ६) प्रत्येक पर्यायाचे कोणकोणते परिणाम होतील याविषयी अंदाज करायचे. शास्त्र शाखेकडचे शिक्षण घेता घेता दुकानातले काम करताना वेळ अपुरा पडेल, चांगला अनुभव मिळेल, बारावीनंतर शास्त्र शाखेकडून वाणिज्यकडे गेल्यास खूप अभ्यास करावा लागेल, इ. ७) नेमका निर्णय घ्यायचा. ८) तो अंमलात आणायचा, आणि काही काळानंतर, 'आपला निर्णय योग्य होता का' ते पहायचे. निर्णयाची योग्यायोग्यता ठरवताना अनेक गोष्टी आणि खूप काळ ध्यानात घेऊन तोट्यांपेक्षा फायदे जास्त असले की आपला निर्णय योग्य होता असे म्हणावे लागेल. रेणुकाच्या जागी स्वत:ला कल्पून तुम्हीही या पायऱ्या चढून पहा!

प्रत्येकाने घेतलेले निर्णय हे वेगवेगळे असतात. कारण प्रत्येक जण वेगवेगळ्या

बाबींना महत्त्व देतो. प्रत्येकाची मूल्ये भिन्न असतात. पैसा, ज्ञान, श्रम, माणसांतील परस्परसंबंध, प्रतिष्ठा, भूतदया अशा कितीतरी मूल्यांना कमी–जास्त प्राधान्य दिले जाते आणि त्यानुसार निर्णय बदलतात!

एखाद्या निर्णयाबाबत वर उल्लेखिलेल्या नऊ पायऱ्या तुम्ही चढून जाल. त्यामुळे निर्णय कसा घ्यायचा ते तुम्हाला कळेल. यात काही अडचणी आल्या तर जरूर कळवा. तुमचे इतर विचारही कळवा. तसेच काही ठरवताना तुम्ही कशापेक्षा कशाला महत्त्व देता तेही कळवाल ना?

प्रतिभेच्या प्रांतात कुमार लेखकांचा विहार

छात्र प्रबोधन च्या वाचकांसाठी दीपावली विशेषांकात 'तुम्हीच संपादक व्हा' या नावाने एक हस्तलिखित स्पर्धा आयोजित केली होती. प्रबोधकांच्या प्रतिभेला चालना मिळावी, त्यांना लेखनासाठी उद्युक्त करावे, गटाने मिळून किमान एखादी साहित्यकृती तयार करावी व त्यानिमित्ताने मासिकाच्या संपादकीय कामाची थोडीशी तोंडओळख व्हावी हे या स्पर्धेमागचे मुख्य हेतू!

स्पर्धेसाठी १९ हस्तलिखिते आली. पुढे नमूद केलेल्या निकषांच्या आधारे हस्तलिखितांचे परीक्षण झाले.

१) हस्तलिखितातील लेखांचे वैविध्य, मांडणी, क्रम.

२) हस्तलिखितातील लेखनप्रकारांचा दर्जा, स्वत:चे लेखन व संग्रह वा अनुकरण याचे प्रमाण.

३) मुखपृष्ठ, सजावट, आतील चित्रे, हस्तलिखित ही सामूहिक कृती असल्याने समूहाचा म्हणून काही ठसा हस्तलिखितावर किती उमटलेला दिसतो?

या निकषांच्या आधारावर हस्तलिखिते तपासताना काही महत्त्वाच्या गोष्टी जाणवल्या. लेखनाच्या किंबहुना कलेच्या कुठल्याही प्रातांत मूळनिर्मिती अधिक मोलाची मानली जाते. ह्या निकषावर मात्र हस्तलिखितांमध्ये फारच कमी साहित्य आढळले स्वतंत्र, स्वत:च्या लेखनापेक्षा संग्रह (शब्दकोडी, सुविचार, विनोद, प्रयोग, सामान्यज्ञान, इ.) अधिक आढळले.

मुखपृष्ठ व आतील सजावट खूपच आनंददायी होती. केवळ मोरपिसांचा किंवा भेटकार्डाचा वापर करून तयार केलेले हुंकार व आस्वाद यांची मुखपृष्ठे नावास साजेशी, समर्थक चित्रांनी युक्त होती. त्यातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेची भरारी निश्चितच ओळखता येते.

'तेजस' मधील 'माझे आजोबा' व 'सफर नाशिकची' हे सुमंत क्षीरसागरचे लेख सरस आहेत. 'अंतरंग' मधील 'भ्रष्टाचार बॉम्बस्फोटापेक्षा भयानक' हा अभिजित वैद्यचा व 'आम्ही अबला नाही' हा प्रज्ञा देशपांडेचा लेख विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेची चुणूक दाखवतात. 'चढाओढ' मधील कु. पल्लवी सागरची कविता अनुभवातून लिहिल्याने अधिक आवडली.

'सप्तरंग' मधील 'कासवाचे घर पाठीवर' ही देवकी गोखलेची कथा, 'हुंकार' मधील 'वेळ मिळाला तर खेळ' हा पूजा किरपेकरचा लेख, 'ज्ञानांजलीमधील' कु मारभारतीच्या

आहेत. त्याचा निर्णय पुढे दिला आहे. पण त्यामुळे क्रमांक न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी हिरमुसले व्हायचे कारण नाही.

साहित्याच्या प्रातांत प्रत्येकाला स्वत:ची वाट

तुम्हीच संपादक व्हा! स्पर्धेचा निर्णय

क्रमांक / बक्षिसे	हस्तलिखिताचे नाव	शाळेचे नाव व गाव
पहिला क्रमांक विभागून	१) ज्ञानांजली	कै ग.रा.पुरोहित कन्याशाळा, सांगली
	२) सप्तरंग	रेणुकास्वरूप गर्ल्स हायस्कूल, पुणे
दुसरा क्रमांक विभागून	१) चढाओढ	श्री.केशवराज विद्यालय, लातूर
	२) अंतरंग	टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली, जि. ठाणे
तिसरा क्रमांक	-------	----------
विशेष बक्षिस	आस्वाद	बांदोडकर प्राथमिक शाळा, पुणे
उत्तेजनार्थ	हुंकार	ज्ञानप्रबोधिनी बाल विकास मंदिर, सोलापूर
उत्कृष्ट मुखपृष्ठ	गुलमोहर	बाल विद्यामंदिर हायस्कूल, परभणी
उत्कृष्ट कविता	डोंगराच्या पलीकडे	पल्लवी सगर 'चढाओढ'
उत्कृष्ट लेख	स्वयंसेवक एक अनुभव	अर्चना पाटील 'गरूडझेप'

मुखपृष्ठाचा अर्थ शोधण्याचा केलेला प्रयत्न विशेष वाटला. यापुढील काळात छात्र प्रबोधनच्या मासिकांमधून अशा वैशिष्ट्यपूर्ण साहित्यास यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल.

या निमित्ताने तुम्हा सर्वच बाल-किशोर साहित्यिकांचे अभिनंदन! तुम्हा सर्वांचीच धडपड मोठी कौतुकास्पद आहे. परीक्षक या नात्याने सर्व निकषांचा साकल्याने विचार करून आम्ही क्रमांक काढले शोधून त्या मार्गाने चालायचे असते. तुम्ही सर्वांनी अशी स्वत:ची पायवाट शोधावी त्यासाठी शुभेच्छा आहेतच. पण त्यासाठी तुम्हाला घ्यावी लागेल मेहनत! ही मेहनत म्हणजे विपूल वाचन. वाचलेल्या निवडक साहित्यातील भाषासौंदर्याने नटलेले उताराच्या उतारे- कडवीच्या कडवी स्मरणात ठेवण्याचा प्रयत्न करणे. अनेकांच्या भाषाशैलीच्या अभ्यास करणे आणि साहित्यिकांशी संवाद साधणे, त्यांची

भाषणे ऐकणे. यासाठी यावेळची उन्हाळी सुट्टी जरूर वापरा.

पाण्यात पडलं की पोहायला येतं तसं एकदा का लेखनाचा प्रयत्न सुरू केला की तुम्हाला ते नक्की जमेल आणि जमतय असं वाटायला लागं की त्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी तुम्ही नक्कीच प्रयत्न कराल. कारण लेखनशक्तीची बीजे तुमच्या लेखणीत आहेत याची साक्ष या हस्तलिखितांमधून आम्हाला पटली आहे.

तेव्हा उत्तम साहित्यिक आणि संपादक होण्यासाठी आम्हा सर्वांच्या शुभेच्छा!

सरिता पदकी **दत्ता श्री. टोळ** **प्रा. शैलजा देशमुख**

परीक्षक

स्वयंसेवक एक अनुभव

कु. अर्चना पाटील, ९वी
गरूड झेप
ग्रामीण प्रशाला माडज, ता.उमरगा

बऱ्याच दिवसांनी प्रसंग चालून आला. मोठमोठ्या नेत्यांनी जीवनभर समाजसेवाच केलेली आहे. मलाही एक नामी संधी आली समाजसेवा करण्याची.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात आमच्या ग्रामीण प्रशाला माडज येथे 'सर्व रोग निदान शिबिर', भरले आणि त्या योगाने सरांनी आम्हा चाळीस जणांची स्वयंसेवक म्हणून नियुक्ती केली. त्या दिवशीचा आनंद मी कधीही विसरू शकणार नाही....! रीतसर शिबिराचे उद्घाटन प्रमुख अतिथिंच्या उपस्थितीत झाले. अन् परिसरातील रोग्यांची तज्ज्ञांमार्फत तपासणी सुरू झाली. रोग्यांची सेवा करणे हे माझे कर्तव्य होते-परंतु त्या दिवशी रोग्यांचीच नाही तर जनतेचीही सेवा करावयास मिळाली.

खेडेगावाहून आलेल्या रोग्यांची चौकशी करून आम्ही त्यांना योग्य त्या तज्ज्ञ डॉक्टरांकडे पोहचवू लागलो. तपासणी झालेल्या रोग्यास औषध खोलीजवळ व्यवस्थित पाणी आणून देणे. इंजेक्शन खोलीतून जनरल खोलीत पाठवणे. थोड्या विश्रांती नंतर डॉक्टरांच्या परवानगीने त्यांची रवानगी करणे. या बाबी आम्ही पटापट करू लागलो. जनसेवा करण्याचा आनंद गगनात मावत नव्हता. मी व माझ्या मैत्रिणी खूपच मेहनत घेऊन कामे करत

होतो. माझ्या जीवनात प्रथमच समाजसेवा करण्याचा प्रसंग सफल झाला होता.

खरोखरच समाजसेवा करण्याचा योग मिळावा आणि आपण तो सफल करतो याचा आनंद सप्तरंगी इंद्रधनुष्यासारखा असतो. तो पुन्हा कधीच मिळत नाही. यासाठी समाजसेवा करणे हा आपला धर्म आहे. जगणं एक कला आहे. पण आपण कोणत्या स्वरूपात जगावं ते आपल्याच हातात आहे. समाजात लबाडांची, चोरांची समाजसेवा करणे म्हणजे समाजसेवा नव्हे, तर दीन-दुबळ्यांची, पांगळ्यांची, रोग्यांची सेवा हीच खरी समाजसेवा होय, ईश्वरसेवा होय आणि ती मनापासून करणारा खरा स्वयंसेवक होय.

कासवाचे घर पाठीवर

देवकी गोखले
सप्तरंग
रेणुकास्वरुप प्रशाला, पुणे

चंपक अरण्यात अनेक प्राणी आनंदाने राहात होते. एके दिवशी अरण्यात ससा, कासव, माकड, हरीण, मोर असे बरेच प्राणी एकत्र जमले होते. एका हिरव्यागार कुरणावर हे मित्र गप्पा मारण्यात दंग झाले होते. गुणांची, रूपांची तारीफ करत बसले होते.

ससा, माकड, हरीण यांची कोणाची कमी तर कोणाची जास्त तारीफ झाली. तेव्हा माकड, हरीण सगळे बिचाऱ्या कासवाच्या पाठीच्या त्या कुरूप कवचाकडे बघून हसू लागले. नाक मुरडू लागले. सगळे त्याला कुत्सितपणे हिणवू लागले.

''अरे कासवदादा, हे कसलं लोढणं पाठीवर वागवतोस रे? फार कुरूप दिसतोस बघ तू त्यामुळे.'' असा टोमणा माकडाने लगेच मारला. पण त्याच्या त्या चिडवण्याची पर्वा न करता त्यांचा टोमणा उडवून लावत कासवसाहेब उलट अभिमानाने म्हणाले,



''माझ्या पाठीवरचं कवच कुरूप दिसतं तुम्हाला. पण ते भलं दांडगं टणक आहे बरं! माझं घर पाठीवर दिसतं कुरूप, पण आहे उपयोगी खूप.'' कासवाने आपल्या कवचाचं एवढं महत्त्व सांगितलं. तरीपण त्याच्या कुरूपपणाची सर्वांनी थट्टाच उडविली.

थट्टेनं न बिचकता कासवराव शांतपणे म्हणाला, '' वर वर दिसणाऱ्या कोणाच्या बऱ्या-वाईट रूपावरनं कोणाचीच स्तुती-निंदा करणे उथळपणाचा खेळ आहे. प्रत्यक्ष अनुभवाखेरीज - ..'' पण कासवमामांचं वाक्य पूर्ण होण्याआधीच एकदम

वळवाच्या पावसाची सर कोसळली. त्याचप्रमाणे मामांखेरीज इतर सर्व प्राणी आसरा घेण्यासाठी सैरावैरा धावत सुटले. कासवाने मात्र तोंड व हात पाय आत ओढून कवचात घेतले आणि तो जागच्या जागीच स्वस्थ पडून राहिला.

वळवाचा पाऊस असल्यामुळे गारांचा वर्षाव पण झाला. आसरा मिळेपर्यंत इतर प्राण्यांना गारांचा मार पण बसला. कासवाला मात्र कशाचीच बाधा झाली नाही. गारा कवचावर आपटून उडाल्या, तर पावसाचं पाणी वाहून गेले. आणि कासव आतून कोरडे राहिले. गारांचा वर्षाव आणि पावसाची सर अचानक आली व लगेच ओसरली. मग सगळी मंडळी पुन्हा कुरणांवर येऊन बसली.

आपले दोस्त परत आलेले पाहून कासवाने तोंड आणि हात, पाय कवचातून हळूच बाहेर काढले. आणि गोड हसत त्यांच्याकडे पाहिले. प्रथम थट्टा उडवणारी तोंडे आधी शरमिंदली व नंतर कौतुकाने त्याच्याकडे पाहू लागली. ''तुझं पाठीचं कवच दिसतं कुरूप, पण आहे मात्र मोलाचं खूप.'' असे म्हणून प्राणी आपल्या घरी व कासव आपल्या छोट्या पाठीच्या घरात निघून गेले.

त्या डोंगराच्या पलीकडे....

पल्लवी सागर, ९वी
चढाओढ
श्री. केशवराज विद्यालय, लातूर

जावे वाटते एकदा त्या डोंगराच्या पलीकडे,
पाहावे वाटते एकदा त्या डोंगराच्या पलीकडे,
न जाणे काय आहे त्या डोंगराच्या पलीकडे,
जे आकर्षून घेते मला त्या डोंगराच्या पलीकडे,
कल्पना करावीशी वाटते निसर्गावर
त्या डोंगराच्या पलीकडे....
शांत, सुंदर वातावरण त्या डोंगराच्या पलीकडे,
काही फळे अन् फुले ही त्या डोंगराच्या पलीकडे,
वाटते असावे घर त्या डोंगराच्या पलीकडे,
माझे मन भटकत जाते त्या डोंगराच्या पलीकडे,
याल का तुम्ही माझ्या बरोबर....
त्या डोंगराच्या पलीकडे.....

अंड्यातील जीवास

प्रशांत देशपांडे
अंतरंग,
टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली

का बसशी अंड्यातच घुसमटुनी?
ते कवच असे थिटे, तव त्या आकांक्षा पुढे
चल उठ अन् दे ते भेदूनी।
मान्य, नसशील तू विशाल
पण का कोणी होतसे निमिषात विशाल?
मान्य, नसशील तू स्वावलंबी
पण का कोणी होत से निमिषात स्वावलंबी?
चल उठ अन् दे ते भेदूनी।
तू उठ अन् कर जरा
पायांची तडफड, पंखांची फडफड
चल उठ अन् दे ते भेदूनी
मान्य, नाही येणार तुज
लगेच चालता आणि पळता
पण प्रयत्ना का संकुचितता?
तू उठ अन् कर यत्नांची पराकाष्ठा
मग विश्वास, तू पळशील अन् उडशील
वाऱ्यास टाकूनी मागे, पण प्रयत्न हवे तुझिया संगे।
मग मारं उंच भराऱ्या, भेदून जा त्या रवी शशीला
पण प्रयत्न हवे तुझिया संगे।



कात्रण
एक संदर्भ सृष्टी

चारूता पुराणिक

प्रस्ताविक –

नवीन, रंगीत चित्रे पाहिली की, ती चित्रे खूप साठवावी, आपल्याकडे भरपूर असावीत अन् ही रंगीत सृष्टी आपल्या मित्र–मैत्रिणींना दाखवावी, असे लहान असताना प्रत्येकाला वाटत असते. मोरपिसे, तिकिटे, मणी, रंगीबेरंगी खडे यांचा संग्रहही केला जातो. कौतुकाने इतरांपुढे हा खजिना खोलला जातो. पण केवळ एवढाच संग्रह पुढेपुढे पुरेसा नसतो. त्याचबरोबर नवीन माहिती,बातम्या, जाणून घ्याव्याशा वाटतात. विविध विषय व क्षेत्रे यातील तपशील हवा असतो, त्यातून वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके वाचनात येतात. वाचलेल्या माहितीचा संदर्भ म्हणून उपयोग

करण्यासाठी वर्तमानपत्रातील कात्रणे काढून ठेवायला लागतात. दैनंदिन वृत्तपत्रे, जुनी झालेली साप्ताहिके यातून आपल्याला आवश्यक, आवडणाऱ्या कात्रणांचा संग्रह करता येईल.

कात्रणांसाठी कोणते विषय घ्यायचे? कोणत्या वर्तमानपत्रातून ही कात्रणे काढायची? त्यासाठी काय साहित्य वापरायचे? कात्रणापासून कोणता लाभ होईल? जमवलेली कात्रणे कशी लावायची? मांडणी कशी करावी? कात्रणासाठी कोणती चित्रे व माहिती यांची निवड करायची? असे प्रश्न कात्रणसंग्रह करणाऱ्या विद्यार्थ्यांना पडतील.

कात्रणाचे विषय –

कात्रणसंग्रह करताना विषयाची विविध प्रकारे निवड करता येईल. विविध विषय व क्षेत्र याप्रमाणे अनेक कात्रणसंग्रह करता येतील. सर्वसाधारणपणे दैनिक वृत्तपत्रे, त्यांच्या गुरुवार, शनिवार, रविवार पुरवण्यांमधून कात्रणे मिळवता येतील. उदा. – 'जंगलातील डायरी.' 'निसर्गदान' या सदरांमध्ये अनुक्रमे शेखर नानजकर व डॉ. प्रकाश परांजपे यांनी जंगल, पर्यावरण, पशुजीवन, वृक्षतोड व प्राणीजीवनावर त्याचा होणारा परिणाम, औषधी वनस्पती, यांची माहिती लिहिली आहे. त्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन व एकूणच पर्यावरणविषयीची त्यांची मते यांचा अभ्यास कात्रणसंग्राहकाला उपयुक्त असा आहे. तसेच पक्षी, शेती, वृक्षांची माहिती, विविध ऋतूतील निसर्गाचे रूप, आकाश निरीक्षण, पर्जन्यमान, दूषित हवामान यासारख्या कात्रणातून 'निसर्ग' या विषयाबद्दलचा कात्रण संग्रह पूर्ण करता येईल. लेखाच्या अनुषंगाने येणारी छायाचित्रे, रेखाटने संग्रहात लावता येतील. 'अपघात' हा विषय कात्रण संग्रहासाठी घेतला तर, सर्वात अधिक अपघात कुठे, का होतात, कशामुळे झाले आहेत, अपघात न होण्यासाठी घेण्याची काळजी, रहदारी, वाहने, अपघात झाल्यास त्वरित वैद्यकीय मदत कशी करावी, कुठे मिळेल याबद्दल कात्रणे गोळा करून अभ्यासता येतील.

'खेळ' या विषयावर विपुल कात्रणे संग्रहित करता येतील. त्यात खेळाडूंचे फोटो, माहिती, त्यांनी क्रीडाक्षेत्रात केलेले उच्चांक, उलाढाली, यशाची कारणे, खेळांचे प्रकार, देशी-विदेशी खेळ, खेळांचे फायदे अशी कात्रणे काढता येणे शक्य आहे.

याशिवाय उत्तम अग्रलेख, कविता, कथा, ललित लेख, विनोद, शब्दकोडी, पुस्तक परीक्षणे यांची कात्रणे जमविता येतील. 'दीपस्तंभ' या 'सकाळ' मधील सदरामध्ये प्रा. शिवाजीराव भोसले यांनी थोर व्यक्तींच्या चरित्रलेखाची मांडणी केला होती. अशा लेखांची कात्रणे वैचारिक व प्रेरणादायी असतात.

धर्म, संस्कार, संस्कृती, सत्संग, माता – पिता, स्नेही याविषयी येणारी कात्रणे जमवून वेळोवेळी त्यातील माहितीचा उपयोग करून घेता येईल. स्त्रियांचे प्रश्न, कायदे, स्त्रियांच्या केश-वेशभूषा, त्यांच्या गरजा, भूमिका, स्त्रीचे समाजात स्थान याबद्दल येणारे लेख, माहिती, कथा यांनी 'स्त्री' विषयावर कात्रण

संग्रह करता येईल.

अनेक वृत्तपत्रांतून चित्रकार, लेखक, कवी, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ यांचे समाजाला मिळालेले योगदान व त्यासाठी त्यांचे प्रयत्न, कष्ट अशा माहितीची कात्रणे अभ्यासपूर्ण असतात. विनोदी चित्रकथा, लेखमाला, प्रवासवर्णने, चित्ररेखाटनाचे नमुने, नवे शोध, प्रयोग, वैद्यकीय क्षेत्रातील घडामोडी, सामाजिक प्रश्न- अंधश्रद्धा, हुंडाबंदी, प्रौढशिक्षण, ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रश्न अशा अनेक विषयांवर सातत्याने वर्तमानपत्रातून माहिती, कथा येत असतात. तसेच 'वाचकांची पत्रे, मते' हा सुद्धा कात्रणसंग्रहाचा विषय होईल. त्यातून आपल्या अवती-भवतीच्या लोकांचे प्रश्न, अडचणी, मते त्यावरील उपाय यांचा अभ्यास होईल.

कात्रणातील विषयांची व्यापकता, क्षेत्र प्रत्येकाच्या आवडी निवडीवर, अभ्यासावर अवलंबून आहे. अशा या बहुविषयांनी युक्त कात्रण संग्रहाचे फायदे काय आहेत? त्याची उपयुक्तता किती आहे?

कात्रणाचे लाभ

वृत्तपत्र हे प्रसार माध्यम आहे. यात येणारे लेख, माहिती हे समाजाचे प्रतिबिंब प्रगट करणारे असते. वृत्तपत्रे जुन्या व नव्या विचारांचा समन्वय साधण्याची कडी असतात, त्यामुळे त्यातील कात्रणांच्या ताजेपणाचा, अद्ययावततेचा अभ्यासकाला फायदाच होतो. हे फायदे कात्रणे संग्रहित करत असतानाच संग्राहकाच्या लक्षात येत असतात. कारण कात्रणे, ही संकलन व अभ्यास असे उद्देश ठेवून करायची असतात. तपशीलवार व अद्ययावत संदर्भ समजण्यासाठी कात्रणांचा उपयोग होतो. एकाच विषयावर वेगवेगळ्या लेखकांचे लेखन असेल तर त्यातून प्रत्येकाची शैली, विचार, दृष्टिकोन समजतो. माहिती व ज्ञानात भर पडते. बुद्धीला चालना मिळते. नवे काही लिहावे, निर्माण करावे असे संग्राहकाला वाटू लागते. आपल्याला हवी असलेली कात्रणे मिळवण्यासाठी, नियमितपणे वर्तमानपत्र पाहणे, चाळणे, वाचणे, ही सवय लागते. ज्याप्रमाणे शब्दकोशात आपल्याला हवा असलेला शब्द पाहाताना आणखी चार शब्द पाहावे, तसे विशिष्ट कात्रण पाहताना, नवे कोणते सदर आले आहे, नवी काही वैशिष्ट्यपूर्ण लेखमाला चालू आहे का हे



पाहण्याकडे मनाचा कल होतो. संग्रहातून संशोधनाची वृत्ती वाढते. बारकावे समजतात, वाचनाची आवड निर्माण होते व वाचनवेगही वाढतो. स्वत:बरोबर इतरांनाही संदर्भाचा उपयोग होतो. माहिती, विनोद, शब्दकोट्या, कोडी सांगता येतात. बहुश्रुतता वाढत जाते. कात्रणसंग्रहासाठी जेवढी खोल उडी मारावी तितकी उत्तमोत्तम माहिती कात्रणसंग्राहक मिळवू शकेल व व्यासंग वाढवू शकेल. यात रिकामा वेळ कारणी लावता येतोच, त्याचबरोबर नवे शिकायला मिळते. कृती करण्याचे समाधान मिळते.

कात्रणे व कौशल्ये

संग्रह स्वत:साठी व इतरांसाठी उपयुक्त व्हावा, याकरिता कात्रणांची मांडणी व्यवस्थित करायला हवी. यासाठी सुटे जाड कागद, चित्रकलेच्या जुन्या वह्या, कॅलेंडरच्या पानांची वही करून त्यात कात्रणे, सोयीप्रमाणे डिंक, फेविकोल वापरून लावता येतील. महत्त्वाची गोष्ट म्हणजे वर्तमानपत्राचे कागद पातळ असल्यामुळे चिकटविताना, कापताना कात्रण न फाटेल याची काळजी घ्यावी लागते. महत्त्वपूर्ण कात्रणांना स्केचपेनने चौकटी आखून, दिनांक, शीर्षक, स्वमत दिल्यास दुधात साखरच! कात्रणाच्या मांडणीतून संग्राहकाची रसिकता, कलात्मकता व सौदर्यदृष्टी प्रकट व्हायला हवी. वेगवेगळ्या विषयांचे विविध कात्रणसंग्रह करता येतील. वर्गीकरण करून कात्रणे लावल्यास स्वतंत्र संदर्भ वह्या तयार होतील. 'वाहने' असा विषय घेतला तरी वाहनांचे प्रकार, त्यांची उपयुक्तता, माहिती असे भाग करून कात्रणे लावता येतील. पशू, पक्षी, घरटी, झाडे असे गट करून निसर्ग विषयक कात्रणे लावता येतील. कात्रण संग्रहाला पुठ्ठ्याचे कव्हर अथवा फाईल करून ठेवल्यास संदर्भसंग्रह व्यवस्थित राहू शकेल!

विद्यार्थी मित्रांनो, आता सुरू करणार ना कात्रण संग्रह करायला? उन्हाळ्याच्या सुट्टीतला काही वेळ यासाठी जरूर वापरा. ज्ञानप्राप्तीचे उत्तम साधन तुमचे तुम्हीच निर्माण करणार आहात आणि यातील तुमची कामगिरी छात्र प्रबोधनला कळवायची बरं

तुम्हाला माहीत आहे का? –३

५ मे पर्यंत उत्तरे पाठवा! अचूक उत्तरांना बक्षिसे!

१. अशोक चिन्हामध्ये किती आणि कोणते प्राणी आहेत?

२. औषधांच्या नावापुढे I.P. किंवा B.P. असे लिहिलेले असते त्याचा अर्थ काय?

३. सर्व घड्याळांच्या जाहिरातीत एक विशिष्ट वेळ दाखवलेली असते ती कोणती? आणि तीच वेळ का दाखवतात?

४. बृहत्रयी कोणाला म्हणतात?

५. खालील दिवसांच्या तारखा व त्यांच्याशी निगडित महत्त्वाची घटना सांगा.

जागतिक कामगार दिन, जागतिक पर्यावरण दिन, जागतिक महिला दिन, जागतिक अपंग दिन, जागतिक आरोग्य दिन.

'तुम्हाला माहीत आहे का?' २ चे उत्तर पुढील अंकात येईल.

असे हे गणित ... असे हे गणित

सिंहाचा पंजा

डॉ. जयंत नारळीकर

सुमारे तीनशे वर्षांपूर्वीची हकीकत आहे. इंग्लंडमध्ये आयझॅक न्यूटन हा प्रख्यात गणिती आणि शास्त्रज्ञ होता. त्याच्याबद्दलची ही गोष्ट.

न्यूटनने तरुणपणीच आपली हुशारी आणि कर्तबगारीच्या जोरावर केंब्रिज विद्यापीठात लुकेशियन प्राध्यापकाचे पद मिळवले. गुरुत्वाकर्षणाचा नियम, गतीचे नियम, प्रकाशाचे गुणधर्म, ध्वनिलहरींवर संशोधन इत्यादी अनेक मूलभूत शोध त्याने लावले आणि त्याच बरोबर गणिताची नवी शाखा,कलन शास्त्र, त्याने नव्याने वापरली. पण ही हकीकत आहे तो केंब्रिज विद्यापीठ सोडून लंडनमध्ये शाही टाकसाळीचा प्रमुख झाला त्यावेळची.

पुष्कळ शास्त्रज्ञ आपले विद्यापीठातले किंवा संशोधन केंद्रातले पद सोडून एखादे शासकीय पद भूषवतात तेंव्हा संशोधनाला रामराम ठोकतात. न्यूटन मात्र ह्या नियमाला अपवाद होता. एका संध्याकाळी कामावरून घरी आल्यावर त्याला कोणीतरी सांगितले...युरोपमधल्या योहान बर्नूली नावाच्या शास्त्रज्ञाने दिलेल्या गणिती आव्हानाबद्दल. बर्नूलीचे आव्हान काय होते?

तो एक गणितातला प्रश्न होता. सोबतच्या चित्रात एका भिंतीवर ठोकलेल्या A आणि B ह्या खिळ्यांना जोडणारी एक गुळगुळीत तार आहे. तारेवरून एक मणी वरून खाली येतो, आणि त्याला खाली यायला किती वेळ लागेल ते तारेच्या आकारावर अवलंबून असते. तर प्रश्न असा : मण्याला A पासून B पर्यंत यायला सर्वात कमी वेळ लागेल असा तारेचा आकार कोणता?

तुम्ही म्हणाल A आणि B ला जोडणारी सरळ रेषा हे उत्तर नव्हे काय? नाही! AB अंतर सर्वात कमी हवे असेल तर सरळ रेषा हे उत्तर बरोबर. पण आपल्याला



असा आकार शोधून काढायचाय ज्यामुळे A ते B वेळ सर्वात कमी असेल.

प्रश्न वाटतो तितका सोपा नाही. बर्नूलीचा प्रश्न सहा महिने युरोपातील गणिती सोडवायचा प्रयत्न करीत होते. पण त्यांना यश आले नव्हते. अशा अवस्थेत हा प्रश्न न्यूटनपुढे आला.

न्यूटनने ती संध्याकाळ तो प्रश्न सोडवण्यात घालवली आणि त्याला यश आले. अर्थात गणितातले त्यानेच शोधलेले कलनशास्त्राचे हत्यार उपयोगी पडले. तारेचा आकार एका ठराविक वाकड्या आकाराचा असायला पाहिजे, ज्याला 'ब्राचिस्टाक्रोन' हे नाव दिले आहे. प्रश्न सोडवून निनावीच त्याने त्याचे उत्तर रॉयल सोसायटीकडे पाठवले आणि सोसायटीच्या सचिवाला ते तसेच बर्नूलीकडे पावायला सांगितले.

बर्नूलीने उत्तर पाहिले आणि सोडवण्याची आगळीवेगळी पद्धत ओळखली. हे उत्तर निनावी असले तरी न्यूटनलाच ते शक्य आहे हे त्याने ओळखले. आदरमिश्रित कौतुकाने तो उद्‌गारला.



''पंजा पाहून मी तो सिंहाचाच हे ओळखले.''

ब्राचिस्टाक्रोनचा आकार कसा असतो?

जर एका चाकाच्या परीघावर एक बिंदू p टाकला तर जसे ते चाक सरळ मार्गावर गडगडत जाते p तसे एका वक्र मार्गाने जातो. वरील आकृतीत असा मार्ग ठळक वक्र रेषेने दर्शवला आहे. न्यूटनने काढलेले उत्तर म्हणजे हीच वक्र रेषा, खालच्या वरच्या बिंदूंना जोडणारी, तिला दिलेले प्रचलित नाव 'सायक्लॉइड' आहे.

जरा डोके चालवा –२

४ तुकड्यांमध्ये खालील पद्धतीने काही प्रबोधकांनी चौरस तयार करून दाखवला आहे. इतरांनी पाठवलेली उत्तरे चुकीची आहेत. प्रत्यक्षात दोन तुकडे करूनही चौरस मिळवता येतो तेही उत्तर दिले आहे.

मिलिंद व स्वाती देशमुख,धुळे
अमेय घाटे,चाळीसगाव
मिलिंद घोळवे,इंदापूर
शंकरलाल बंग, लातूर



मीनल कुलकर्णी, कोल्हापूर
अलका व अपर्णा भोळे,धुळे
स्वप्नील झालटे,इंदापूर

तुम्हीही अशी कोडी पाठवा

वाचलेच पाहिजे असे काही

मृत्युंजय

कु. पांचाली गर्गे,
इ. ११वी, पुणे

'सुंदरतेच्या सुमनामधले दव चुंबुनि घ्यावे' असं यथार्थपणे म्हणावंसं वाटतं 'मृत्युंजय' कादंबरीबद्दल! गद्यकाव्यात्मक अशा या कादंबरीद्वारे आदर्श जीवनमूल्यांचा प्रतिशोध घेतला आहे शिवाजी सावंत यांनी! महाभारतातील भगवान श्रीकृष्ण मुत्सद्दी, उत्तम राजकारणपटू व कुशल नीतीज्ञ म्हणून; तर सत्याचे पाठीराखे पांडव शूरवीर; तर करारी व तडफदार व्यक्तिमत्त्व म्हणून 'भीष्मप्रतिज्ञा' करणारे भीष्माचार्य या ताकदीच्या व्यक्तिरेखा जनमानसांमध्ये अधिक लोकप्रिय झालेल्या आढळतात. मात्र सर्वश्रेष्ठ धनुर्धर दानशूर कर्ण मात्र काहीसा उपेक्षित... अंगी असलेल्या सद्‌गुणांचा दुर्योधनाला साथ देऊन असत्यासाठी वापर केला, या त्याच्या अपराधाला आजवरही कोणी क्षमा केली नाही.

तर अशा महावीर, चिरंजीवी कर्णाचे व्यक्ती म्हणून अनेक कंगोरे स्पष्ट करण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. माणसाच्या वर्तनामागे, जडणघडणीमागे परिस्थितीची पार्श्वभूमी असते. कर्ण परिस्थितीच्या ज्वाळांतून तावून सुलाखून निघाला. शैशवी राजवैभव उपभोगण्याऐवजी तो 'सूतपुत्र राधेय' म्हणून वाढला व त्याच्या वाट्याला आमरण अवहेलनाच आली. सद्‌गुणांची कास, वडिलधाऱ्यांबद्दल आदरभाव, युद्धनैपुण्य कर्णाकडेही होतं. परंतु देहाच्या यातना, मनाच्या वेदना व नियतीने दिलेल्या कठोर शिक्षा त्याने ओठ मिटून सहन केल्या! 'व्यसने मित्रपरीक्षा' या वचनानुसार अडचणीत मदतीचा हात देणाऱ्या दुर्योधनाचा तो स्वामिनिष्ठ अनुयायी झाला. 'दाता भवति वानवा' असा दातृत्ववान कर्णच! मृत्यूलाही हसतमुखाने आलिंगन देताना देवेंद्राला कवचकुंडलांचे दान दिलेच, शिवाय अंतकाळी आपले सोन्याचे दात देखील दगडाने पाडून ब्राम्हणाला उदात्त अंत:करणाने दिले!

साहजिकच व्यासांच्या मूळ कथेतील कर्णाला जाणून घेण्याची जिज्ञासा असते. त्यादृष्टीने मानवी भावभावनांचे प्रतिकात्मक चित्रण येथे आढळते. ज्या काळात ही कादंबरी प्रसिद्ध झाली, तेव्हा कथेतील पात्रांनी मनोगत मांडण्याची कल्पना अभिनव होती. त्यामुळे 'कौंतेय', 'राधेय', इ. कादंबऱ्यांच्या तुलनेत तिने विशेष ठसा उमटवला. ही अप्रतिम कथा वाचकांच्या मन:चक्षूपुढे उभी करताना लेखकाने उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, चेतनागुणोक्ती, अनुप्रास इ. भाषालंकारांची मुक्तहस्ते उधळण केली आहे. उदा. – ''वसंत म्हणजे निसर्गदेवतेची मुक्त रंगपंचमी! सप्तस्वरांचा एकमेकांच्या हातात हात घालून उभ्या राहिलेल्या खेळगड्यांचा हुतूतूचा संच!'' आपल्या ओजस्वी व तेजस्वी लेखणीने लेखकाने कर्णासह त्याच्या भोवतालच्या व्यक्तिरेखांचे बारकावे टिपून कथेत आगळे रंग भरले आहेत. श्रीकृष्ण, शोण, वृषाली, कुंती, दुर्योधन यांच्या हृद्‌गताद्वारे कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे अनुयायी, बंधुप्रेमी भाऊ, कर्तव्यदक्ष राजा व पती, आदर्श पुत्र आणि मित्र हेही पैलू उलगडून दाखविले आहेत. एकतर्फी 'कर्णदर्शन' न घडवता इतर व्यक्तिरेखांचे सुस्पष्ट दर्शन घडविले आहे.

या कादंबरीतील पौराणिक वातावरणनिर्मिती साधण्यात ओघवती भाषाशैली, नाट्यमय संवाद यांनीही महत्त्वपूर्ण वाटा उचलला आहे. उदा. कर्ण आणि कुंती दोघेही दु:खीच! पण त्या दु:खातही सूतपुत्र म्हणून जगण्याचे कर्णाचे दु:ख व मुलगा समोर असूनही त्याला सत्य सांगता न येण्याचे कुंतीचे दु:ख अशी तुलनात्मक विविधता येथे साकारली आहे. व्यक्तिरेखेचे गुणविशेष सरळसरळ न सांगता संवादातून वाचकांपर्यंत पोचवण्याची कला लेखकाला उत्तम साधलेली आहे! त्यामुळे कादंबरी वाचताना आपण तिच्याशी अक्षरश: एकरूप होतो.

आता नाण्याची दुसरी बाजू! नायकाचं चरित्र रंगवताना, त्याची उत्तुंगता विशद करताना लेखकाने काही वेळा इतरांवर थोडा अन्याय केल्यासारखा वाटतो. भीम, अर्जुन कर्णाच्या दृष्टीने प्रथमत:च वाईट, नीच असल्याचे दाखवले गेले आहे. उदा. कर्ण राजपुत्रांच्या पाठशाळेत जातो, तेव्हा केवळ भीम, अर्जुन यांच्या चेहऱ्यावरील हावभावावरून वा त्यांच्या हालचालींवरूनच ते गर्विष्ठ, मदोन्मत्त असल्याचा निष्कर्ष काढलेला आहे. किंवा ते तसे असावेत, असं कर्णाला वाटलं, असा आभास निर्माण केला आहे. कर्णावरील ही कादंबरी वाचून आपण त्याच्याच बाजूचे होतो; पण तरीही असा सद्‌गुणी, पराक्रमी वीर सत्याच्या बाजूला असता तर महाभारताला वेगळीच कलाटणी मिळाली असती, असं राहूनराहून वाटतं!

तर 'झाले बहु, होतील बहु, परंतु या सम हा' अशा कर्णाच्या गुणावगुणांवर प्रकाश टाकणारी, संघर्षमय भवसागर यशस्वीरीत्या तरून जाण्यासाठी 'दीपस्तंभा' ची भूमिका निभावणारी ही कादंबरी नावाप्रमाणेच 'मृत्युंजय आहे!

दात्यावरती विपत्ती येता, अवचित येता याचकही, वाणीसंगे प्राण झगडती, वदण्याआधी 'नकार' ही

भटकायला चला!

–किरण पुरंदरे

गेलं एक तप मी एक नाद लावून घेतलाय. सध्याच्या परिस्थितीचा विचार करता हा नाद मी कधी सोडीन असं वाटत नाही. नाद आहे डोळस भटकंतीचा. पाय चालत असतानाच डोळ्यांनी पाहाण्याचा. जे पाहतो ते मनात पाझरतं. कधी कधी शब्दांची वाट चालत कागदावर येतं. मी भटकतो, पण कुठे? असा प्रश्न तुम्ही सहज विचाराल. याचं सोपं उत्तर माझे डोळे ठरवतील तिथे. रस्त्यानं, डोंगरातल्या वाटेनं, गवतामधनं, झाडांच्या गर्द छायेमधनं, रणरणत्या उन्हामधनं, दगडगोट्यांच्या पसाऱ्यामधनं. कधी पाचोळ्यातून तर कधी लाल मातीमधनं...माझे डोळे सारखं पाहतात. त्यांना दिसतात आकार–रंगांची अगम्य विविधता घेऊन पंखांवर उडणारे पक्षी. त्यांना दिसतात मोहोरलेली झाडं. त्यांना दिसतात उन्हाला बसलेल्या फुलक्या म्हणजे फुलपाखरं आणि खूप काही थोडक्यात मी निसर्गवेडा आहे. गेली बारा वर्षे फिरताना मी जे पाहत गेलो, जी शिदोरी बांधत गेलो, त्यात, त्या अनुभवण्यात, कुठेही तोचतोचपणा नाही.सतत काहीतरी नवं दिसतं. सतत काहीतरी वेगळं खुणावतं. मला वाटतं, हीच निसर्गाची खरी गंमत आहे. सुरुवातीला मी पक्ष्यांच्या जरा जास्तच मागे असायचो. मागे म्हणजे त्यांना पकडण्यासाठी नाही, तर निरखण्यासाठी. मला पक्षी पकडून ठेवायला आवडत नाही. ते मोकळेच छान वाटतात. पण मग हळूहळू लक्षात आलं की पक्षी पाहतानाच त्याचा परिसर पाहणंही तितकंच महत्त्वाचं आहे.

परिसर म्हणजे सगळं. हवा, पाणी, झाडं, जमीन, खडक... म्हणून मी परिसराचा अभ्यास, परिसराचं निरीक्षण करायला लागलो. तेव्हा समजलं की डोंगरापासून कातळ जसा वेगळा करता येत नाही, तसा पक्ष्यापासून परिसर आणि परिसरातले पक्षी. इतकं हे जवळचं नातं आहे. पक्ष्यांचं निरीक्षण आणि परिसराचं अवलोकन, करता करता माझ्या नकळतच माझं पेनही काम करू लागलं आणि मी टिपणं ठेवू लागलो. तुम्ही विचाराल की परिसराचं निरीक्षण करण्यासाठी काही साहित्य लागतं का? मी म्हणेन 'हो आणि नाही सुद्धा.' उघडे डोळे, सतर्क कान, पुढे टाकण्यासाठी उचलेला पाय आणि मनाची एकाग्रता हे 'साहित्य' वापरून मी इतकं पाहिलंय की विचारू नका. निसर्ग बघायची, तो अंगात मुरवायची गोडी अवीट आहे. त्यासाठी एकच गोष्ट पाहिजे. अंगावरचं पांघरूणाचं उबदार कवच धुडकावून लावत, दात वाजवणाऱ्या थंडीच्या कडाक्यात पूर्व क्षितिजावरून गुलालाची उधळण करणाऱ्या सूर्याचं बिंब डोळे भरून पाहण्याची उर्मी. ही उर्मी सारख्या उसळ्या मारत असली तर मग तुम्ही गप्प कसे बसाल? नद्या-नाले धुंडाळाल, पाखरांच्या मागे लागाल, मानेला रग लागेस्तवर आभाळाचं झुंबर बघाल, हातात विजेरी घेऊन सरपट्यांच्या जगाचा मागोवा घ्याल आणि थकलात की सगळ्याची आठवण काढतच पाठ टेकाल. आपल्याला पाय असतात. आपण चालू शकतो. ठरवलं तर वेग वाढवून पळू शकतो. पण त्यापेक्षा वेगात पुढे जायचं असेल तर सायकल वापरतो. माझ्या मते निसर्गाच्या अभ्यासात साहित्याची आवश्यकता एवढीच आहे. महत्त्वाची आहे ती पुढे जाण्याची इच्छा. मग दुर्बीण, पेन, कागद, पुस्तक हे साहित्य येतं. मी अत्याधुनिक यंत्रांपेक्षा साधं, जाडंभरडं साहित्य वापरून परिसराचा अचूक अभ्यास करणं जास्त महत्त्वाचं मानतो. त्यात खरी गंमत आहे. त्यात आव्हान आहे. हातात पंधरा हजाराचा टेलिस्कोप घेतला तर पक्षी जवळ दिसणारच. पण त्यापेक्षा एक हजार रुपयांची दुर्बीण घेऊन आणि पक्ष्यांच्या जवळ जाण्याचं कौशल्य हस्तगत करून त्यांचा अभ्यास करण्याचा मार्ग खडतर आहे. काटेरी जाळ्यांचा, दलदलीचा आहे. मग ठरवा राजमार्ग वापरायचा की हिरव्या वाटेचं बोट धरायचं?

मी जशी निसर्गाशी सोयरीक जमवली, तसंच माहितगारांशी सूत जमवलं. जो पक्षी, जे झाड, जे फुलपाखरू मला त्याचं नाव न माहीत असल्यापासूनच कोड्यात टाकतं, त्याचा वाढदिवस (माझ्या बाबतीतला) एखाद्या जाणकराकडे होतो. सुदैवानं असे तज्ज्ञ आपल्याकडे आहेत. त्यामुळे आपला माहितीचा तलाव थेंबाथेंबाने मोठा होतो. मी जे पाहतो, त्यातलं जे माझ्या हृदयाला भिडतं ते मी इतरांना सांगतो, वाटतो. त्यामुळे मला आनंदाचे वाटेकरी मिळतात आणि नवीन माहिती मिळवण्याची खुमखुमी येते.

कधी कधी फिरता फिरता माझी पावलं थबकतात. मन खट्टू व्हावं, रंगाचा बेरंग व्हावा असं काही तरी दिसतं. हिरव्यागार डोंगरमाळेत मधूनच बोडका डोंगर दिसावा, तसं सुरुवातीला मी झाडं तोडणाऱ्याविरुद्ध बोटं मोडायचो. मला त्यांचा विलक्षण राग यायचा. पण मग हळूहळू माझ्या ध्यानात आलं की झाडांची गरज आहे, म्हणूनच झाडं तुटली जातात. लाकूड आवश्यक आहे म्हणूनच कुऱ्हाडी सरसावतात. पन्नास वर्षांपूर्वी आपल्याला जेवढं लाकूड, जेवढे कपडे, जेवढं पाणी, जेवढी घरं आवश्यक होती तेवढी आत्ता पुरतील का? नाही. का? कारण आपण वाढलो. आपली गरज वाढली. आपली भूक वाढली. शिवाय आपण म्हणजे माणूस. माणूस म्हणजे इतर प्राण्यांच्या तुलनेने मोठ्या मेंदूचा प्राणी. तो गरजेपुरतं नाही वापरत. त्याला त्याहीपेक्षा जास्त हवं असतं. गंमत म्हणजे हा मनुष्यप्राणी गरजेपेक्षा जास्त हवं असलेलं निर्माण करत नाही. तर तो फक्त ओरबाडतो आणि जास्त ओरबाडलं की निसर्गाची सहनशक्ती संपते.तो असहकार पुकारतो. त्याच्या असहकाराचं प्रत्यक्ष रूप कधी कधी फार भयंकर असतं. पूर, दुष्काळ, दरडी कोसळणं, धुळीचे लोट वाहणं ही नाराजी व्यक्त करण्याची निसर्गाची पद्धत. या सगळ्यात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जे निर्माण करायला निसर्ग खूप वेळ घेतो ते आपण माणसं क्षणार्धात नष्ट करतो. तुम्ही म्हणाल मग यावर उपाय काय? मी म्हणेन कराल तेवढे उपाय कमीच आहेत. इथे सुद्धा 'आतून वाटणं' महत्त्वाचं आहे. जोपर्यंत आपल्याला निसर्ग समजत नाही तोपर्यंत आपण त्याला काय झालं आहे हे ठरवू शकत नाही. एखादं भरदार बुंधा असलेलं झाड भुईवर पडलेलं दिसतं तेव्हा माझ्या मनात हे विचार येतात. मी अजूनही फिरतोच आहे. जमेल तेवढ्यांना शहाणं करून सोडतो आहे. तुम्हालाही ह्या भ्रमंती नामक रोगाची लागण व्हावी असं वाटतं असेल तर चला माझ्याबरोबर. मी तुम्हाला काही शिकवण्याआधीच तो मुख्य अध्यापक. निसर्गच तुमची कोवळी मनं समृद्ध करेल.

तुम्हाला तगडं बनवेल. त्याच्या सोबतीत मिळालेली ताकद कुठे वापरायची? फाटलेल्या जमिनीला बांध घालायला. कोवळ्या रोपांची निर्मिती करून त्यांना काळ्या आईच्या स्वाधीन करायला. हातांनी त्याच्याबद्दल लिहायला. मुखांनी

त्यांच्याबद्दल इतरांना सांगायला ही ताकद वापरायची. कारण शेवटी निसर्ग म्हणजे तरी काय? ते एक जाळंच आहे. लक्षात ठेवा त्या जाळ्याचा एक धागा आपल्या हातात आहे. हा धागा जपला तर आपण जगू. जर हा धागा तोडला तर आपण संपू. मित्रांनो, मी तुम्हाला संदेश वगैरे देऊ शकत नाही. संदेश तो निसर्गच देईल. ते संदेश समजले तर तुमच्यासारखे भाग्यवान तुम्हीच.

शब्दकोडे



आडवे शब्द

१) इच्छा ३) धाक, डर ५) पराजय ६) एकाच दृष्टीने पाहणे ८) गोंडस, तेजबिंडा १०) मन रमविणारे १२) मराठी व्याकरणातील अलंकारांपैकी एक १४) माया, प्रेम १६) गो, कामधेनू १७) एक प्रसिद्ध उद्यान, १८) हाक.

उभे शब्द

१) महाराष्ट्रात राहणारे २) एका मुलाचे नाव ३) पाच पांडवापैकी एक ४) इकडेच्या विरुद्ध ७) गोष्टीरूप ९) दूर हो ११) मृत्युदेवता १३) पुणेरी गुंडाला या नावाने संबोधतात १५) शक्ती, जोर १६) थंड, शीतल.

गणिती व्हा!

१९९५ पासून १ ते १०० संख्या तयार करा (वर्ष ३ अंक ७ मधील स्पर्धेचा निर्णय)

७० व ७४ या २ संख्या सोडून उर्वरित सर्व संख्या अचूक रितीने १,९,९, व ५ यांचा फक्त वापर करून गणिती चिन्हांच्या आधारे ४ विद्यार्थ्यांनी लिहून पाठविल्या आहेत. सर्वात जास्त पद्धतींनी विविध संख्या मिळविल्याबद्दल चि. वैभव मांडके, इ. ११वी, मु.पो.मंगळवेढे, सोलापूर याला प्रथम क्रमांकाचे तर कु. अनुपमा खरे,इ.७वी,भुवनेश्वर हिला द्वितीय क्रमांकाचे बक्षिस देण्यात येत आहे. उत्तेजनार्थ बक्षिस : कु. स्मिता किरवे, सातारा व चि. समीर जोशी, पुणे.

बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन!

उदाहरणादाखल एका संख्येचे उत्तर पुढे दिले आहे.
अन्य संख्यांची उत्तरे क्रमश: पुढील अंकामध्ये येतील.

$३६=(५+१)(\sqrt{९}+\sqrt{९}), (५+१)(९-\sqrt{९}),(९ह्न५-९),\sqrt{(५-१)}(९+९), ९(५-१),९(९-५),$
$९(\sqrt{९}+१),(\sqrt{९}ह्न\sqrt{९})(५-१),१५\sqrt{९}-९,(१५-\sqrt{९})\sqrt{९}$

प्रश्न २ : १ ते ९ ह्या सर्व आकड्यांचा एकेकदाच उपयोग करून विविध गणिती चिन्हांच्या आधारे १०० उत्तर मिळवा. उदा. १+२+३+४+५+६+७+(८ह्न९)=१००
अधिकाधिक पद्धती शोधून लिहून पाठवा. पहिल्या २ क्रमाकांना बक्षिस

स्पर्धा परिक्षेची तयारी

राष्ट्रीय रक्षा प्रबोधिनी(NDA)

अर्थात्

कच्च्या लोखंडाचे पोलाद बनविणारी संस्था

– शं.ग.रानडे

''गड आला पण सिंह गेला'' कोंडाणा किल्ल्याला उद्देशून काढलेले हे शिवाजी महाराजांचे उद्‌गार आणि त्याला दिलेले सिंहगड हे नांव किती सार्थ आहे? जणू आजमितीसही ते सार्थक ठरते. सिंहगडाच्याच परिसरात पायथ्याशी असलेली, तरुणांना सिंह बनविणारी संस्था म्हणजे राष्ट्रीय रक्षा प्रबोधिनी. मात्र महाराष्ट्राच्या किंवा मराठी मनाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास या संस्थेला देखील सिंहगड म्हणून संबोधायला हरकत नाही. कारण गड जरी हाती आला म्हणजे मराठ्यांच्या शौर्यभूमीत आला, तरी मराठी सिंह मात्र हरपला. तो गेला, म्हणजे नसल्यातच जमा आहे. वाचकांनो आपल्याला ह्या सिंहगडाचा इतिहास माहीत आहे काय? हा सिंहगड महाराष्ट्रात कसा आला, तो इथे आणण्यात कुणाचे प्रयत्न यशस्वी झाले याचा वृत्तांत मोठा मनोरंजक आहे. त्याचे थोडक्यात असे झाले –

दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ साली ब्रिटिश भारतीय सैन्याचे हिंदीकरण आणि हिंदी अधिकाऱ्यांचा समावेश करण्याच्या

हेतूने ''संयुक्त सेवा प्रबोधिनी''च्या (Joint Service Academy) कल्पनेची रूजवात घातली गेली. सरकारने या संदर्भात एक समिती नेमली. जिचे नांव राष्ट्रीय युद्ध प्रबोधिनी कार्यसमिती (National war Academy working committee) असे होते. या समितीपुढील प्रमुख उद्देश भविष्यातील भारतीय सेनाधिकाऱ्यांचे (तीनही दलातील) एकत्रित प्रशिक्षण देणारी संस्था स्थापन करणे हा होता. समितीचे सभाध्यक्ष फिल्डमार्शल सर क्लॉड आत्रिनलेक, उपसभाध्यक्ष डॉ. अमरनाथ झा हे होते. सभासदांमध्ये देखील पंजाब विद्यापीठाचे कुलगुरू, जयपूर, जोधपूर संस्थानिक, डून स्कूलचे मुख्याध्यापक, इंजिनिअरिंग कॉलेज पुणेचे प्रिन्सिपॉल श्री. मैस्करहन्स यांचा समावेश होता. समितीने इतर कामांबरोबरच या संस्थेची स्थापना कुठे करावी याचा निर्णय घेण्यासाठी बऱ्याच स्थळांचा विचार केला. त्यात खडकवासल्याबरोबर, कराची, बंगलोर, देवळाली, नासिक, भोपाळ, बेळगांव, डेहराडून, पुरी, जबलपूर, विशाखापट्टनम, सिंकदराबाद इत्यादींचा पण विचार झाला. पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी ही संस्था पंजाबमध्ये ठेवली तर पंजाब सरकार लागेल ते पूर्ण साहाय्य द्यायला तयार असल्याची घोषणा केली. परंतु शेवटी ही संस्था खडकवासला इथेच ठरविली गेली. जनरल थोरात (त्यावेळी ब्रिगेडियर) यांच्याच प्रयत्नांनी हे शक्य झाले अशी ऐकीव बातमी आहे. जेव्हा ब्रिगेडियर थोरातांना ही संस्था पंजाबात जात असल्याचे समजले तेव्हा त्यांनी त्यावेळच्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांची (बाळासाहेब खेर) गाठ घेऊन खडकवासल्याची जागा दाखवली आणि सुमारे ८००० एकर जमिनीची मागणी केली. परंतु मुख्यमंत्र्यांची फारशी समजूत न पटल्याने ब्रिगेडियर थोरात थेट गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांना भेटले आणि खडकवासला स्थानाचे महत्त्व पटवून दिले. याचा अंतिम परिणाम म्हणजे समितीने खडकवासला हे स्थान निश्चित करण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र सरकारलाही ८००० एकर जमिनीची देणगी द्यावी लागली. अर्थात ब्रिगेडियर थोरात यांना मुख्यमंत्र्यांचा किंचित शाब्दिक रोष पत्करावा लागला ही गोष्ट वेगळी. पण महाराष्ट्र मात्र या बाबतीत नशीबवान ठरला.

तर अशी ही आधुनिक सिंहगडाची कहाणी. कुणी सांगावे, जनरल थोरात यांचा आत्मा देखील शिवाजी महाराजांप्रमाणे ''गड

आणला, पण मराठी सिंह गेला'' असेच उद्‌गार काढून मूक रुदन करीत असेल.

महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात मराठ्यांचे राज्य उत्तरेकडे ग्वालीयर व दक्षिणेकडे कर्नाटक-तंजावरपर्यंत पसरले होते. राघोबादादांच्या अटकेपार भरारीमुळे मराठ्यांचा जिकडे तिकडे दबदबा पसरला होता. दक्षिण भारताच्या इतिहासातील प्रामुख्याने नमूद करण्यासारखी एक गोष्ट म्हणजे फक्त मराठी सैन्यानीच नर्मदा घाट पार करून उत्तरेकडे पराक्रम गाजविला. अन्य कुणी नाही. हा झाला उज्ज्वल भूतकाळ. वर्तमानकाळातील चित्र मात्र याच्या उलट दिसते. कुठे गेले ते आपले शौर्य, आपला पराक्रम? स्वतंत्र भारताच्या नकाशात, अखिल भारतीय स्पर्धा परीक्षात, अनेक विविध क्षेत्रात, दोन चार अपवाद वगळता मराठी माणसाला स्थान नाही. दिल्ली दरबारी तर त्याला कुणी विचारतच नाही. 'दिल्ली बहोत दूर है' असेच खेदाने म्हणावे लागते. ज्या मराठ्यांनी इतिहास काळात पुढाकार गाजविला आज त्यांच्यावरच मागे पडण्याची पाळी का आली याचा विचार होणे आवश्यक आहे. स्वतंत्र भारतातील इतर भाषिक, जरी त्यांना आपण उपहासाने मागासलेले म्हणून हिणवतो, तरी तेच आज पुढे आहेत. नुसत्या संरक्षण सेवेतच नव्हे तर इतर सेवांमध्येही. याची जाणीव मराठी मनाला कशी होत नाही? काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात एका वाचकाचे (तात्या महाजन, सोलापूर) पत्र प्रसिद्ध झाले होते. ते खूपच बोलके आहे. त्या पत्राचा सारांश असा -

'महाराष्ट्राचे दुर्दैव - आहे कुणी मराठी तरुण'

''महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांमध्ये संरक्षण शाखा हा विषय शिकण्याची कुवत नाही'' असा प्रा. गौतम सेन (विद्यापीठाच्या संरक्षण विभागाचे प्रमुख) यांनी मारलेला फटका वेदना देत असतानाच ''छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रीयांची लढाऊ प्रवृत्ती संपुष्टात येत आहे.'' अशी खंत महाराष्ट्राचे मावळते पोलीस महासंचालक श्री. सूर्यकांत जोग यांनी व्यक्त केली. हे वाचून वाईट वाटले. ते पुढे म्हणाले की ''अकाली निधन झालेला माझा मुलगा, सुजित ह्याच्या स्मरणार्थ मी राष्ट्रीय रक्षा प्रबोधिनीतील मराठी मुलांसाठी खास ठेवलेले उत्तेजनार्थ बक्षिस,त्यासाठी पात्र उमेदवारच न मिळाल्यामुळे कोणासही देता

आले नाही.'' तसेच त्यांनी पोलीस आणि संरक्षण सेनेकडे जाऊ इच्छिणाऱ्या मराठी माणसात गेली अनेक वर्षे सातत्याने घट होत असल्याची उदाहरणे दिली.

मराठी मुले प्रभावशून्य आहेत. मराठी तरुणांची कुवत नाही, अशा अर्थाचे वेळोवेळी प्रसिद्ध होणारे लिखाण नुसतेच बोचत नाही तर त्यातील सत्यता मन अधिकच विषण्ण करून जाते. त्यांची ही अशी स्थिती कां झाली, कुणाचा एवढा प्रभाव त्यांच्यावर पडला. याला काही उपाय आहे काय? हे सर्व विचारात घेणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश सरकारची नोकरी करणे हे अयोग्य असेलही, परंतु आता स्वातंत्र्यानंतर हुशार व चाणाक्ष मराठी मुलांनी सरकारी नोकरीत, संरक्षण सेवेत उच्च पदे विभूषित का करू नयेत? ती देखील एक प्रकारची देशसेवाच नव्हे काय? प्रामाणिक, कार्यक्षम आणि हुशार अधिकाऱ्यांची, मग ते संरक्षण सेवेतील किंवा शासकीय सेवेतील असोत, आज स्वतंत्र भारताला त्यांची गरज आहे. वर निर्देश केल्याप्रमाणे मराठी समाज जर उदासीनतेतून खडबडून जागा व्हायला हवा असेल, तर यापुढील ४ ते ५ पिढ्या तरी संरक्षण अधिकारी बनायला पाहिजेत. पंजाबमध्ये ज्याप्रमाणे घरटी दोन तीन माणसे सेनाधिकारी असतात, त्याच धर्तीवर मराठी लोकांनी कार्यक्रम राबवला पाहिजे. तेव्हाच कुठे बहुसंख्य मराठी समाजात उत्साह, साहसीवृत्ती, धडाडी, आत्मविश्वास, जोष वगैरे सारखे नेतृत्व गुण अंगी बाणतील. हे व्हायला पाहिजे, ही काळाची गरज आहे.

तरुण मुलांनी सैन्याधिकारी बनण्याची कितपत गरज आहे, याचा ऊहापोह आपण वर केलाच आहे.तेव्हा आता सैन्यात अधिकारी कसे व्हायचे ते पाहू. सैन्यात अधिकारी मुख्यत:RIMC डेहराडून, NDAपुणे, IMAडेहराडून, किंवा OTAमद्रास मधून होता येते.RIMCत इयत्ता ७वी नंतर, NDAत इयत्ता १२ वी नंतर आणि IMA व OTAत पदवी परीक्षेनंतर प्रवेश घेता येतो.या सर्व प्रवेशासाठी लेखी परीक्षा,मुलाखत आणि शारीरिक तपासणी या चाचण्यांतून जावे लागते. सर्व चाचण्या वर्षातून दोनदा होत असतात.प्रस्तुत लेख NDA वर असल्याने आपण केवळNDAप्रवेशाविषयी माहितीघेऊ.

NDAत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची निवड संघलोकसेवा आयोगाकडून (UPSC) होते. लेखी परीक्षा दर सहामाहीला साधारण सप्टेंबर आणि एप्रिल महिन्यात होते. परीक्षेला आजकल सुमारे ८५००० उमेदवार बसतात. त्यातून फक्त तीन ते साडेतीन हजार उमेदवार मुलाखतीसाठी निवडतात. परीक्षेला दोन पेपर असून परीक्षा एका दिवसातच आटोपते. पहिला पेपर गणिताचा ३०० मार्कांचा. गणिताच्या पेपरची शैक्षणिक पातळी १०वी ची असते. दुसरा पेपर General Ability चा असून त्यात इंग्रजी २०० मार्क, सायन्स ग्रुप २०० मार्क आणि General Science ग्रुप २०० मार्क असा एकुण ६०० मार्कांचा असतो. दोन्ही पेपर वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असतात.

जशी लेखी परीक्षा ९०० मार्कांची तशीच यानंतरची मुलाखत पण ९०० मार्कांचीच असते. यानंतरची मुलाखत सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्डकडून होते. यासाठी संपूर्ण भारतात सहा केंद्रे आहेत. वायुदलाच्या निवडीसाडी डेहराडून, वाराणसी व म्हैसूर, सेनादल आणि नौदलाच्या निवडीसाठी भोपाळ आणि केवळ सेनादलाच्या निवडीसाठी अलाहाबाद केंद्र आहे. मुलाखतीत प्रत्येक उमेदवाराची मानसिक व सामूहिक चाचणी आणि व्यक्तिगत मुलाखत होते. मुलाखतीला गेल्या दिवसापासून चार दिवस वरील चाचण्या चालतात. शेवटच्या-पाचव्या दिवशी सर्व परीक्षक एकत्र बसून उमेदवाराच्या अंतिम निवडीचा निर्णय घेतात. निवड झालेल्या उमेदवारांची नंतर ३-४ दिवस शारीरिक तपासणी कसून होते. यात निरोगी असणारेच उमेदवार राष्ट्रीय रक्षा प्रबोधिनीच्या प्रवेशास पात्र ठरतात.

राष्ट्रीय रक्षा प्रबोधनीने खडकवासला धरणाजवळ अदमासे ८००० एकर जमीन व्यापली असून यात सुदान ब्लॉक (मुख्य कार्यालय आणि छात्रांसाठी वर्गकक्ष इ.), सायन्स ब्लॉक, म्युझियम, असेंब्ली हॉल, वाचनालय, छात्रमेस, वसतीगृहे (एकंदर १५), परेड मैदान, व्यायामशाळा, पोहण्याचे तलाव, स्टेडीयम, अश्वशाळा, निरनिराळ्या खेळांची मैदाने (एकंदर १२५), हॉस्पिटल आणि इतर अनेक संबधित सोयी आहेत.

प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च सरकार करीत असून पालकाला केवळ नाममात्र खर्च (सुमारे १२५-१५०रु.) येतो. प्रक्षिशण तीन वर्षांचे असून शेवटी B.A.किंवा B.Sc. ही जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी मिळते. या नंतरचे एक वर्षाचे प्रशिक्षण डेहराडून, अलाहाबाद, हैदराबाद आणि गोवा या ठिकाणी होते. त्यानंतरच संरक्षण सेवेत कमिशन मिळते.

आशिया खंडात अद्वितीय म्हणून नावाजलेली आणि तीनही दलांचे एकत्रित प्रशिक्षण देणारी जगातील ही एकमेव संस्था आहे. अशा प्रकारची उत्तम संधी ऐन पुण्यातच उपलब्ध असताना मराठी मुलांकडून ही संस्था उपेक्षित का राहावी याचे आश्चर्य वाटते.

का व कसे?

१. मुंगी चावल्यास आग का होते?

२. पाण्याने भरलेल्या ग्लासात बर्फाचा तुकडा टाका. हा तुकडा वितळ्यानंतरही ग्लासमधून पाणी ओसंडत नाही असे का?

३. उचकी का लागते?

४. Three pin socket मधील सर्वात वरची पिन जाड का असते?

५. उसाचा रस काढल्यापासून थोड्याच वेळात काळा का पडतो?

(आधीच्या अनुत्तरित प्रश्नांची उत्तरे पुढील अंकात).

येत्या दिवाळीत भारतात दिसणारे
खग्रास सूर्यग्रहण

डॉ. प्रकाश तुपे



येत्या दिवाळीत निसर्गाचा एक अद्‌भूत चमत्कार आपल्याला पाहावयास मिळणार आहे. २४ ऑक्टोबर म्हणजे आश्विन अमावस्येच्या दिवशी सकाळी ८ वा.२०मि. नी खग्रास सूर्यग्रहण होणार आहे. आयुष्यात क्वचितच पाहावयास मिळणारा हा निसर्गाचा चमत्कार पाहण्यासाठी खग्रास अवस्थेचा पट्टा ज्या भागातून जातो, त्याठिकाणी मात्र जावे लागते. यावेळी हा पट्टा भारतातून जात असून राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार व पश्चिम बंगाल या प्रांतातील ६०-७० कि.मी. पट्ट्यातून खग्रास सूर्यग्रहण दिसू शकेल. इतर ठिकाणी या वेळी खंडग्रास ग्रहण दिसू शकेल. सकाळी आकाशात काळा सूर्य, काही ग्रह व तारे पाहण्याची सुवर्णसंधी आपण दवडू नये.

आपल्याला ठाऊक असेलच, खग्रास सूर्यग्रहणात अमावस्येच्या दिवशीचा चंद्र सूर्यबिंबासमोरून जातो. सूर्यबिंबाला चंद्राने पूर्ण झाकल्यास सूर्य दिसेनासा होऊन दिवसाढवळ्या रात्र झाल्यासारखे वातावरण काही वेळ निर्माण होते. सूर्यबिंबाला झाकल्यामुळे चंद्राची दाट सावली पृथ्वीवर जेथे पडते तेथेच फक्त खग्रास अवस्था दिसते. जास्तीत जास्त १५० ते २०० कि.मी. पट्ट्यातच फक्त ही दाट सावली (UMBRA) असते. चंद्र पूर्ण सूर्यबिंबावर जास्तीत जास्त ७ मिनिटे ३० सेकंद राहू शकत असल्याने

घट तेजाचे भवती ओतित, असंख्य रवि-राजाचे प्रेषित, महाद्वार पूर्वेचे खोलुन क्षितिजावर येती

एवढाच काळ खग्रास सूर्यग्रहण दिसू शकते. चंद्र, सूर्य व पृथ्वी यांच्यामधील अंतर थोडेसे बदलत असल्याने खग्रास अवस्था कमी जास्त वेळ होऊ शकते. या दिवाळीत होणाऱ्या ग्रहणाची खग्रास अवस्था भारतातून फक्त ४५ ते ९० सेकंदापर्यंत दिसू शकेल.

सूर्यग्रहणे जरी जास्त प्रमाणात होत असली तरी, ती आपल्या दृष्टीने दुर्मीळ असतात.याला प्रमुख कारण म्हणजे चंद्रग्रहणाप्रमाणे पृथ्वीच्या अर्ध्या भागातून ग्रहण न दिसता, जेथे चंद्राची सावली पडेल तेथूनच फक्त ग्रहण दिसू शकते व इतरत्र सूर्य नेहमीच्याच तेजाने प्रकाशात असल्याचे दिसते. एखाद्या ठिकाणी खग्रास सूर्यग्रहण दिसल्यास, पुन्हा तेथे खग्रास सूर्यग्रहण घडण्यास ३५० वर्षे जावी लागतात. अनेक ग्रहणात चंद्राची सावली समुद्रावरून किंवा मनुष्यवस्ती नसलेल्या ठिकाणाहून जात असल्याने सूर्यग्रहणे दुर्मीळ असतात.

भारतात यापूर्वी १६ फेब्रुवारी १९८० रोजी खग्रास सूर्यग्रहण दिसले होते. या दिवाळीत दिसणारे ग्रहण कदाचित या शतकातले शेवटचे ग्रहण ठरेल. कारण पुढील ग्रहण ११ ऑगस्ट १९९९ साली दिसणार आहे व या काळात पावसाळा असल्याने ग्रहण दिसण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. यानंतर भारतात २०८१, २११४ व २१३५ साली खग्रास ग्रहणे दिसतील.

खग्रास सूर्यग्रहणात अनेक नैसर्गिक चमत्कार पाहावयास मिळतात. जेव्हा अमावस्येचा चंद्र, सूर्यबिंबाला झाकू लागतो तेव्हा हळूहळू सूर्यप्रकाश कमी होत जाऊन संध्याकाळ झाल्यासारखे वाटू लागते. खग्रास अवस्थेपूर्वी दहा मिनिटे रंगीबेरंगी सूर्यप्रकाश पसरत चालल्यासारखे वाटू लागते. पक्षी, प्राणी संध्याकाळ झाल्यासारखे वाटून घरट्याकडे परत फिरू लागतात. हवेत गारवा निर्माण होऊ लागतो. हळूहळू चंद्रकोरीप्रमाणे छोटेसे सूर्यबिंब नव्हे सूर्यकोर आकाशात दिसू लागते. संपूर्ण सूर्यबिंब झाकले जाण्यापूर्वी काळ्या सूर्यबिंबाच्या प्रकाशाचा झगमगाट दिसू लागतो.अंगठीत चमकणाऱ्या हिऱ्याप्रमाणे दिसणाऱ्या दृश्याला''डायमंड रिंग''म्हणतात.सूर्यबिंबाच्या कडेला रंगीबेरंगी मणी दिसू शकतात.आपल्या अंगावरून भली मोठी सावली गेल्याचे काही लोकांना जाणवते. जमिनीवर पांढरे कापड अंथरल्यास काळे पांढरे रंगाचे पट्टे नाचल्यासारखे दिसू लागते. या पट्ट्यांना ''शॅडो बँडस''म्हणतात. संपूर्ण सूर्यबिंबाला चंद्राने झाकल्यावर सूर्यबिंबाभोवती असणारा किरीट (करोना) एकदम दिसू लागतो व खग्रास सूर्यग्रहण सुरू झाल्याचे समजते. आकाशात ठळक ग्रह व तारे दिसू लागतात. काही क्षणांनंतर चंद्र सूर्यबिंबावरून हटू लागतो व पुन्हा वर वर्णन केलेले चमत्कार दिसू लागतात.काही क्षणात दिसणारे हे चमत्कार आयुष्यात एकदा तरी अनुभवायला हवेतच. भारतात दिसणारे ग्रहण २४ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वा.२२ मिनिटाने सुरू होईल व १२ वाजून ४२ मिनिटाने सुटेल.या दिवशी सकाळी सूर्योदयाच्या वेळी तेहरानमध्येखग्रास



अवस्था दिसेल. येथे १६ कि.मी. पट्ट्यातच चंद्राची दाट सावली असेल. तेथून ही सावली अवघ्या सात मिनिटात इराण, अफगणिस्तान, व पाकीस्तान या देशांमधून प्रवास करून भारतात चूर्क या गावात पोहोचेल. तेथून ती अलवार, भरतपूर, फत्तेपूर सिक्री, भींड, हमीदपूर, डाकरगंज, मदनापूर यामार्गाने प्रवास करून म्यानमार, थायलंड, व साऊथ चायना अखेरीस सूर्यास्ताच्यावेळी पॅसिफिक समुद्रात नाहीशी होईल. राजस्थानात हवामान चांगले असण्याची शक्यता असल्याने शक्यतो तेथून हे ग्रहण पाहावे. या भागात सुमारे ४० सेंकद खग्रास अवस्था असून, सकाळी ८ वा.३३ मिनिटाने खग्रास अवस्था दिसेल. यावेळी काळ्या सूर्याजवळ शुक्र, मंगळ व बुध हे ग्रह दिसू शकतील. तसेच चित्रा, स्वाती या सारखे काही तारे दिसू शकतील. पश्चिमेकडल्या क्षितिजावर व्याधाचा तारा तर पूर्व क्षितिजावर गुरू ग्रह दिसू शकेल.

जगभरातील लोक, हौशी आकाशनिरीक्षक व खगोलशास्त्रज्ञ खग्रास ग्रहणाच्या पट्ट्यातील गावांमध्ये येऊन गर्दी करणार असल्याने आपण काही महिने अगोदरच जाण्याचे ठिकाण व तेथील राहण्याची जागा व प्रवासाची तयारी करावयास हवी. दिवाळीची सुटी इतरत्र न घालवता आपण ती काळ्या सूर्याबरोबर घालवून आयुष्यात क्वचितच मिळणारी संधी घ्यावी.

अनुभव व पैसा

बाळूकाकांना सार्वजनिक बागेत एका संध्याकाळी खूप उदास चेहऱ्यानी बसलेले पाहून त्यांचा मित्र म्हणाला, ''काय हो बाळूकाका काय झाले? असे उदास का?'' त्यावर बाळूकाका उत्तरले ''अरे काय सांगू, मी एका व्यक्तीच्या भागीदारीत धंदा सुरू केला होता. माझा पैसा होता व त्याचा अनुभव.'' ''मग काय झालं?'' उत्सुकतेने मित्राने विचारले. ''काय व्हायचंय! आता पैसा त्याच्याकडे आहे आणि अनुभव माझ्याकडे.''

माकडं मजुरी करतात तेव्हा... !

–विजय देवधर

मलायामध्ये नारळांचं उत्पादन मोठ्या प्रमाणावर होतं. साहजिकच तिथं नारळांचा व्यापारही मोठ्या प्रमाणावर होतो. आता नारळांच्या उंच उंच झाडांवरून नारळ तोडायचे म्हणजे त्याकरता मजुरांची गरज ही लागणारच! आश्चर्याची गोष्ट अशी की या कामासाठी तिथे राबणारे मजूर हे जगात सर्वात कमी मजुरी घेणारे अजब कामगार आहेत. तिथे या मजुरांच्या 'कामगार संघटना' नाहीत. 'आठवड्याला चव्वेचाळीस तास कामाचे' असं काही बंधन नाही. इतकंच नव्हे तर प्रत्येक मजुराची दर दिवसाची मजुरी काय तर एखाद् दुसरा कच्चा नारळ किंवा शहाळं! एक नारळ किंवा एक शहाळं रोज मिळालं की या मजुरीवर जगावेगळा तिथला मजूर एकदम खूष!

आता या मजुरांच्या कामाचं नेमकं स्वरूप काय? दररोज शेकडो नारळ झाडांवरून खाली उतरवणं! हे तर मी आरंभीच सांगितलंय. हे मजूर आणि त्यांचे वंशज गेली शंभर वर्षांहून अधिक काळ उंच उंच झाडांवरून नारळ उतरवण्याचं हे काम अगदी बिनतक्रार करत आहेत. प्रत्येक मजूर दररोज सरासरी शंभर नारळ तोडतो.आपलं काम अगदी चोख पार पाडतो. मोठ्या चपळाईनं नारळाच्या झाडाच्या उंच उंच शेंड्यावर पोहोचतो नि पिकलेले नारळ तोडून खाली टाकतो. मित्रांनो! तुम्ही बुचकळ्यात पडला असाल की हे जगावेगळे विलक्षण कामगार आहेत तरी कोण? तुमच्या या प्रश्नाचं उत्तर देऊन मी इतक्या वेळ ताणलेली तुमची उत्सुकता संपवणार आहे. मात्र ते ऐकून चमकू नका हं! तर मित्र हो!

मलायामधले हे विलक्षण कामगार दुसरे तिसरे कुणी नसून चक्क माकडं आहेत! खरोखरीच माकडं! डुकरासारखी आखूड आणि बारीक शेपटी असलेली विशिष्ट जातीची ही माकडं नारळाच्या झाडांवरून नारळ तोडण्याचं काम गेली कित्येक वर्ष अगदी बिनतक्रार करीत आहेत! त्यांच्या मालकांनी– म्हणजे माणसांनी – या कामाचं खास ट्रेनिंग देऊन त्यांना तयार केलं आहे. माणूस आणि माकड यांच्यामधली नारळ तोडण्याच्या कामातली भागीदारी ही मलायामधली अगदी सामान्य बाब आहे. नारळ तोडण्याच्या कामाबद्दल माकडाला एखाद दुसरं शहाळं किंवा नारळ मिळतो. मात्र त्याच्या मालकाला ठराविक पैसे मिळतात. या उत्पन्नावर मालक आणि माकड या दोघांची उपजीविका चालते.

आता माकडांना या कामासाठी कसं तयार केलं जातं याची मनोरंजक माहिती सांगतो.

हा अजब व्यवसाय करणारे लोक रानांमध्ये बांबूच्या कामट्यांचे निरुपद्रवी पिंजरे ठेवतात. त्याच्यात केळी, खाद्यपदार्थ अशी आमिषं लावली जातात. या आमिषांना भुलून रानातली माकडं – बहुदा माकडांची पिल्लंच – अधिकांश

सापडतात. ही पिल्लं साधारणपणे एक ते दोन वर्षे वयाची असतात. या पिल्लांना माणसाळवण्याचं काम त्यांना पकडून आणणारे प्रथम करतात. माकडांची अशी पिल्लं माणसाच्या सहवासाला सरावली, माणसांमध्ये थोडी रुळली की मग त्यांचा प्रशिक्षणाचा अवघड नि प्रदीर्घ कार्यक्रम सुरू होतो.

माकडाच्या गळ्यात अगोदर एक चामड्याचा पट्टा अडकवला जातो. त्याला एक लांबलचक दोरी असते. या बंधनाची त्याला लवकरच सवय होते. नंतर मग त्याला 'इकडे ये', 'खाली बस', 'ऊठ', 'तिकडे जा' अशा छोट्या छोट्या आज्ञा पाळण्यास शिकवलं जातं! या आज्ञा त्यानं आत्मसात केल्या की मग त्याच्या प्रशिक्षणाचा पुढचा टप्पा सुरू होतो. नारळाच्या एखाद्या ठेंगण्या झाडावर चढण्यास नि उतरण्यास त्याला शिकवलं जातं. 'वर चढ', 'आणखी वर जा', 'हां थांब', 'खाली उतर' असे हुकूम त्याला शिकवले जातात. माकड झाडावर असलं तरी त्याच्या गळ्यामधल्या पट्ट्याला बांधलेल्या लांब दोरीचं दुसरं टोक त्याच्या मालकाच्या हातात असतं. दोरीला सूचक हिसके देऊन माकडाला तो निरनिराळे हुकूम पाळण्यास शिकवतो. आता त्याला इतर आणखीही काही शब्द शिकवले जातात. झाडाच्या वेगवेगळ्या झावळ्यांवर संचार करायला त्याला शिकवण्यात येतं.

माकडानं एवढी प्रगती केली की मग त्या प्रशिक्षणातला सर्वात महत्त्वाचा नि अवघड भाग त्याला शिकवला जातो. तो म्हणजे नारळ तोडणं! हे काम फार कठीण असतं. पिकलेले आणि पूर्ण तयार झालेले नारळच झाडांवरून खाली उतरवायचे असतात. आणि माकडांना तर पिकलेल्या नारळापेक्षा कच्च्या नारळां मध्येच अधिक रस असतो. तेव्हा त्यांना पिकलेले नारळ निवडण्यास नि ते तोडून खाली टाकण्यास शिकवलं जातं. हा प्रकार माकडानं एकदा का आत्मसात केला की मग त्याचं ट्रेनिंग संपतं नि मग ॲप्रेन्टिसशिप सुरू होते. त्याला नारळांच्या बागांमध्ये नेलं जातं. तिथं अगोदर ठेंगण्या झाडावरले नारळ तोडायला लावतात. या कामात ते तरबेज झाले की मग मध्यम उंचीच्या नि त्यानंतर पूर्ण उंचीच्या नारळांच्या झाडावर त्याला पाठवलं जातं! ते जसजशी प्रगती करेल तसतशी त्याच्या गळ्यातल्या दोरीची लांबी वाढवली जाते. काही दिवसांमध्येच ती माकडं तयार झालेले नारळ तोडण्यात तरबेज होतात. प्रत्येक झाडावर चढण्याउतरण्याचे श्रम वाचवण्याकरता माकडांचे काही मालक त्यांना एका झाडाच्या शेंड्यावरून दुसऱ्या झाडाच्या शेंड्यावर अचूक उडी मारण्यास शिकवतात. अशी माकडं मग थोड्या कष्टांमध्ये अधिक नारळ पाडतात. एका झाडावरून दुसऱ्या झाडावर झेपा घेणाऱ्या अशा माकडांची हवाई कसरत प्रेक्षणीय असते.

मलायामधेच जोसूहबिन इस्माईल नावाचा ऐंशी वर्षे वयाचा नारळांचा व्यापार करणारा एक प्रसिद्ध व्यापारी होता. त्याच्या जवळ एक अतिशय हुशार माकड होतं. दीडशे मलायन डॉलर्स देऊन त्यानं ते माकड एका

फासेपारध्याकडून विकत घेतलं होतं. त्या माकडाच नांव त्यानं एंबाँग असं ठेवलं. इस्माईलनं एंबाँगला शिकवून तयार केलं. त्या हुशार माकडानं शिकवलेल्या सगळ्या गोष्टी चटचट आत्मसात केल्या.नारळाच्या झाडांच्या शेंड्यावर उंचउंच जागी पोचून तयार झालेले नारळ पाडण्यात एंबाँग लवकरच निष्णात झाला. एकेका दिवसात तीनशे पौंड वजनाचे नारळ तो पाडू लागला.आपल्या धन्याला तो दरमहा शंभर दीडशे डॉलर्सची कमाई करून देऊ लागला.ह्या रकमेत इस्माईलचा प्रपंच भागत असे. इस्माईलचं एंबाँगवर अतिशय प्रेम होतं. तो त्याच्यावर मुलासारखी माया करत असे.दोघांमध्येही एक अतूट असा बंध निर्माण झालेला होता.अनेक लोकांनी एंबाँगला विकत घेण्यासाठी इस्माईलला आकर्षक रकमांचं आमिष दाखवलं. पण इस्माईलनं त्याला कधीही कोणाला विकलं नाही. एंबाँगनं सहा वर्षे आपल्या धन्याची इमाने इतबारे सेवा केली. दररोज काम संपलं की इस्माईल दोन शहाळी सोलून एंबाँगला देत असे. रोज संध्याकाळी आपल्या धन्याकडून एंबाँगला हे बक्षिस अगदी न चुकता मिळत असे. नव्हे ! तो त्याचा रोजचा पगारच होता. पुढे वृद्धापकाळामुळं इस्माईल मरण पावला. तो ज्या दिवशी मरण पावला त्या दिवशी आपल्या धन्याच्या वियोगामुळं व्याकूळ एंबाँग घर सोडून निघून गेला.बहुदा अरण्यामधल्या आपल्या पूर्वीच्या निवासस्थानाकडं तो निघून गेला होता! तो जो गेला तो पुन्हा कधीही इस्माईलच्या घरी परतला नाही. मुका प्राणी किती एकनिष्ठ असू शकतो याचं हे अतिशय बोलकं उदाहरण आहे.

कित्येक मलायन माकडं इतकी हुशार होती की त्यांना मलायन भाषेमधले तीसापेक्षा जास्त शब्द अचूक कळत असत! धन्यानं विशिष्ट आज्ञा असलेला शब्द उच्चारायचा नुसता अवकाश– त्याचं माकड ती कामगिरी करून मोकळं होई! काही माकडं झाडांवरून केवळ नारळच पाडत असं नव्हे तर पाडलेले नारळ पोत्यांमध्ये भरण्याचं कामही अचूक करत असत.

'मेराह'नावाच्या एका माकडाला मलायात सर्वाधिक प्रसिद्धी मिळाली होती. १९३७ साली तिथल्या सरकारी नोकरीत दाखल होणारा हा एकमेव वानर होता. आपल्या अंगी असलेल्या असामान्य गुणांमुळं त्यानं सरकारी सेवेत स्थान मिळवलं होतं. ''नारळ पाडणारं माकड''म्हणून 'मेराह'नं आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. बुद्धिमत्तेच्या बाबतीत आपल्या भाईबंदांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत हे'मेराह'नं लवकरच दाखवून दिलं.सिंगापूरच्या'पोटॅनिकल गार्डन'चे डायरेक्टर इ. जे.एच.कॉर्नर यांच्या कानांवर 'मेराह'ची कीर्ती गेली. तेव्हा त्यांनी या माकडाला लगोलग विकत घेऊन टाकलं आणि आपल्या पदरी सरकारी सेवेत दाखल करून घेतलं.'मेराह'ला निरनिराळ्या वनस्पतींबद्दल उपजतच ज्ञान होतं. डायरेक्टर कॉर्नर यांनी त्याला विविध वनस्पतींचे नमुने गोळा करण्यास शिकवलं. सिंगापूरमधल्या अरण्यात शेकडो फूट उंचीची अशी झाडं

(पान क्र. ८६ वर पुढे चालू)

लेखक-
डॉ. बाळ फोंडके
चित्रे -
देविदास पेशवे

अपुल्यासाठी अयोग्य जे जे परक्यासाठी ते न करा, हेच सार धर्माचे आहे बाकी सगळा स्वार्थ खरा

आपल्याच आहे!
(कौतुक विधि लावतोय) एक कोपऱ्या हेमा हुकला. मग हेच त्याच्या मोठ्या काही ठाणे जाणवलेली दिसतात, रुपये ठाणे एक कोपऱ्यापेक्षा दिसतो.

निरेंद्रराजेंनी खिडकीतून आत्याच एक, ठोसेघरचा नजारा होता.
पण कौशिक.... आपल्यासारखे होलेकरण विसरायचं नाहीत होत, तिथंसुद्धा.....
तो, यांनी रूम झाल्यानंतर फोडून टाकला, त्याबाबत हा, कुठला मला बंगल्याच्या नावेल मिळाला, होलेकरांचं वॉलेकर आहे की एका कुटुंबासुद्धा पूर्ण प्रतिमा दिसते.
वाऽऽऽ काय सुंदर गुलाब आहे नाही?
म्हणजे आमही फसलोच की! आपल्या घरचे होलेकर हे जिहद करण्याचा वि रेंद्रराजेंचा डाव होता तर!
चला, निरेंद्रराजे, तुमचा खेळ संपलाच!

ज्ञान प्रबोधिनीद्वारा आयोजित प्रशिक्षण वर्ग

स्वयं अध्ययन कौशल्ये प्रशिक्षण वर्ग	प्रतिभा विकसन वर्ग
अभ्यास कसा करावा हे जाणून घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या वर्गाचे आयोजन. आधुनिक तंत्रे, प्रात्यक्षिके व सराव पाठ यांच्या साहाय्याने या वर्गात येऊन शिका! –आकलनासहित वाचनवेग कसा वाढवावा? –स्मरणशक्ती कशी वाढवावी. –टिपणे कशी काढावीत. –गतीलेखन कसे करावे? –अभ्यासाचे नियोजन कसे करावे? –परीक्षेची पूर्वतयारी कशी करावी?	अमेरिकेसारख्या पाश्चात्त्य देशातील शिक्षणामध्ये शिकविली जाणारी प्रतिभा विकसनाची आधुनिक तंत्रे आपल्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी या वर्गाचे आयोजन. –आपली निरीक्षण शक्ती, जिज्ञासा वाढवा! –आपल्या कल्पनाशक्तीला पंख फुटू द्या! –कविता, कथा, निबंध या द्वारा सृजनाचा आनंद लुटा! –विज्ञानातील मुक्त प्रयोगांद्वारा प्रतिभेचा आविष्कार करा.

स्वत:ची गुणवत्ता वाढविण्याची ही अमूल्य संधी दवडू नका!

वरील दोन्ही वर्ग स्वतंत्रपणे पण एकाच वेळेस

कालावधी : दररोज तीन तास याप्रमाणे सहा दिवसांची एक अशा ४ बॅचेस

बॅच १ दि. ८ मे सोमवार ते १३ मे शनिवार **बॅच २** दि. १५ मे सोमवार ते २०मे शनिवार

बॅच ३ दि. २२ मे सोमवार ते २७ मे शनिवार **बॅच ४** दि. २९ मे सोमवार ते ३ जून शनिवार

वेळ :– दररोज दुपारी २.३० ते ५.३० **शुल्क** :– रु. १००/– फक्त

स्थळ :– ज्ञानप्रबोधिनी प्रशाला, ५१० सदाशिव पेठ, पुणे–३०

नावनोंदणी :– छात्रप्रबोधन कार्यालय, ज्ञानप्रबोधिनी, पुणे –३०

अभिनंदन राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा ही आखिल भारतीय स्तरावरची एक मानाची परीक्षा असते. तिची पहिली परीक्षा राज्यपातळीवर नोव्हेंबरमध्ये होते. त्यातून महाराष्ट्रातून ३५० विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेस बसण्यासाठी निवड होते. यंदाच्या वर्षी छात्र प्रबोधनच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध पत्राद्वारा मार्गदर्शन वर्गातील ५ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेसाठी निवड झाली आहे. त्यांची नावे व गावे : **प्रवीण साळे व हेमंत राठी (धुळे), गिरीश कुलकुर्णी व अमित कुलकर्णी (लातूर), निलेश महाजन (बारामती) या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालींसाठी शुभेच्छा!**

गंध मोहवी काव्याचा

कवी कुसुमाग्रज

प्रा. शैलजा देशमुख

१९३० ते १९४७ हा कालखंड म्हणजे इंग्रजी राजसत्तेची मगरमिठी तोडण्यासाठी तरुणांच्या मनात निर्माण होणाऱ्या उर्मीचा काळ! परतंत्र अवस्था म्हणजे 'शापशृंखला' स्वातंत्र्याचे आगमन म्हणजे 'उष:काल' अशा शब्दात देशाची मंतरलेली स्थिती व्यक्त होत होती. त्या स्फोटक वातावरणाचा एक ज्वालाग्राही उद्रेक म्हणजे कुसुमाग्रजांची कविता! देशाला स्वतंत्र करण्यासाठी कारागृहात जाणाऱ्या क्रांतिकारकाचे मनोगत केवळ त्या काळाचेच चित्रण राहिले नाही तर जगाच्या पाठीवर कुठेही देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देण्यास सिद्ध असणाऱ्या हृदयांचे स्थलकालातीत स्पंदन ठरले.

पदोपदी पसरून निखारे आपुल्याच हाती
होऊनिया बेहोष धावलो ध्येय पथावरती
कधी न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे
बांधू न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे
एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार
होता पायतळी अंगार.
गर्जा जयजयकार, क्रांतिचा गर्जा जयजयकार!

अशा शब्दात आपलं जीवनध्येय कुसुमाग्रजांचा क्रांतिकारक व्यक्त करत होता.

'कशास आई भिजविसि डोळे, उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात अुद्याचा असे उष:काल!

असे मातृभूच्या स्वातंत्र्याचे मनोहर स्वप्न तेजस्वी शब्दात मांडत होता.

त्या काळातील 'विशाखा' 'किनारा' मधील कविता वाचताना लोकमानसाला एक विलक्षण आनंद झाला. पण केवळ तात्कालिक सामाजिक, राजकीय परिस्थितीचे बोल असे स्वरूप कुसुमाग्रजांच्या कवितेला प्राप्त झाले नाही. कारण मानवी समानतेचा उदात्त विचार त्यांनी सतत मनात बाळगला. मनुष्यावर लादल्या जाणाऱ्या पारतंत्र्याविषयी, दारिद्र्याविषयी तीव्रपणे चीड व्यक्त केली. दुसऱ्यांना नाडणाऱ्या समूहांचा, विचारसरणीचा त्यांनी उपहास केला. आपल्या कवितेद्वारे हे कार्य घडावे ही त्यांची आंतरिक इच्छा होती. आपल्या कवितेविषयी ते म्हणतात

समिधाच सख्या या, त्यात कसा ओलावा
कोठून फुलांपरि वा मकरन्द मिळावा?
जात्याच रुक्ष या एकच त्या आकांक्षा
तव अंतरि अग्नी क्षणभर तरि फुलवावा!

आपल्या कवितांना ते समिधा म्हणत असले तरी जीवनरसाचा ओलावा त्यात ओतप्रोत भरून आहे.

तरुणांच्या आशा-आकांक्षेचे उद्‌गाते म्हणून त्यांच्या कवितांकडे वाचक पाहतो. त्यातील कल्पनाविलासाने चकित होतो. मानवतेच्या दर्शनाने विनम्र होतो.सामाजिक असंतोषाचा ज्वालामुखी त्यांच्या कवितांतून अग्निरसाचा वर्षाव करतो.

समाजातील विषमता, पिळवणूक, गांजवणूक, अन्याय यांच्याविषयी सामान्य माणसाच्या मनात सहज जागी होणारी चीड कुसुमाग्रजांनी उत्कट शब्दात व्यक्त केली आहे. या दृष्टीने 'बळी','लिलाव','माळाचे मनोगत' 'पाचोळा' इ. कविता अतिशय सरस आहेत.

'लिलाव' या कवितेत सावकारांच्या टाचेखाली चिरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्याचे कवीने केलेले चित्रण अतिशय तृदयस्पर्शी आहे.

सर्व वस्तूंचा लिलाव झाल्यावर त्याच्या पत्नीकडे बोट दाखवत सावकार म्हणतो.

ऊर उघडे ते तिचे न्याहाळोनी
थोर थैलीतील वाजवीत नाणी
'आणि ही रे!' पुसतसे सावकार
उडे हास्याचा चहुंकडे विखार!'

ज्या समाजरचनेत गरिबाच्या जगण्याच्या हक्काचा आणि स्त्रीच्या शीलाचा 'लिलाव' मांडला जातो ती समाजप्रवृत्ती नष्ट व्हायलाच हवी असा त्वेष ही कविता वाचणाऱ्याच्या मनात ती उत्पन्न करते. 'माळाचे मनोगत' या कवितेतही दलितांच्या गांजवणुकीचे चित्र कवी सहृदयतेने रेखाटतो. एकलकोंडे जीवन जगणारा, सर्व सुखांना पारखा झालेला माळ शेवटी उद्‌गारतो.

'कशास आयुष्य देवा, इतके
शतकामागुन जाती शतके!

तीच अवस्था 'पाचोळ्याची.' सर्वजण त्याचा उपहास करतात, वाटसरू त्याला तुडवून जातो. तरीही बिचारा पाचोळा शांतच असतो. शेवटी वाऱ्याबरोबर वाहून

जातो.

'आणि जागा ही मोकळी तळाशी
पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी!'

'आगगाडी आणि जमीन' या कवितेत कवीची कल्पकता व त्याची प्रेरकता यांच्यात जणू शर्यतच लागली आहे असे वाटते. जुने हुकूमशाहीचे, अन्यायाचे जग जाऊन नवे सुंदर जग निर्माण होण्याची गरज कुसुमाग्रज वेगवेगळ्या प्रतिकांतून मांडतात.

'अहि-नकुल' या कवितेत नाग व मुंगुस यांच्या संगराचे वर्णन वाचताना ते दृश्यच वाचकाच्या डोळ्यासमोर उभे रहाते.

सळसळत्या नागाचे वर्णन करताना

कधि लवचिक पाते खड्गाचे लवलवते
कधि वज्र धरेवर गगनातून कडकडते
कधि गभरेशमी पोत मधे जरतार
प्रमदेचे मादक वस्त्र जणू सळसळते,

रूपक व उत्प्रेक्षेचा सुरेख वापर येथे आढळतो.

या जगातील मालिन्य, काळोख दूर करण्यासाठी ते सूर्याला आवाहन करतात.

या त्रिभुवन उजळित प्रभाकरा
हा काठोकाठ कटाह भरा!
रक्तध्वज पूर्वेवर चढू द्या
खोप्यातील खग नभी उडू द्या
आकाशात निखारा फुटू द्या
ज्वालांत जळू द्या तम सारा

त्यांच्या प्रेमकवितांतही हे भव्यतेचे, तेजाचे पूजन दिसते. त्यामुळे शृंगारालाही त्यांच्या कवितेत उदात्त रूप प्राप्त होते. 'पृथ्वीचे प्रेमगीत', वाचताना याचा प्रत्यय येतो.

पृथ्वी सूर्याला विनवते
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे!

स्वातंत्र्य आले तरी समाजाची स्थिती फारशी बदलली नाही, या विषयीचे दु:ख कुसुमाग्रजांच्या, अलीकडील काळातील कवितातून व्यक्त होते. 'प्रवासी पक्षी',

'छंदोमयी', 'मुक्तायन' या काव्यसंग्रहातील कविता वाचताना याचा प्रत्यय येतो. त्यांच्या कवितेचा आविष्कारही नंतरच्या काळात बदललेला दिसतो. नादमयता, सहजसुंदर अलंकारीक भाषा, प्रतीकांचा वापर, गेयता ही कवितेची आभूषणे दूर सारून त्यांच्या कवितेला उपहासाची धार चढलेली दिसते. समाजातील भोंदूपणा त्यांना अस्वस्थ करतो,

येथले साधू पहावेत तर
याच्या लंगोटीला झाली मोत्याची
चिलीम सोन्याची त्याच्या पाशी.

असा त्याचा थाट दिसतो.

आजच्या समाजाचे विदारक दर्शन घडवणारी एक नितांत सुंदर कविता 'गाभारा'. देवळात श्रीमंती थाट आहे पण गाभाऱ्यात देव नाही. देवस्थानाचा व्यापार करणाऱ्या पुजाऱ्यांना एक दिवस देव नाहीसा झालेला दिसला. एका महारोग्याने आर्तपणे पुकारलेल्या हाकेला ओ देत तो निघून गेला. त्याचा शोध चालू आहे.

'पण महारोग्यांच्या वस्तीत तो राहिला असेल
तर त्याला पुन्हा प्रवेश द्यावा की नाही
याचा विचार करावा लागेल
आमच्या ट्रस्टींना
जयपूरला पत्रव्यावहार चालू आहे
दुसऱ्या मूर्तीसाठी
पण तूर्त
गाभाऱ्याचं दर्शन घ्या
तसं म्हटलं तर गाभाऱ्याचंच महत्त्व अंतिम असतं
गामारा सलामत तर देव पचास'

स्वातंत्र्योत्तर काळात देशासाठी महान कार्य करणाऱ्या थोर पुरुषांचे पुतळे उभारले गेले. पण त्याच्या कार्याचे मर्म कोणी जाणले नाही. ही व्यथा पुतळ्यांना बोलके करून कवी व्यक्त करतात.

तरीही जीवनाविषयी निराशेचा सूर कुसुमाग्रज पकडत नाहीत. नक्षत्रांना उद्देशून म्हणतात :-

'तुम्ही माझ्यावर अपार प्रेम केलंत
तुम्हीच मला सांगितलं -

जगणं म्हणजे प्रेम करणं
फक्त प्रेम करणं
मग ते जगणं तुझं असो
आमचं असो
अथवा तुला मला निर्माण करणाऱ्या
त्या परात्पर शक्तीचं
परमात्म्याचं असो.'

विश्वातल्या, सृष्टीतल्या, निसर्गातल्या घटकांद्वारे प्रेमाचा बोध कुसुमाग्रजांना होतो. मग ते सर्वांना सांगत सुटतात -

प्रेम-

कुणावर करावं?... कुणावरही करावं

प्रेम-

योगावर करावं, भोगावर करावं
आणि त्यातूनही अधिक त्यागावर करावं

'शलाका' या कवितेत ते म्हणतात

गगनापरी जगावे
मेघापरी मरावे
तीरावरी नदीच्या
गवतातुनी अुरावे

घडत असलेल्या एखाद्या प्रसंगाला ते अचानक वळण देऊन चकित करणारा परिणाम साधतात. त्यामुळे त्या अनुभवाला

सौंदर्य, वेधकता प्राप्त होते. 'याचक' या कवितेत त्या याचकाचा कटोरा कशाने भरेना. पण भिकारणीने आपले पोर बाजूस करून स्तनातले दोन थेंब कटोऱ्यात टाकले व तो अथांग भरला या प्रसंगातून 'माणुसकी' चे महात्म्य ते वर्णन करतात.

'कणा' या कवितेत पुरामध्ये सर्वस्व उद्ध्वस्त झालेला कुणी एक आपल्या सरांना भेटायला येतो. आपले दुःख शब्दात व्यक्त करतो. पण कवितेचा शेवट कवितेला एकदम उंचावर घेऊन जातो. तो सरांना म्हणतो.

'पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते 'लढ' म्हणा.

उपरोधाचे दर्शन, सहजसुंदर भाषाशैली अनुभवायलाच हवी. स्वतःची काव्य लिहितानाची अवस्था ते वेचक शब्दात व्यक्त करतात.

'मी जेव्हा कवी असतो
तेव्हा मी कुणाचाच नसतो !
गगनयानापरी होतो
स्फोटाने विलग मी

आपल्या कवितेत

'व्यथा – वेदनाही बहरती प्राजक्तापरी'

असे ते म्हणतात

आपली कविता म्हणजे
सोलीव तत्त्वाचे वासरमणी
उगवती उदयाचली

हे त्यांनी केलेले आत्मपरीक्षण त्यांच्या



कुसुमाग्रजांच्या कवितेचा संक्षेपाने वेध घेताना अनेक कविता हातून निसटतात. त्यासाठी या कविता मुळातूनच वाचायला हव्यात.हीआहे केवळ एक चुणूक! त्यांच्या कवितेतील कल्पनासौंदर्य, भाषासौंदर्य, रचनेचा ओघ, नादमयता, दृश्यात्मकता, कवितेचे सौंदर्य व सामर्थ्य प्रकट करते.

कथा, कादंबरी, ललित लेख अशा विविध वाङ्मय प्रकारात सम्राटाप्रमाणे मुलुखगिरी करणाऱ्या कुसुमाग्रजांची प्रतिभा मुक्तपणे फुलली ती नाटक व कवितेच्या प्रातांत! शेक्सपिअरच्या नाटकांचे

मराठीत रूपांतर करताना त्यांच्या भाषेवर, गडकऱ्यांच्या भाषाशैलीचा प्रभाव प्रकर्षाने दिसतो. 'नटसम्राट'सारख्या नाटकात एके काळी वैभव पाहिलेल्या नटसम्राटाची त्याचबरोबर एका वृद्धाची शोकांतिका अतिशय हळुवार, काव्यमय भाषेत ते मांडतात. त्यावेळीही त्यांच्यातील कवीच नाटककारावर मात करतो.

मराठी साहित्यात केलेल्या मोलाच्या कामगिरीबद्दल 'ज्ञानपीठ पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. रसिकांकडूनही भरपूर मान्यता, प्रेम मिळूनही हा मानवताप्रेमी कवी कमलपत्रासारखा निर्मोही राहिला. नव्या पिढीतील कवी, लेखकांच्या पाठीवर या महान कवीचा सक्रीय आशीर्वादाचा हात सतत फिरत राहिला.

स्वत:च्या मनाचा शोध घेताना

'असे हजारासंगे आहे
जडलेले माझे नाते
असेच आहे आणि तरीही
अनोळखी मी सदाच राही
दूर हजारातूनि आहे
विजनामधी माझे घरटे
मीपण भरले जगात माझे
जे आहे माझ्यापुरते'

असे 'अनोळखी' या कवितेत ते म्हणतात

समाजजीवनात व स्वत:मध्ये रत झालेले दोघेजण दोन ध्रुवांचे अंतर ठेवून एकाच घरात (एकाच शरीरात) रहातात आणि तरीही स्वत:च्या ठायी रत असलेल्या त्याला काय हवे याचा कवी शोध घेतो.

'मला हवा तो
हाहि नव्हे, तोहि नव्हे'

अशा 'नेति, नेति'च्या भाषेत ते बोलत राहतात.ह्या वृत्तीनेच त्यांच्या जीवनाचा अखंड प्रवास चालू आहे.

'प्रवासात असण्यातच प्रवासाची अंतिम सांगता आहे.' अशा कलंदर वृत्तीने हा सत्य, शिव, सुंदराचा उपासक आपली वाट चालतो आहे.

माणुसकीच्या ओलाव्यात चिंब भिजणारी, अन्याय, विषमता याविरुद्ध बंड करणारी, उदात्त प्रेमाने गीत गाणारी, कल्पनाविलास आणि भाषासौंदर्याने चकित करणारी अशी ही कुसुमागजांची कविता!

अनेक तरुण मनांना तिने प्रेरणा दिली. ताजेपणा दिला, जीवनध्येयाची आठवण करून दिली.भविष्यातही हे काम ती नि:संशयपणे करीत राहील. त्यामुळे केवळ मनाला आनंद देणारी साहित्यकृती एवढंच त्यांच्या कवितेचे मोल नाही, तर

'चालतो मी सारखा हा,
चालण्याला अंत नाही
चालण्याचे श्रेय आहे
अन्य धर्माचार नाही'

अशी अखंड गतिमानता या कवितेत आहे. यातच तिचे मोठेपण सामावलेले आहे.



भारतीय सौर कालगणना

–यशवंत लेले

ख्रिस्ती नववर्षाचे स्वागत आपण पूर्वसंध्येस जागून, नाचून मोठ्या जल्लोषात करत असतो. गुढीपाडव्यास घरावर गुढी उभारून गोडधोड खाऊन आपण स्वस्थ असतो. सौर वर्ष सुरू झाल्याचे तर आपल्या गावीही नसते. आपल्या देशात सणवार वगैरे तर चांद्रमासानुसारच पाळले जातात.

हिंदुस्थानात धर्माप्रमाणे वेगवेगळी कालगणना आहे. तसाच त्यात प्रादेशिक भेदही आढळतो. अनेकांचा वर्षारंभ हा कोणत्या ना कोणत्या विक्रमाचा, विजयाचा किंवा अभिमानास्पद अशा अन्य प्रसंगाचे स्मरण देऊन जात असतो.

भारतीय इतिहास विक्रमादित्याचा काळ हा सुवर्णयुग म्हणून ओळखतात. सुवर्णयुग निर्मात्या विक्रमादित्याच्या नावे सुरू झालेली कालगणना विक्रमसंवत म्हणून साऱ्या देशाला परिचित आहे व उत्तरभारतात ती प्रत्यक्षात वापरातही आहे. सध्याचे विक्रमसंवत (कार्तिक शु. प्रतिपदा, बलप्रतिपदा, दिवाळी पाडवा)२५/१०/९५ ला संपून २०५२ हे विक्रमसंवत सुरू होईल.

शालीवाहन किंवा सातवाहन हा शकांना परास्त करून पूर्णपणे पचवून टाकणारा महापराक्रमी राजा! आपण दक्षिणेतील बरेच लोक शकारीशालीवाहनाताच्या भीमपराक्रमाचे स्मरण ठेवतो ते दैनंदिन जीवनात शालीवाहन शकाचा कालगणनेसाठी वापर करून! १९१६ हा चालू शक संपून चैत्र प्रतिपदेला, गुढीपाडव्याला, १एप्रिलला आपण शके १९१७ चा प्रारंभ साजरा करू. सातवाहन दक्षिणेत होऊन गेला. त्यामुळे त्याचा शक इकडे विशेष प्रचारात असणे स्वाभाविक आहे. इंग्रज राजवटीचे जे जे अवशेष आजही या देशात दृढमूल झालेले दिसतात त्यात त्यांची भाषा, लिपी, कालगणना इ. पश्चिम संस्कृतीचे अनेक अंश आहेत. येशू ख्रिस्ताच्या जन्माशी निगडित अशा या कालगणनेची १९९४ वर्षे उलटून आता ९५वे वर्ष सुरू झाले आहे.

महंमद पैगंबरांच्या जीवनाशी निगडित प्रसंगातून हिजरी कालगणना सुरू झाली. सध्या १४१६ हिजरी सन चालू आहे. या कालगणनेनुसार मोहरम हा सण कधी उन्हाळ्यात येईल तर कधी हिवाळ्यातही! याचे कारण त्यांचा चंद्राशी निगडित कालगणनेचा प्रकार! ऋतू हे सारे सूर्यावर

अवलंबून असल्याने सौर कालगणना ही निसर्गाशी नाते जुळविताना अपरिहार्य ठरते. आपली दिवाळी हिवाळ्यातच येते किंवा शिमगा उन्हाळ्यातच येतो. तो आपले वर्ष हे आपण सूर्याशी निगडित ठेवलेले असल्याने. पण रामनवमी, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इ. सारे दिवस देशभर खूप महत्त्वाचे मानले जातात, पण सारे दिवस चंद्राशी, त्यांच्याच कलांशी निगडित आहेत. आपण सौरवर्षाबरोबर चंद्रमासाचा स्वीकार केलेला आहे हे ही सहाजिकच आहे. घड्याळाच्या अभावी रोजच्यारोज कालमानाचे अगदी सोपे साधन साऱ्या जगभर माणसे वापरता आलेली आहेत ते म्हणजे चंद्राच्या डोळ्यांस दिसणाऱ्या स्पष्ट कला! म्हणून सर्व धार्मिक सण समारंभात आपण हिंदुस्थानभर तिथींचा वापर करतो. पण या चंद्रकालगणनेत आपण अमावस्येनंतर नवमासारंभ करतो तर उत्तर भारतात पौर्णिमेनंतर नवमासारंभ होतो! यामुळे दक्षिण उत्तरेत महिना एक असला तरी त्यात १५ दिवसांचा फरक पडतो.

देश स्वतंत्र झाल्यावर त्याची एकात्मता इंग्रजी परंपरेच्या आधारे नव्हे तर स्वदेशी तंत्रानुसार वाढवावी या सद्हेतूने जशी एक स्वतंत्र राज्य घटना निर्माण झाली त्याप्रमाणे एक राष्ट्रीय भाषा, लिपी, ध्वज इत्यादी गोष्टी ठरवल्या गेल्या. भारतीय घटना निर्मितीनंतरही दोन वर्षे आपण केवळ ईसाई म्हणजे ग्रेगेरियन कालगणना वापरत होतो. १९५२ मध्ये भारतीय शासनाने स्वकीय कालगणनेची निश्चिती करण्यासाठी वाचस्पती मेघनाथ सहा या शास्त्रज्ञाच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. चार वर्षांनी समितीचा अहवाल अभ्यासून शासनाने राष्ट्रीय कालगणना स्वीकृत केली. या समितीने देशभर रूढ असणाऱ्या नाना प्रकारच्या कालगणना अभ्यासून देशासाठी म्हणून सौर वर्षाचा स्वीकार केला. हे परंपरेला धरूनच होते. ऋतुकालाशी निगडित वसंतपंचमीसारखे सण समारंभ त्या त्या काळी व्हायला हवे, तर वर्ष हे सूर्याच्या गतीशी निगडित हवेच. देशभरातील चांद्रमासांची व्यवस्था तशीच राहू देऊन सर्व प्रशासकीय, शासकीय व सार्वजनिक व्यवहारार्थ वापरांसाठी सौर महिने समितीने मान्य केले. इंग्रजी तारखांप्रमाणे या महिन्यात दिवस ३० वा ३१ च असतात पण महिन्याचा प्रारंभ हा प्रत्यक्ष सूर्याच्या भ्रमणाशी शास्त्रीय पद्धतीने जोडण्यात आला. आपल्याकडे सर्वात मोठी रात्र व अगदी छोटा दिवस (१० तास ४५ मिनिटे) जेव्हा असतो तो पौषमासाचा प्रारंभ दिन! हा खरा संक्रमण दिन आहे. त्या दिवशी शासीय दृष्टीने संक्रांत साजरी व्हायला हवी. उत्तरायणाचा शुभारंभ या दिवशी होतो हे आपण सूर्योदय-सूर्यास्ताच्या वेळा पाहिल्यास सहज ध्यानी येईल. मिनिटामिनिटांनी दिनमान वाढते आहे हे प्रत्यक्षच दिसते. २२ जून पासून दिवस क्रमश: लहान होत जाताना दिसतो. आषाढ मासाचा प्रारंभ या दिवशी होतो.

समसमान दिवसरात्र ज्या दिवशी असते तो या राष्ट्रीय पंचांगाचा चैत्र मासारंभ. २२ मार्च ही ती तारीख. चैत्र वैशाख वसंत ऋतू असे आपण म्हणत आलो तेही या वेळी अनुभवास

अनुभवास यते. २३ सप्टेंबरला पुनश्च समसमान दिवसरात्र दिसतात. तो राष्ट्रीय पंचांगाचा आश्विन मासारंभ!

जानेवारी महिना अमुक दिवशी का सुरू होतो याचे काही शास्त्रीय कारण सांगणे अवघड आहे. पण भारताने स्वीकारलेल्या

कालगणनेतील सारे महिने हे सूर्याच्या विशिष्ट स्थानाशी नाते दाखवतात आणि त्यांची नावेही पूर्ण भारतीय आहेत. वर्ष गणनेसाठी शकांचा स्वीकार करण्यात आलेला आहे हे ही उचितच आहे.

राष्ट्रीय कालगणनेप्रमाणे लीप वर्षी चैत्र ३१ दिवसांचा असतो व वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, हे महिनेही ३१ दिवसांचे असतात. म्हणजे ६ महिने एकतिशी तर उरलेले ६ तिशी असतात. लीप वर्षा व्यतिरिक्त मात्र चैत्र हा ही तिशी असतो. म्हणजेच एकतिशी महिने ५ उरतात व वर्षाचे ३६५ दिवस बरोबर होतात. सात महिने तिशी व पाच एकतिशी असे ओळीनेच येत असल्याने इंग्रजी महिन्यांप्रमाणे बोटे घालून



तिशी एकतिशीचा निर्णय करावा लागत नाही.

एक दिवशी शासनाने वजने मापे दशमान पद्धतीचीच वापरण्याचा कायदा काढला व देशभर शेर, पायली, अधोली, तिप्पट, निंपट हे सारे कालबाह्य होऊन गेले. आणखी एक दिवशी चलनातील १६ आणे रद्द होऊन त्यातही दशमान पद्धती आणण्यात आपण यशस्वी ठरलो.मग कालगणनेतही स्वदेशी पुरस्कृत करून उद्यापासून जर शासनाने सर्व पगार इ. राष्ट्रीय महिन्यांप्रमाणे होतील, असा अध्यादेश काढला तर चैत्राचा पगार, वैशाखाच्या रजा, फाल्गुनची वर्षअखेर इ. कितीतरी गोष्टी जनमान्य होऊन जातील.

आजचे शासकीय धोरण मात्र राष्ट्रीय कालगणना वापरण्याला विरोध करणारे आहे. ज्या संस्थांनी राष्ट्रीय महिन्यांप्रमाणे वेतनादी वाटप चालवले होते, त्या वर्षा अखेरचे हिशोब, आयकर इ. अमलात आणले होते, त्यांना शासनाने मार्च अखेरचा दंडक लावून राष्ट्रीय कालगणनेचा अपमान अधिक्षेप केला आहे.

प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्सॲक्ट अधिनियम, ११ बी अन्वये प्रसिद्ध करावयाची माहिती अर्ज क्र. ४ (नियम ८ प्रमाणे)

वृत्तपत्राचे नाव	: छात्र प्रबोधन
प्रसिद्धी काळ	: मासिक
संपादकाचे नाव व पत्ता	: प्रा.महेन्द्र सेठिया, ज्ञान प्रबोधिनी,५१० सदाशिव पेठ,पुणे ३०
राष्ट्रीयत्व	: भारतीय
प्रकाशकाचे नाव	: प्रा. महेन्द्र सेठिया
राष्ट्रीयत्व	: भारतीय
मुद्रकाचे नाव व पत्ता	: प्रबोध संपदा, १०७० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२.
राष्ट्रीयत्व	: भारतीय
मासिकाची मालकी	: ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

मी, महेन्द्र सेठिया असे जाहीर करतो की वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे.

पुणे, सौर चैत्र १, शके १९१७ सही

(२२ मार्च १९९५) महेन्द्र सेठिया

संपादक, छात्र प्रबोधन

आयगर स्वप्न पर्वत

– आनंद पाळंदे

कोणताही चांगला गिर्यारोहक जागेपणीही नेहमी एक स्वप्न पाहात असतो. जी अद्याप कोणीही केली नाही, अशी चांगली चढाई करावयास मिळावी. शिखराच्या वाटचालीत आपलाच असा एक वेगळा मार्ग असावा. ज्या मार्गावर स्वत:च्या धाडसी प्रेरणेला सतत जागे ठेवावे लागेल. जिद्द टिकवण्यासाठी पाठपुरावा करावा लागेल. कारण धोके, कठीणपणा आणि मानसिक दबाव यांची एकवटलेली शक्ती त्याला स्वप्न सत्यात आणण्यापासून परावृत्त करतील.

भारतात एकतर फार थोडेजण असे स्वप्न पाहतात.त्यातले मोजकेच त्यासाठी प्रयत्न करतात आणि पुढे पाठपुरावा न करता आल्यामुळे अर्धवट सोडतात.सह्याद्रीतील सुळके अन् कडे चढण्याच्या अशा स्वप्न मोहिमा झाल्या पण हिमपर्वताच्या बाबतीत अद्यापही पाश्चात्त्य गिर्यारोहकांकडे पहावे लागते.

आयगर आणि चांगबांग हे पर्वत चढण्याचे स्वप्न इंग्रज गिर्यारोहक ज्यो टास्करने पाहिले आणि ते प्रत्यक्षात उतरविलेही. या स्वप्नपर्वतांची प्रेरणा कशी जागृत झाली आणि त्यासाठी करावा लागणारा त्याग, सातत्यपूर्ण सराव, तळमळ, प्रयत्न आणि कौशल्य प्राप्त करण्याची धडपड हे सर्व थक्क करणारं आहे. १९६५ ते १९७५ असा हा तब्बल दहा वर्षांचा प्रवास आहे.

आल्प्समधील आयगरची उंची ३९५० मीटर आणि हिमालयातील चांगबांगची उंची ६८६४ मीटर.पण दोघांची अस्त्रे एकच.कातळ आणि हिम–बर्फ,जबरदस्त हिमवादळं,जणू उड्या घेणारे कडे, गोठवणारी थंडी आणि छाती दडपून टाकणारी त्यांची हजार मीटर उंची.आयगर उत्तर बाजू १४०० मीटर तर चांगबांगची पश्चिम बाजू १८०० मीटर.

अशा पर्वतांचे आव्हान पेलणे हे वेडे साहस करणाऱ्यांचे काम नव्हते.ज्योने या धाडसासाठी नियोजनबद्ध पावले उचलली. प्रथम डिक रेनशॉसारखा सहकारी मिळवला. क्रिव्हासेस कशा चुकवायच्या,हिमथर कसे पार करायचे,सरकते कातळकडे-भाग केव्हा पायदळी घ्यायचे,अल्टिट्यूड म्हणजे काय, भूक-भीती-थकावट यावर मात कशी करायची हे त्यांनी शिकून घेतले.कठोरपणे गरजेपेक्षा जास्त ओझे बाळगून छोट्याशा शिखरांच्या मोहीमा त्यांनी यशस्वी केल्या. रूळलेल्या वाटा चढता चढता हळूहळू ते चढाईतील नूतन मार्ग शोधू लागले.सारं जग झोपलेलं असताना गोठलेल्या खडकबर्फाच्या साम्राज्यात ते तासन् तास बसून काढू लागले. त्यांचे एकमेकांमधील सामंजस्य वाढू लागले. पर्वतांमध्ये वावरताना आवश्यक असणाऱ्या कडक शिस्तीचा ताण त्यांना सहन होऊ लागला.पर्वतारोहणत्यांच्या अंगवळणीपडले.

आयगरची चढाई उन्हाळ्यात तशी सोपी असते. म्हणून १९७३ मध्ये त्यांनी २ दिवस आणि२ रात्रीत तीही चढाई करून आपलं कसब अजमावलं.तो पावेतो आयगरची हिवाळी चढाई मात्र २-३ जणांनीच यशस्वी केली होती. कारण हिवाळ्यात तिथे वादळी गारवा,हिमाचे जाड थर,कडक गुळगुळीत बर्फ शिवाय ॲव्हलांचेस चुकवत मार्ग शोधावा लागतो.१९३५ते १९३८ या दरम्यान तिथे पुष्कळच अपघात झाले. स्विस सरकारने बंदी घालूनही गिर्यारोहक चढाईकडे वळतच होते.अखेर१९३८मध्येऑस्ट्रो-जर्मन तुकडीतील चौघांनी आयगरची अजिंक्य उत्तर बाजू चढण्यात यश मिळविले.१९५७ मध्ये तर २ जर्मन व इटलीचा १ गिर्यारोहक मदत तुकडी समोर असताना मृत्यूच्या खाईत लोटले गेले.पाश्च्यात्त्यांनी मदत तुकड्याही जवळजवळ व्यावसायिक बनवल्या आहेत. त्या अत्यंत कुशल असतात.अशा तुकड्याही आयगरपुढे हिवाळ्यात हतबल होतात.मदत करण्याच्या सामाजिक जाणिवेपोटीही १९६६ मध्ये एका नाट्यमय प्रसंगात आयगरने काही कुशल गिर्यारोहणपटूंचा घास घेतला आहे, आयगर हे सहजसाध्य आव्हान नव्हते. क्षमतेचा अंत पाहणारी आणि प्रखर झुंजीची अपेक्षा ठेवणारी ही चढाई असल्यामुळे टास्कर-रेनशॉनी २ वर्षे साधनांचीही जमवाजमव केली. थंडीपासून बचावासाठी कपडे,लोकरी बुटांवर बसणारे कातडी कवच त्यांनी जमवले. दिवस-खाद्य-इंधन-वजन यांची गणितं मांडली आणि १९७५ च्या फेब्रुवारीमध्ये ते आयगर पायथ्याला पोहोचले.

स्वित्झलँडमधील बर्निज आल्प्सस् या नावाने ओळखली जाणारी ही पर्वतराजी आहे. क्लिनशेडेग नावाचं आगगाडी स्थानक पायथ्याला आहे. इथून पुढे अभियांत्रिकीची कमाल दाखविणारे बोगदे आयगरच्या पोटातून जुंगफ्राड स्थानकापर्यंत जातात.

पायथ्याच्या हॉटेलचालिका फ्राउ आजीबाईंनी ज्यो-डिकला जणू दत्तकच घेतले. वातावरणाशी समरस होण्यासाठी पूर्वतयारी म्हणून दोघांनी ३ दिवसात ब्रेहॉर्न शिखरावर चढाई केली.

१४ फेब्रुवारीला २० रॉक पिटॉन, ३२ कॅरॅबिनर,११आईस पिटॉन,आईस ॲक्स, हॅमर,हेल्मेट अन् सहा दिवसांच्या सहा खाद्यपिशव्या पाठीवर लादून आगगाडीने तासाभरात हिमघसरीच्या टप्प्यापाशी उतरले. अन्य हिमघसरपटू आश्चर्य व्यक्त करीत असताना ही जोडी हिमात पावलं बुडवत चालू लागली.

चढाईसाठीचा पायथा एक तासाने आला. आकाश स्वच्छ होते. तो चुनखडीचा १४०० मीटर उभा पर्वत या दोन छोट्या मानवांची परीक्षा आता पाहणार होता. डोकावणारे भाग टाळून, त्यातल्या सोप्या भेगा, कंगोरे, हिमउतार, कातळटप्पे यांच्यावर आडवे तिडवे जायला लागत असल्यामुळे प्रत्यक्षात ते ३००० मीटर चढणार होते, म्हणजेच ३ किलोमीटर लांब पर्वतभाग हातापायांच्या कौशल्यावर त्यांना पार करायचा होता.

बुटांवर त्यांनी क्रॅम्पॉन बांधले. या सुळे असलेल्या जबड्यामुळे कडक बर्फात पाय रूतवून चढता येते. बूट अन् क्रॅम्पॉन यामध्ये पॉलिथीन पिशवी त्यांनी ठेवली होती त्यामुळे पायांखाली हिमाचे गोळे तयार होत नाहीत. त्यांनी कपड्यांवर चेस्ट व सीट हारनेस चढवले. कॅरॅबिनर ही उघडझाप करता येणारी धातूची आकडी हारनेस जोडण्यासाठी त्यांनी वापरली. हारनेसमुळे थोड्या वेळात दोरबद्ध होता येते आणि घसरून दोराला लटकल्यावर नुसताच दोर कमरेला बांधल्यावर जसे शरीरवजन एकाच जागी ओढ घेईल तसे न होता ठिकठिकाणी विभागले जाते. गिर्यारोहक खाली डोके अवस्थेत पडला तरी चेस्ट हारनेसमुळे तो सुरक्षित राहतो. चढताना वापरावयाचे कॅरॅबिनर, पिटॉनही हारनेसला नीट लटकविण्याची सोय असते.

सुरुवातीला ज्योचे मन नेहमीच कचरते त्यामुळे डिक पुढे झाला. दोघांनीही ४० मीटर लांबीच्या दोन दोरांची टोके आपल्या हारनेसमध्ये गुंतवली.या रचनेमुळे डिकने ४० मीटर चढाई आणि नंतर ज्योने बिले घेऊन ४० मीटर आणि पुढे ४० मीटर चढाई अशी एकूण ८० मीटर चढाई दोर न बदलता करता येई. ४० मीटरपेक्षा जास्त लांब दोर हाताळणे अवघड जाते. नेता अशावेळी पिटॉन म्हणजे खिळे ठोकत व त्यात कॅरॅबिनर अडकवून अपला दोर त्याच्या झडपेतून पार करीत असतो.दुसरा अशा वेळी दोराला विशिष्ट पद्धतीने ढील देत राहतो.नेता एका दोर टप्प्यावर पोहोचला की तो स्वत:ला अँकर करतो आणि दुसऱ्याला बिले देतो. दुसरा अशा वेळी चढताना वाटेतील पिटॉन व कॅरॅबिनर गोळा करतो. दुसरा नेत्याजवळ पोहोचला की नेता पुढाकार घेतो अन् पहिला बिले देत ढील देतो.अशी चढाई साधारण दोरलांबीत

मोजतात.

उन्हाळ्यात पहिले ४०० मीटर काही तासात पार होतात.पण डिक-ज्योना यावेळी खूपच वेळ लागला.नऊ रोपलेंथ (Rope Length) चढेपर्यंत ४-३० वाजले आणि अंधारले.

कड्यातले सगळे कंगोरे हिमाने झाकलेले होते. एका छोट्याशा कातळभिंतीजवळचे हिम दाबून त्यांनी दोघे मावतील अशी जागा करून घेतली. थंडरोधक मॅट अंथरून डाऊन जॅकेट अन् स्लिपींग बॅगमध्ये आपली शरीरे घुसवली. तंबूच्या दोऱ्या त्यांनी कातळात पिटॉन ठोकून त्यात अडकवल्या. तंबूला खांब नव्हते. मध्यरात्री हिमपात सुरू झाला आणि तो दुसऱ्या दिवशीही चालूच राहिल्याने त्यांनी मुक्काम वाढवला.

अशा तऱ्हेच्या मुक्कामाला बिव्हॉक म्हणतात. दुसऱ्या रात्री तंबू आणि कातळ यामध्ये हिमलोट घुसला. कंगोऱ्यावरून घसरू नये म्हणून त्यांनी प्रयत्नपूर्वक स्वत:ला दाबले पण तंबूत हिम घुसले ते घुसलेच. डिक ते साफ करण्यासाठी बाहेर पडला आणि हिमलोटाचा दुसरा दणका बसला. काँक्रीट घट्ट होते तसा त्यांच्याभोवती हिमथर जमला. ॲव्हलांचची शक्यता आता वाढल्यामुळे सर्व सामग्री सॅकमध्ये कोंबून त्यांनी आपला बिव्हॉक पलीकडील डोकावणाऱ्या भागाच्या पोटात हलवला. अंगावर तंबू पांघरून त्यांनी ती रात्री नुसती बसूनच काढली. रक्ताभिसरण होण्यासाठी पाय आपटत राहणे मात्र आवश्यक होते. आता माघार घेणे एवढाच उपाय शिल्लक होता.

सकाळी त्यांनी पिटॉन-कॅरॅबिनरच्या अँकरमधून दोर ओवला. डिसेंडरच्या साहाय्याने डिक प्रथम सरसरत - रॅपलिंग करीत दोराच्या दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचला.त्याने स्वत:ला अँकर केल्यावर ज्योला हाळी दिली. ज्योही दुहेरी दोर धरून सरसरत उतरला. एक टोक ओढल्यावर दुसरे टोक वर दिसेनासे झाले आणि क्रॅबमधून बाहेर पडून त्यापाशी परत आले. डिकने तोपर्यंत दुसऱ्या रॅपेलसाठी तयारी केली होती. प्रत्येक वेळी एक पिटॉन व एक क्रॅब सोडून देत नऊ वेळा ते सरसरत उतरले.

सपाटीवर मांडीएवढे हिम साठले होते. त्यातून कसातरी मार्ग काढीत त्यांनी ॲव्हलांचच्या धोक्यापासून सुटका करून घेतली.

२५ फेब्रुवारीस त्यांनी पुन: आयगरची वाट पकडली. मधले दिवस त्यांनी आळसात न घालवता निसर्गयात्रा, हिमघसर अशा उपक्रमात घालवले. जंगलाचे माथे अजून हिमच्छादित होते पण सगळे ताजे हिम धुवून गेल्यामुळे आयगर स्वच्छ झाले होते.यावेळी पहिल्याच दिवशी त्यांनी १६ रोपलेंथ मजल मारली.समोर ३० मीटरचा अवघड कातळकडा लागल्यावर त्याच्याच पोटातील एका गुहेत त्यांना बिव्हॉकसाठी जागा मिळाली.हिम खणून त्यांनी ती अधिक प्रशस्त केली. आता त्यांना गुडघ्यात स्टोव्ह पकडून अन्न पकवायची आवश्यकता नव्हती.

दुसऱ्या दिवशी कातळकड्यावर डिकने

प्रयत्न सुरू केला. प्रत्येक पकडीपूर्वी हातावर फुंकर घालून ते गरम करावे लागत होते. इकडे दोन तास उभे राहून दोराला ढील देताना ज्यो कंटाळून गेला. गारठ्याने पाय दुखूही लागले. पण डिक अतिशय हुशारीने चढत होता. आणखी एका तासाने डिकने तो अवघा ३० मीटर उंचीचा कडा चढण्यात यश मिळवले. पिटॉन हातोड्याने ठोकून तो सुरक्षित झाला. वरून बिले असल्यामुळे ज्यो त्यामानाने आरामात चढू शकत होता. पण वाटेतच डिकच्या सुंदर चढाईकौशल्याची आणि हळूहळू पुढे सरकत राहण्याच्या जिद्दीची मनोमन प्रशंसा करीत होता.



संध्याकाळ होत आली. हिम तुडवीत ते एका अवघड भेगेपाशी पोहोचले. पायथ्याशी बिव्हॉक शक्य नव्हता. त्यामुळे ज्योने हेड टॉर्च लावून भेगेत हात अडकवीत वर सरकणे सुरू केले. २५ मीटर उंचीची भेग पार करून ज्योने दोर बांधला. रात्र झाली होती. डिक प्रुसिक क्लॅम्पच्या साहाय्याने वर चढून आला. हा क्लँप वर सरकतो पण खाली घसरत नाही. तरीही असे चढणेही दमवणारे असते.

हिम आणि बर्फ खणून सपाटी करण्यासाठी त्यांना ३ तास खपावे लागले आणि रात्री ९ वाजता ते बॅगेमध्ये आडवे होऊ शकले.

तिसऱ्या दिवशी त्यांना कड्याचा ४० मीटर लांब भाग आडवा पार करायचा होता. हिंटरस्टॉयसर या एका आरोहकाच्या नावाने हा भाग प्रसिद्ध आहे. त्याने सर्वात प्रथम हा भाग पार करण्याचा मार्ग शोधला. पण दुर्दैवाने पुढे चढाई सोडून परत येताना त्याचा हृदयद्रावक अंत झाला.

डिकने आडवी सुरेख पार केली आणि 'स्वॅलोज नेस्ट' बाजूला ठेवीत त्यांनी पुढे पहिल्या बर्फ मैदानाच्या कडेने चढाई केली. 'स्वॅलोज नेस्ट'मध्ये सुरक्षितपणे राहता येते. आणि उन्हाळी चढाईत इथेच पहिला बिव्हॉक त्यांनी केला होता.

आता चढाई बर्फाळ भिंतीवर होती. क्रॅम्पॉनचे पुढील खिळे पाय मारून रूतवायचे, आईस ॲक्स जास्तीत जास्त वरती ठोका मारून त्याचे टोक रूतवून वर सरकायचे अशी ही खरं म्हणजे कंटाळवाणी कवायत असते. प्रत्येकाने ४ रोपलेंग्थ चढाई केली आणि जेमतेम अर्धा मीटर रूंद जागी बिव्हॉक केला. छाती आणि पाय दोन्ही नायलॉन दोराने पिटॉनला अडकवून ते आडवे झाले. ते संपूर्ण कपड्यात झोपत असत. क्रॅम्पॉन, बूट आणि गॉगल काढून ठेवावा लागे. फक्त सकाळीच एकदा ते विधी उरकण्यासाठी कपडे बाजूला करीत. अशी शिस्त थंडवाऱ्यापासून अंतर्भाग वाचवण्यासाठी योग्यच होती.

चौथा दिवस उजाडला. ३०० मीटरची बर्फाळ चढाई आज होती. कडक, काळ्या बर्फाच्या त्या भिंतीवर क्रॅम्पॉन अन् ॲक्सचे टोक हजार वेळा रूतवायचे म्हणजे जीवघेणा प्रकार होता. पण ज्योही आता सुरुवातीच्या निराशेतून बाहेर पडला होता. कष्टसाध्याची मजा आता ते चाखू लागले. बर्फाळ कड्यानंतर कातळकडा चढताना मात्र त्यांचे हात गारठ्याने सोलवटून निघाले. पण अखेर त्यांनी 'डेथ बिव्हॉक'ची जागा मिळवली. इथेही ३ तास खपून त्यांनी आपलं मृत्यूच्या ओठातील घर सजवलं. १४ रोपलेंग्थ चढाईनंतर वर हे असं झगडणं म्हणजे ते क्षमतेचा अंतच पहात होते.याच जागी १९३५ साली पहिली झुंज देणारे दोन गिर्यारोहक गारठून मरण पावले होते. ज्यो-डिकला भुतांची सहानुभूतीच असणार होती हे निश्चित. पण हेही खरं होतं की हिमवादळ सुरू झाले तर हीच शेवटची जागा माघारी परतण्यासाठी योग्य होती. यावरच्या शिल्लक राहिलेल्या एकतृतीयांश भागात फक्त वर चढण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

पाचव्या दिवशी तिसऱ्या बर्फाळ टप्प्याचा लांबच लांब तिरका पन्हाळीसारखा भाग त्यांना चांगलाच दमवून गेला. एकमेकांचे नेतृत्व करण्यावरून, सॅकचे ओझे बाळगण्यावरून खटकेही उडाले. अन् ते साहजिकच होते. कशीबशीच एक चिंचोळी कंगोरी त्यांना रात्री बसण्यासाठी मिळाली. कंबरेच्या दोरांवर ते पिटॉनला जणू लटकूनच डुलक्या घेत होते.

'ट्रॅव्हर्स ऑफ द गॉडस्' अर्थात देवांचा मार्ग खरोखरच नावाप्रमाणेच कठीण श्रेणीचा आहे. या भागात कातळावर बर्फाचा थर जमलेला असतो आणि त्यामुळे घसरगुंडीला वेळ लागत नाही. हा भाग पार केल्यावर व्हाईट स्पायडरमध्ये अतिशय कष्टदायी बर्फाची भिंत कोळ्यासारखी बिलगून चढावी लागते. क्रॅम्पॉनच्या ठोक्याने बर्फाचे तुकडे इथे उडत होते. प्रत्येक पावलागणिक ज्यो स्वत:वर वैतागत होता. कारण हॅमर मारताना बोटांची कातडी सोलवटली जात होती.

हेही २०० मीटर पार झाले. पण शेवटची सर्वात कठीण भेग होतीच. डिकने सफाईने ती पार केली आणि सूर्याने प्रथमच त्यांना न्हाऊ घातलं. आता उंची शेकड्यात मोजता येईल एवढीच राहिली होती, पण पायाखाली ढिसाळ घसारा त्यांना कड्यावरून फेकून द्यायला सज्ज होता.

(पान ७३ वर पुढे चालू)

कल्पक बनूया

भरारी आठवी

स्मरणाची भटकंती

– डॉ. अशोक निरफराके

कल्पक माणसाला नेहमी नवीन नवीन कल्पना सुचत असतात. पण हे सुचणे म्हणजे आपोआप घडणारी जादू नसते. उलट कल्पना सुचणे हे वेगळ्या पद्धतीने विचार करण्याचे फळ असते. जो विचार करतो किंवा ज्याच्या मनात विचार चालू असतात त्यालाच कल्पना सुचतात.

विचार चालू असणे म्हणजे मनातल्या मनात माहितीच्या किंवा ज्ञानाच्या छोट्या छोट्या तुकड्यांबाबत वेगवेगळ्या घडामोडी किंवा प्रक्रिया चालू असणे. ही माहिती मनातच साठलेली असते. ती आठवणे, तिचे स्मरण होणे हीच विचार करण्याची पहिली पायरी. काही वेळेला ही माहिती ज्या स्वरूपात लक्षात ठेवली त्याच स्वरूपात त्याच क्रमाने आठवली तरी विचाराचे काम भागते. उदा. आज कुठली भाजी करावी? असा विचार करणाऱ्या आईला गेल्या आठवड्याभरात केलेल्या भाज्या यांची नावे आठवली तरी पुरेसे आहे. या प्रकारच्या आठवण्याला म्हणतात **'साधे स्मरण'**.

पण स्मरणाचा आणखी एक प्रकार आहे. आणि तो कल्पक विचाराला जास्त उपयोगीअसतो.त्याला म्हणतात**'स्थानांतरित स्मरण.'**साध्या शब्दात त्याला आपण **'स्मरणाची भटकंती'**म्हणू या.या प्रकारात आठवली जाणारी माहिती आठवणींच्या कपाटाच्या एकाच कप्प्यात साठवलेली नसते.तर ती अनेक कप्प्यांमध्ये विखुरलेली

असते. आणि त्यामुळे स्मरणशक्तीला अनेक ठिकाणी भटकावे लागते. स्थानांतर करावे लागते. स्मरणाची ही क्रिया जर आपल्याला करता आली तर आपल्याला नवीन कल्पना सुचायला मदत होते. सरावाने आपल्याला ही क्रिया भरभर करता येते. तसे झाले की आपल्याला नवीन कल्पना झटकन सुचू शकते. त्यालाच आपण कधीकधी हजरजबाबीपणा किंवा प्रसंगावधान म्हणतो.

भिंतीवर चित्र टांगण्यासाठी खिळा ठोकायचा आहे आणि ऐन वेळी हातोडी सापडत नाही. अशा वेळी हातोडीसारख्या, हातोडीला पर्याय ठरू शकणाऱ्या वस्तूंची यादी शब्दांच्या रूपात किंवा प्रतिमांच्या म्हणजे चित्रांच्या रूपात झटकन मनात तरळून जाते. हे तरळून जाणे म्हणजे 'स्मरणाची भटकंती' त्यानंतर अर्थातच त्या वस्तूंची आपण मनातल्या मनात तपासणी करतो. त्यासाठी ती वस्तू पुरेशी कठीण आहे का? हातात धरता येईल का? खिळ्याच्या डोक्यावर नेकमा ठोका बसेल का? अशा अनेक कसोट्यांचा वापर आपण करू. हे सगळे मनातल्या मनात अर्ध्या मिनिटात घडले तर आपण हातोडीऐवजी बत्ता वापरू.

पुष्कळ वर्षांपूर्वीचा प्रसंग आहे. प्रभाकर पाध्ये यांच्या घरी श्री. पु.ल.देशपांडे यांच्याशी माझी भेट झाली. मला बघताच ते म्हणाले ''परवाच तुमच्या प्रबोधिनीतून आम्ही तांदूळ विकत आणले. तिथे तांदूळ मिळायला लागल्यापासून 'ज्ञान' प्रबोधिनीऐवजी 'धान' प्रबोधिनी म्हणावे की काय असे मला वाटू लागले आहे.'' त्यावर मी त्यांना म्हणालो, ''मग तर तुम्ही 'परिधान' प्रबोधिनी असेही म्हणू शकाल. कारण हल्ली तेथे स्वेटरही विकत मिळतात!'' त्यावर पु.लं.नीही हसून दाद दिली.

प्रत्यक्ष घडलेल्या या संवादात पु.ल. 'तांदूळ' प्रबोधिनी म्हणाले असते तर मुळातच मजा आली नसती. तांदुळाला असलेला 'धान' हा शब्द 'ज्ञान' या शब्दाशी यमक साधणारा होता. तो त्यांना तत्क्षणी सुचला, आठवला. त्यांच्या शेऱ्यातून तिरकसपणा किंवा कौतुक असा कोणताही अर्थ निघू शकत होता. तो ऐकून त्याच भाषेत प्रत्युत्तर देण्यासाठी माझ्या मनात विचार सुरू झाला असणार. 'धन' या शब्दाच्या जवलपासचे प्रधान, विधान, संघान, अनुसंधान असे अनेक शब्द माझ्या मनात तरळले असणार. पण प्रबोधिनीत विकल्या जाणाऱ्या अनपेक्षित वस्तूंपैकी, प्रबोधिनीच्या दिल्ली कार्यालयातील कार्यकर्त्यांनी विक्रीसाठी पाठवलेले स्वेटर मला आठवले. त्याच्यासाठी वापरता येईल असा 'परिधान' हा शब्दही आठवला. आणि त्यामुळे कोटीवर कोटी होऊ शकली. म्हणजे 'ज्ञान' किंवा 'धन' यांच्याशी यमक साधणारे शब्द आठवणे ही स्मरणाची 'भटकंती' ती करता आली पाहिजे. पण तिथेच थांबून उपयोग नाही. आठवलेल्या शब्दांतून चपखल शब्दाची निवडही झटकन करता आली पाहिजे.

या स्मरणाच्या भटकंतीचा सराव करण्यासाठी नमुन्यादाखल काही प्रश्न पुढे

A man without patience is a lamp without oil

दिलेले आहेत. त्यांची उत्तरे पहा. आणि नंतर तुमचे तुम्हीच तसे प्रश्नही रचून ते मित्रांना आपापसात सोडवायला सांगा. प्रश्नातले महत्त्वाचे सूत्र हे की त्याची उत्तरे आपल्या स्मृती भांडारात तयार यादीच्या स्वरूपात असता कामा नये. तर ती अनेक कप्प्यांमध्ये विखुरलेली असली पाहिजेत. म्हणजेच मुळात ती आपल्याला वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या प्रसंगी आणि वेगवेगळ्या संदर्भात माहिती झालेली असली पाहिजेत.

१) मुळातच, म्हणजे निसर्गत:च किंवा सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या स्वरूपातच. ज्यांचा रंग निळा असतो अशा गोष्टींची यादी करा. उदा. नीळ, शाई, मोराचा गळा इ.

२) लिहिण्यासाठी उपयोगी पडू शकेल अशा साहित्याचे वेगवेगळे संच सुचवा. उदा. कागद, पेन, शाई, काठी व जमीन, शकुंतलेने वापरले तसे कमळाचे पान व करंगळीचे नख.

३) होळीमध्ये पर्यावरणाची हानी होऊ न देता कोणकोणत्या वस्तू जाळता येतील? उदा वाळलेले गाजर गवत, तण, किंवा जलपर्णी, पाचोळा, लॉटरीची तिकीटे इ.

४) ज्यांमध्ये नायिका समर्थ, शूर, धडाडीची दाखवलेली आहे अशा कोणकोणत्या कथा, कादंबऱ्या किंवा नाटके, चित्रपट तुम्हाला माहीत आहेत?

५) आठवणे, विसरणे, स्मरण, विस्मरण भूलना, भुलाना वगैरे सारखे शब्द ज्यामध्ये आलेले आहेत अशा विविध भाषांतील गाण्यांच्या ओळी सांगा.

(पान ७० वरून पुढे चालू)

अखेर शिखराजवळ त्यांना हिमपाताने पुन: गाठलंच आणि बिव्हॉक तंबू डोक्यावर ओढून ते दृष्टीभय वाटेल अशा जागी घट्ट बसून राहिले.

पेट्रोल-स्टोव्ह पेटवून त्यांना फक्त गरम पाणी पिता आले. हिमपाताने रात्री त्यांची पार त्रेधातिरपीट उडाली. स्लिपींग बॅगमधील गरमीमुळे घाम आणि त्यामुळे जखमा झोंबत असताना रात्र झोपेशिवाय जाणार हे उघडच होते. सहावा बिव्हॉक संपवून त्यांनी सकाळी खाणंपिणं विसरून शिखराकडे धावच घेतली.वादळाचा जोर वाढायच्या आत शेवटचे बर्फाचे सोपे टप्पे पार करून त्यांनी अखेर माथ्यावरचा सर्वोच्च शिखरबिंदू गाठला. शिखरावरून काहीच दिसत नव्हते. सर्व धुक्याआड. एकमेकांचे मूक अभिनंदन करून ते वायव्य बाजूने उतरू लागले. चांगबांगचे स्वप्नही पीटर बोर्डमनच्या साथीने ज्यो टास्करने पुढील वर्षी प्रत्यक्षात उतरवले. (ज्यो टास्कर यांच्या 'सॅव्हेज अॅरेना' वर आधारित)

अशा वेळी खूप ताण येतो

– अनघा कुकडे–लवळेकर

'आजकालचं जग म्हणजे नुसती घाई गडबड! बघा ना परीक्षेत तीन मार्क कमी पडले म्हणून अनितानं जेवणच सोडलंय' 'अहो आमच्या मृणालला तर परीक्षेचे दिवस जवळ आले की जेवणच जात नाही.' 'मला तर बाई कुणाशी वाद घालायचा म्हणजे थरथर कापायलाच होतं – शब्दच फुटत नाही' अशी अनेक विधानं (COMMENTS) आपण नित्य ऐकत असतो – स्वत:सुद्धा करत असतो. काही प्रसंग, अनुभव असे असतात की ज्यामुळे आपण खूप अस्वस्थ बनतो, अगदी 'आता सहन होत नाही,' असं वाटतं. हे कशामुळे? तर ताणामुळे.

'ताण' ही काय विचार करायची का गोष्ट आहे? तो असणारच! परीक्षेचं tension आल्याखेरीज अभ्यास होणार का? काम पूर्ण केलंच पाहिजे असं tension नसेल तर आळशीपणाला निमंत्रणच! असंही आपल्या मनात येईल. पण रबरासारखी एखादी लवचिक गोष्टही मर्यादेपेक्षा जास्त ताणली तर तुटून जाते. तसंच आपल्या मनाचं, शरीराचंही आहे. मनावरचा, शरीरावरचा ताण जर फारच वाढला तर आपलं कार्यक्षम शरीर, मन कोसळू शकतं. अगदी दुरुस्तीच्या पलीकडेसुद्धा!

आज आपण प्रामुख्याने मनावरच्या ताणाचा विचार करणार आहोत. खरंच आजच्या Fast Food, Jet Ageच्या जमान्यात चहूबाजूंनी आपल्या मनावर इतक्या गोष्टी येऊन आदळत असतात की ज्याचं नाव ते. पन्नास वर्षांपूर्वी मॅट्रिकच्या परीक्षेत साठ टक्के म्हणजे गगनाला हातच टेकणं होतं. आज ९५ टक्के मिळाले तरी हव्या त्या शाखेला प्रवेश मिळेल का नाही याचा ताण असतो. वेळेवर लोकल मिळेल का? इंटरव्ह्यूला नेमकं अभ्यास न केलेलं विचारलं

तर? मुंबई – पुण्यासारख्या शहरात तर उठल्यापासून झोपेपर्यंत – झोपेतसुद्धा आपण ताणाच्या तावडीतून सुटत नाही. हा बाटलीतला राक्षस जोपर्यंत बंद आहे तोवर गप्प बसेल पण जर का बूच उघडलं तर तो अक्राळविक्राळ रूप दाखवणारच. ताण जर आपल्या नियंत्रणाबाहेर गेला तर तोच आपला ताबा घेईल.

ताण नेहमी ओळखता येतोच असं नाही. काही वेळा तो उघडपणे जाणवतो तर बऱ्याचदा गुपचूप लाकूड पोखरणाऱ्या वाळवीसारखा तो मन पोखरत असतो. सुप्तपणे आपल्या अबोध मनावर दबाव आणत असतो. मग एखादी मुलगी, अभ्यासावरून आई रागावली तर सडकून आजारी पडते किंवा एखादा मोठ्ठा मॅनेजर छोटच्या कामातसुद्धा चुका करायला लागतो. महत्त्वाच्या मॅचच्या आदल्या दिवशी कुणाला सडकून ताप भरतो, तर एखाद्या अनपेक्षित संकटाची वार्ता ऐकून कुणी चक्कर येऊन पडतो. इतकंच काय पण मानसिक रुग्णही बनतो.

हेसगळं का होतंकसं होतं हे तर आपल्याला जाणून घ्यावंच लागेल. शिवाय हा ताण कमी करण्याचे, त्याला नियंत्रणात ठेवण्याचे काही उपायही आपण लक्षात ठेवले पाहिजेत. म्हणजे मग वंगण घातलेल्या गाडीप्रमाणे न कुकुरता आपली गाडीही सुरळितपणे, अलगदपणे चालू शकेल. हान्स सेली नावाच्या शास्त्रज्ञाने ताणाचा एक आलेखच मांडला आहे.

आकृती पुढे दिली आहे.



(धक्कादायक 'गजर'प्रतिकार असहाय्यता अनुभव)

जो ताण मुळात आपल्याला जाणवत असतो त्यामुळे आपली (क प्रमाणे) नैसर्गिक अवस्था थोडी विचलित होते. (अ प्रमाणे) वर्तन तणावपूर्ण अस्वस्थ बनतं. याच काळात आपण ह्या ताणावर विजय मिळवण्याचा प्रयत्न करत असतो, प्रतिकार करत असतो. पण जर हा प्रतिकार, समायोजन व्यवस्थित होऊ शकले नाही, तर मात्र एक असहायतेची भावना मनात निर्माण होते (ब प्रमाणे) म्हणजेच आपण ह्या ताण राक्षसाच्या कह्यात जाऊन संयम, तर्कबुद्धी, विवेकबुद्धी न वापरता अनावरपणे भावना व्यक्त करायला लागतो. सतत चिडचिड, आरडाओरडा, अतीव निराशा, अगतिकपणा अशा विघातक प्रतिसादांचा सतत वापर होऊ लागतो.

ताण केवळ मनावरच नव्हे तर शरीरावरही विपरित परिणाम करत असतो. अनेक प्रकारच्या शारीरिक व्याधी मानसिक ताणातून

निर्माण होत हे ऐकून बऱ्याच जणांना आश्चर्य वाटतं. पण हे सत्य आहे.

दमा,अस्थमा,काही त्वचारोग,अपचन, आतड्यांच्या जखमा,मधूमेह अशा अनेक रोगांना मानसिक ताणामुळे चालना मिळू शकते.ताणामुळे उत्तेजित होणाऱ्या अंतस्त्रावी ग्रंथी (Hormonal glands) इ. मुळे शरीराचे संतुलन बिघडू शकते.

यामागील मानसिक कारणांमध्ये प्रामुख्याने तीव्र निराशा, सामाजिक, आर्थिक परिस्थितीने लादलेला अतिरिक्त कामाचा भार, कामातला तोचतोचपणा, एकटेपणा अशी कितीतरी कारणं आहेत.

शारीरिक कारणांमध्ये शरीरातील काही चक्रांचे असंतुलन(उदा.वेगवेगळ्यापाळ्यांच्या कामाच्या कामगारांचे झोपेचे संतुलन बिघडते.आणि त्यांच्या मन:स्वास्थ्यावर परिणाम होतो.)ताण निर्माण करू शकते. सकस आहाराचा अभावही शरीरात व पर्यायाने मनावर ताण निर्माण करू शकतो. उदा.ताणाच्या समायोजनाकरिता आवश्यक असलेले Vitamin B व Vitamin C पुरेसे शरीरात नसणे,किंवा धूम्रपान करणे,अतिरिक्त मीठ खाणे इ.मुळेही शरीराच्या नैसर्गिक समतोलावर विघातक परिणाम होऊन ताण निर्माण होतो. इतकेच काय पण अतिरिक्त आवाज किंवा भयाण शांतताही मनावर ताण निर्माण करते.

ही झाली मानसिक किंवा शारीरिक कारणं.पण कधी कधी काही व्यक्तिमत्त्वाचा ढाचाच असा बनलेला असतो की ते आपणहून ताणयुक्त प्रसंग ओढवून घेतात.अगदी'आ बैल मुझे मार'सारखी स्थिती.उदा. काहीजणांना एकाच वेळी खूप प्रकारची कामे करायची,ओढवून घ्यायची सवय असते. साहजिकच या सगळ्या कामांचा ताण साचत साचत डोंगराएवढा होणारच.'अष्टावधानी' असणं चांगलंच. पण तेही स्वत:ची क्षमता ओळखून आणि व्यवस्थित नियोजन करूनच. अन्यथा सतत चिंता,काळजी,अपेक्षाभंग, निराशा अशा भावनांनी ताण वाढण्याचाच जास्त संभव.

काही व्यक्ती स्वभावत:च आक्रमक,तापट असतात.या तापटपणामुळे क्षुल्लक प्रसंगातही चिडचिड होते.संताप होतो. अंत:स्त्रावी ग्रंथींना चालना मिळून अतिरिक्त स्त्राव निर्माण होतो, जो शरीराला हानी पोहोचवू शकतो.काही व्यक्तींची जीवनात यशस्वी होण्याकरता अविश्रांत मेहनत चालू असते.पण जे ध्येय गाठायचं असतं तेच नेमकं ठरलेलं नसतं.यामुळेही सतत मनावर दबाव, ताण येतो. काम फसल्यासारखं वाटतं.

या सर्वांपेक्षा महत्त्वाचं म्हणजे व्यक्तीची स्व-प्रतिमा म्हणजेच स्वत:च्या गुणांबद्दल, क्षमतांबद्दल असलेली योग्य कल्पना.न्यूनगंड असलेल्यां व्यक्तीला स्वत:च्या क्षमतांबद्दल विश्वासच नसतो.म्हणून ती सतत ताणाखाली रहाते.सततचं परावलंबित्व,दुबळेपणा, स्वत:लाच कमी लेखण्याची प्रवृत्ती, निराशावाद हे मनावरचा ताण अधिकाधिक तीव्र करत असतात. अशा अतिरिक्त ताणाला प्रतिकार करण्याकरिता (खरं म्हणजे विसरण्याकरिता) त्या व्यक्ती व्यसनांसारख्या घातक -बाह्य गोष्टींचा उपयोग करू लागतात.

दारू, गर्द धूम्रपान या सारख्या गोष्टींमुळे त्यांना वरवर मोकळेपणा वाटतो खरा. पण त्यांच्या शरीराची हानी होते शिवाय या दुष्टचक्राला ती माणसे चक्क शरण जातात. अतिरिक्त ताणामुळे लक्ष विचलित होऊन अपघात होऊ शकतात. व्यवसायात चुकीचे निर्णय घेतले जातात. आत्महत्या हा तर असहायतेच्या भावनेचा सर्वात भीषण आविष्कार.

पण मग हे सगळं टाळण्याची, निदान ताणाला आपल्या काबूत ठेवण्याकरिता काही गुरूकिल्ली नाही का? असा प्रश्न आपल्याला सहज पडतो. याकरिता अर्थातच कुठलीही बाह्य साधनं आपल्या फार उपयोगी पडत नाहीत. शरीरातल्या रोगजंतूंचा प्रतिकार करण्याकरिता जशी पांढऱ्या रक्तपेशींची ताकद वाढवावी लागते तसंच या 'ताणा'वर ताबा मिळवायला काही उपयांचा विचार निश्चित करता येईल.

१) उद्दिष्टांची निवड आणि निश्चिती– कोणतंही काम करताना प्रथम आपल्याला या कामात नेमकं काय गाठायचं आहे ते ठरवणे. त्याकरिता उपलब्ध साहित्य, वेळ, व्यक्ती आणि स्वत:ची कुवत, क्षमता या सर्वांचेच गणित, ढोबळपणे मांडलं तर शक्ती आणि वेळ या दोन्हीचा अपव्यय टाळून उद्दिष्ट गाठता येईल आणि मनावर अवास्तव ताण येण्याचाही संभव नाही.

२) मोकळे होणे – एखादं जड ओझं पाठीवरून उतरल्यावर कसं हलकं हलकं वाटतं, तसंच आपल्या मनावरच्या ताणाचं ओझं उतरावयाचं ते कुणाकडे तरी मोकळेपणी बोलून. अर्थात सारख्या तक्रारी, कुरकुर, किटकिट करणं म्हणजे मोकळं होणं नव्हे आणि वाटेल त्या व्यक्तीकडे बोलणंही ठीक नव्हे. ज्या व्यक्तीवर तुमचा खूप विश्वास आहे, जिच्या नुसत्या समजून घेण्यानंही आपल्याला बरं वाटेल ही खात्री तुम्हाला आहे आणि जी व्यक्ती 'pass on game' सारखं आपलं बोलणं पसरविणारी नाही अशी कुणीही – कोणत्याही वयाची व्यक्ती आपल्याला हा ताण वाटून घेण्यात,तो हलका करण्यास मदत करू शकते.

३) योग्य निर्णय आणि माघार – कधी कधी आपल्याला असं वाटतं की यापुढे घडणारा एखादा प्रसंग नक्कीच आपल्याला खूप ताण देणारा आहे. उदा. बाईंनी अगदी आदल्या दिवशी, दुसऱ्या दिवशीच्या वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यायला सांगितला आणि घटक चाचणी ही तोंडावरच आहे. साहजिकच ताण दुप्पट. मग अशा वेळी सौम्यपणे पण निर्धाराने वक्तृत्वात भाग घ्यायला नकार देऊन आपण निम्मा ताण कमी करू शकतो. किंवा 'घटक चाचणीत थोडे कमी गुण मिळाले तरी चालतील पण वक्तृत्वाचं आव्हान स्वीकारून तयारी करू' असं तरी ठरवावं लागतं.

४) विधायक स्वप्रतिमा – म्हणजेच आत्मविश्वास! (गर्व नव्हे) स्वत:च्या क्षमतांची आणि गुणदोषांची योग्य कल्पना असली म्हणजे अवाजवी ताण येण्याआधीच आपण कामाचा आराखडा निश्चित करून आपल्या क्षमतेनुसार काम सुरू करू शकतो. त्यामुळे आयत्या वेळच्या धावपळीचा आणि गडबडगोंधळाचा ताण कमीत कमी येतो.

५) इतरांच्या बोलण्याचा विधायक अर्थ बरेचदा मित्रमैत्रिणींच्या काही साध्या साध्या टीकाटीप्पणीवर आपणच खूप विचार करीत बसतो आणि मनावरचा ताण वाढत रहातो. ताणाचा असा डोंगर रचण्यापेक्षा त्या त्या विधानातला विधायक अर्थ तेवढा लक्षात ठेऊन बाकीचा विसरून जायचं. अगदीच वाटलं तर चक्क त्या व्यक्तीजवळ जाऊन तिच्या टिप्पणीचा मोकळेपांनं खुलासा मागायचा म्हणजे ताण निर्माण होऊन वाढण्यापूर्वीच त्याचा निचरा करता येईल.



याशिवाय काही शारीरिक व्यायामही असे आहेत की ज्यामुळे ताण सहन करण्याची शारीरिक व मानसिक क्षमताही आपण वाढवू शकतो. शिवाय ताणाच्या प्रसंगी या व्यायामांमुळे त्याची तीव्रताही कमी करू शकतो.

१) नियमित व्यायाम – योगासने, सूर्यनमस्कार, भरभर चालणे इ. व्यायामातून एकाग्रता आणि शरीराची प्रतिकारशक्ती वाढते.

२) स्वयंसूचना – शवासन – शरीर शिथिलीकरण इ. मध्ये डोळे मिटून शांत पडून राहात एकेका अवयवाला शिथिल होण्याची सूचना देत अखेर सर्व शरीर काही क्षण पूर्ण ताणरहित करता येते. योग्य व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली हे तंत्र जर शिकून घेतले तर ताण कमी करण्याकरिता निश्चितच उपयोग होतो.

३) विश्रांतीचा वापर – ज्या रोजच्या विश्रांतीच्या वेळा असतील त्यामध्ये शक्यतो पूर्ण, शांत विश्रांती घ्यावी किंवा खूप ताणाच्या वेळी चक्क पाच दहा मिनिटे मधेच डुलकी घ्यावी किंवा बसल्या जागीच डोळे मिटून एखाद्या गोष्टीवर एकाग्र होऊन विचार केंद्रित करावेत.

४) आहार – मेंदूच्या ज्या भागातून ताणतणावांवर नियंत्रण केलं जातं त्याच्या पोषणाकरता प्रामुख्याने व्हिटॅमिन **C.B.** आणि **E** ची आवश्यकता असते. त्यामुळे प्रतिकारशक्ती आणि संतुलनाला मदत होते.

हे सगळं वाचल्यावर आता एक छोटासा गृहपाठही करू या. खाली काही गोष्टी सुचवल्या आहेत त्या पूर्ण करून कळवा. (अजिबात tension घेऊ नका. ही परीक्षा नाही आणि अमुक तारखेपर्यंत करा असा फतवाही नाही).

१. तुम्हाला जास्तीत जास्त ताणाचे वाटणारे प्रसंग किंवा परिस्थितीपासून कमीतकमी ताणाच्या परिस्थितीपर्यंत एक यादी तयार करा.

२. घरातल्या इतर व्यक्तींना कोणकोणत्या प्रकारचे ताण जाणवत असतील ते चक्क रकाने करून कल्पनेने अथवा इतरांना विचारून लिहून काढा.

३. यातले कुठले कुठले ताण तुम्हाला वर दिलेल्या यादीतले एक किंवा अधिक उपाय वापरून कमी करता आले असते त्यावर विचार करा व लिहून काढा.

४. आता जाणवणाऱ्या ताणांवर शिथिलीकरण तंत्राचा वापर करून काही उपाय करता येतो का ते पहा.

५. जर यातील काही उपायांचा तुम्हाला उपयोग झाला, तर आम्हाला त्याबद्दल लिहून कळवा.

पालक-शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिराचा प्रस्ताव

विविध ठिकाणच्या पालक मेळाव्यांमध्ये काही पालकांनी छात्रप्रबोधन द्वारा आपापल्या गावांमध्ये विविध उपक्रम राबवून पाहण्याची इच्छा व्यक्त केली होती. हे सर्व उपक्रम राबविण्यासाठी पुरेसा अनुभव वा त्यासाठी आवश्यक किमान प्रशिक्षण नसल्यामुळे वेळ व इच्छा असूनही कार्यक्रम राबविता येतील की नाही याबाबत त्यांना शंका वाटते. त्यादृष्टीने जे पालक-शिक्षक आठवड्यातून दोन ते तीन तास अशा प्रकारचे उपक्रम राबविण्यासाठी वेळ देऊ शकतील अशांसाठी पुण्यामध्ये ३ ते ४ दिवसांचे एक शिबिर घेण्याची योजना आहे. या शिबिरामध्ये प्रबोधिनीतील जे शैक्षणिक उपक्रम पुढील वर्षात आपापल्या गावांमध्ये स्वतंत्रपणे आपण राबवू शकाल अशा उपक्रमांबाबत तपशीलवार माहिती घेणे,चर्चा व नियोजन करणे असा कार्यक्रम असेल.त्या अनुषंगाने ज्ञानप्रबोधिनीच्या विविध विभागांचा,प्रकल्पांचा व व्यक्तींचा परिचयही होईलच.हे शिबिर १५ मे ते २५ मे १९९५ अथवा १० जून ते २५ जून १९९५ या कालावधीत ४ दिवस घेणे शक्य आहे. आपल्यापैकी ज्या पालक-शिक्षकांना या शिबिरामध्ये सहभागी होण्याची व याद्वारे पुढील वर्षात तसे उपक्रम राबवून बघण्याची इच्छा आहे, अशांनी ३० एप्रिलपर्यंत खालील मुद्यांच्या आधारे सविस्तर पत्र पाठवावे.मिळणाऱ्या प्रतिसादावर आधारित शिबिराची निश्चिती केली जाईल व त्यानुसार ५ मेपर्यंत आपल्याला सविस्तर पत्र पाठविले जाईल.शिबिराचे शुल्क साधारणपणे १०० ते १५० रुपये असेल.

प्रतिसादात अपेक्षित मुद्दे

१. नाव, संपूर्ण पत्ता, व्यवसाय **२.** यापूर्वीचा विद्यार्थ्यांसाठी काही कार्यक्रम करून बघण्याचा अनुभव असल्यास त्याबाबत **३.** स्वत:संबंधी व कुटुंबासंबंधी थोडक्यात माहिती - कला, छंद, वय, कुटुंबातील सदस्य काय करतात? इ. **४.** प्रबोधिनीशी संबंध, छात्र प्रबोधन सभासद म्हणून अथवा अन्य कोणाद्वारा, केव्हापासून. **५** कोणत्या कालावधीत शिबिरात सहभागी होण्यास आवडेल - १५ ते २५ मे / १० ते २५ जून/ अन्य कोणता कालावधी **६.** शिबिराबाबत अपेक्षा, वर सुचविलेल्या विषयाव्यतिरिक्त अन्य कोणत्या विषयांचा समावेश शिबिरात व्हावा. **७.** अन्य प्रतिक्रिया, अभिप्राय.

सगळा दिवस तो रानात भटकला. भुकेने व्याकूळ झाला आणि मोठ्या कष्टाने रस्ता शोधून तिन्हीसांजेला गावात परतला.

दुसऱ्या दिवशी, मृत्युंजय पुन्हा रानात गेला. त्या दिवशी तो एका तळ्याकाठी येऊन पोहोचला. तळ्यामध्ये स्वच्छ पाणी होते. अन् चारही बाजूला कमळे व लिली फुलली होती. मृत्युंजयने तेथेच बसून, पाण्यात भिजवून पोहे खाल्ले.

तळ्याच्या पश्चिमेला जाताच तो चमकून थबकला. तेथे एका चिंचेला प्रचंड वटवृक्षाने वेढले होते. त्याच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला –

चिंचवडाची भेट,

कथा

चालत जा दक्षिणेला थेट

दक्षिणेला काही अंतर गेल्यावर तो घनदाट जंगलात येऊन पोहोचला. पण मृत्युंजयला कळून चुकले की काही झाले तरी चिंचवडाच्या झाडाचा माग सोडून चालणार नाही. त्याला त्या झाडांच्या फांद्यांतून एका देवळाचा कळस दिसला. चालत चालत, तो दुसऱ्या एका पडक्या

गुप्तधन (भाग ३)

लेखक : रवीन्द्रनाथ टागोर

अनु: डॉ.सौ. मृणालिनी प्र. गडकरी

देवळात येऊन पोहोचला. देवळाजवळच एक चूल, जळकी लाकडे व राख पडलेली त्याला दिसली. तिथे एक कांबळे, कमंडलू आणि, एक भगवे वस्त्र पडलेले होते.

संध्याकाळची वेळ होती. गाव खूप दूर होते. मनुष्यवस्तीच्या खुणा पाहून मृत्युंजय खुशीत आला. दगडावर बसून, तो विचार करू लागला. त्याला त्या दगडावर काहीतरी कोरलेले दिसले. ते एक चक्र होते व त्यामध्ये स्पष्ट-अस्पष्ट खुणांची अक्षरे कोरलेली होती.

हे चक्र मृत्युंजयच्या चांगल्याच परिचयाचे होते. ह्याच चक्राच्या रहस्याचा शोध घेण्याकरिता, किती वर्षे त्याने देवीची आळवणी केली होती. इच्छापूर्तीची वेळ जवळ आल्याचे जाणवताच, त्याच्या सर्वांगाला कंप सुटला.मनात कालवाकालव होऊ लागली. काय करावे, त्याला समजेना. काळोख दाटून आला. रातकिड्यांची किरकिर वाढली. त्याच क्षणी, घनदाट रानात उजेड दिसला. त्या उजेडाच्या रोखाने तो चालू लागला. काही अंतर गेल्यावर, पिंपळाच्या झाडातून त्याला स्पष्ट दिसले. तोच संन्यासी शेकोटी पेटवून, तोच मळकट कागद पुढे ठेवून, काठीने राखेत आकडेमोड करीत होता.

''अरे लबाडा! चोर कुठला!म्हणूनच 'दुःख करू नकोस.' असं सांगत होता होय!''

तो संन्यासी आकडेमोड करी, मग काठीने मोजमाप करी. निराशेने मान हलवी आणि पुन्हा आकडेमोड करू लागे. रात्र सरताच. तो संन्यासी निघून गेला.

संन्याशाच्या मदतीशिवाय हे कोडे उलगडणे शक्य नाही, हे मृत्युंजयला समजून चुकले. लोभी संन्याशी मृत्युंजयला मदत करणे शक्यच नव्हते. तेव्हा गुप्तपणे संन्याशावर नजर ठेवण्याशिवाय दुसरा उपायच नव्हता.

संन्याशाने केलेली आकडेमोड त्याने निरखून पाहिली. त्याला काहीही उमगले नाही.

रानातील काळोख हळूहळू कमी झाला. सावधपणे, आजूबाजूला नजर ठेवीत, मृत्युंजय गावाकडे निघाला.

मृत्युंजयने ज्या दुकानाचा आसरा घेतला होता, त्याच्या शेजारच्या एका बाईने ब्राह्मणभोजन घातले होते. तेथेच मृत्युंजयची सोय झाली. जेवल्यावर तो गाढ झोपी गेला.

आज लवकरच जेवण उरकून, दिवस बराच वर असतानाच बाहेर पडायचे असे मृत्युंजयने ठरविले होते. पण झाले उलटेच. जेव्हा त्याला जाग आली, तेव्हा दिवस मावळला होता. निराश न होता, अंधारातच त्याने रानात प्रवेश केला.

झाडांच्या सावल्यांमुळे काहीच दिसेना. वाट खुंटल्यासारखी झाली. कोठे चालला आहे, हे त्याचे त्यालाच कळेना. रात्र सरल्यावर लक्षात आले की तो तेथल्या तेथेच फिरत होता.

आकडेमोडीत पुन्हा पुन्हा होणाऱ्या चुका सुधारत सुधारत अखेर संन्याशाला भुयाराचा रस्ता सापडला. मशाल घेऊन तो

भुयारात शिरला. भुयाराच्या भिंतीवर शेवाळे साठले होते, मधून मधून पाणी झिरपत होते, ठिकठिकाणी एकमेकांच्या अंगावर बेडूक पडले होते. निसरड्या वाटेने थोडे पुढे गेल्यावर, एक भिंत आडवी आली. त्यामुळे वाट खुंटली होती.संन्यासी गोंधळून गेला. त्याने हातातील लोखंडी दंडाने भिंतीवर ठोकून पाहिले. कोठेही पोकळी वा भगदाड नव्हते. म्हणजे वाट तेथेच संपली होती. तो कागद उलगडून, डोक्याला हात लावून, विचार करू लागला. ती रात्र अशीच गेली.



दुसऱ्या दिवशी, पुन्हा आकडेमोड करून, तो संन्यासी भुयारात शिरला. गुप्त संकेताप्रमाणे त्याने एका विशिष्ट जागेवरचा दगड सरकवला. त्याला एक चोरवाट सापडली खरी, पण थोडे पुढे जाताच तीही बंद झालेली आढळली.

अखेर, पाचव्या दिवशी, भुयारात प्रवेश करताच, संन्यासी गरजला, ''आज मला वाट सापडलीय. आज माझी अजिबात चूक होणार नाही.''

वाट फारच अवघड होती. तिला जागोजागी फाटे फुटले होते.कोठे कोठे ती इतकी लहान झाली होती की सरपटत जावे लागत होते. अतिशय कष्टाने, मशाल सावरीत, संन्यासी एका गोलाकार जागी पोहोचला. त्या गोलाकार जागेच्या मध्यभागी एक प्रचंड दगडी विहीर होती. मशालीच्या उजेडात, त्याला विहिरीचा तळ काही दिसला नाही. छतातून एक लोखंडी साखळदंड विहिरीत लोंबकळत होता. जीव खाऊन संन्याशाने साखळदंड थोडासा हलविताच विहिरीतून ठंग् असा आवाज झाला. गोलाकार जागी तो आवाज घुमला. संन्यासी ओरडला, ''सापडलं!'' त्याच वेळी, पडक्या भिंतीतून एक दगड खाली गडगडला आणि त्या दगडाबरोबर एक मानवी आकृती खाली पडली. त्या आकृतीच्या किंकाळीने संन्यासी घाबरला आणि त्याच्या हातातील मशाल खाली पडून विझली.

संन्याशाने विचारले, ''कोण आहे रे?'' पण उत्तर आले नाही. काळोखातच संन्याशाने चाचपडून पाहिले. त्याच्या हाताला एक मनुष्यदेह लागला. त्याला हलवून संन्याशाने विचारले, ''कोण आहेस तू?'' पण काहीच उत्तर मिळाले नाही. तो मनुष्य बेशुद्ध पडला होता.

संन्याशाने खूप प्रयासाने चकमकीने कशीबशी मशाल पेटविली. तेवढ्यात त्या माणसालाही शुद्ध आली. उठताना तो मोठ्याने विव्हळला. संन्यासी ओरडला, ''अरे, मृत्युंजय तू! तुला ही बुद्धी का झाली

बाबा?''

''बाबा, क्षमा करा.देवानेच मला शिक्षा दिली. तुम्हाला मारायला दगड उचलला, पण मी माझा तोल सांभाळू शकलो नाही. दगडासकट खाली पडलो. खात्रीनं माझा पाय मोडलाय!'' मृत्युंजय.

''मला मारून तुझा काय फायदा?'' संन्यासी.

''फायद्याच्या गोष्टी तुम्ही करताय? चोर! लबाड! माझ्या आजोबांना ज्या संन्याशाने हा कागद दिला, त्याने सांगितले होते की आमच्याच घरातील कोणीतरी ह्याचा रहस्यभेद करील. हे गुप्तधन आमच्या वंशालाच मिळणार. म्हणून तर, गेले कित्येक दिवस मी उपाशीतापाशी, तुमच्या सावलीप्रमाणे तुमच्यामागून फिरतोय्! तुम्ही आज 'सापडलं' म्हणून ओरडताच माझ्यानं राहवलं नाही. मी तुमच्या मागून येऊन या इथं लपून बसलो होतो. तिथलाच एक दगड काढून तुम्हाला मारायला गेलो, पण अशक्तपणामुळे व निसरड्या जागेमुळे खाली पडलो.–आता तुम्ही मला ठार मारलं तरी चालेल. – मी यक्ष होऊन या संपत्तीचं रक्षण करीन. – पण तुम्हाला या धनाला हात लावू देणार नाही, काही झालं तरी नाही. आणि जर ह्याला हात लावायचा प्रयत्न केलात, तर..मी ब्राह्मण आहे. तुम्हाला शाप देईन आणि या विहिरीत उडी टाकून जीव देईन. मग हेच धन तुम्हाला ब्रह्मरक्तासारखे, वागो–रक्तासारखे होईल. तुम्हाला त्याचा सुखाने कधीही उपभोग घेता येणार नाही. माझे वाडवडील ह्या धनात जीव गुंतवून गेले, ह्याचा ध्यास घेतल्याने आम्हाला दारिद्र्य आले. ह्याच धनासाठी घरी बायकोपोरांना सोडून, तहान–भूक विसरून, दळभद्र्या वेड्यासारखा रानोमाळ भटकतोय मी. माझ्या डोळ्यादेखत ह्या धनाला मी तुला हातसुद्धा लावू देणार नाही.'' मृत्युंजय म्हणाला.

''असं का! मृत्युंजय, मग ऐक तर! सगळी हकीकतच सांगतो तुला,'' असे म्हणून संन्याशाने हकीकत सांगण्यास सुरुवात केली, ''तुझ्या आजोबांना शंकर नावाचा एक धाकटा भाऊ होता हे तुला माहीत आहे ना? ''

''हो! तो परागंदा झालाय.'' मृत्युंजय म्हणाला.

''मीच तो शंकर''. संन्याशाच्या ह्या उत्तराने मृत्युंजयने हताश होऊन एक नि:श्वास टाकला. आतापर्यंत ह्या गुप्तधनावर फक्त त्याचाच हक्क होता, असे तो समजत होता. पण आता या चुलत आजोबाने तो गैरसमज दूर केला.

संन्यासी पुढे सांगू लागला, ''दादाला त्या संन्याशाने कागद दिल्यापासूनच, दादा तो कागद माझ्यापासून लपवीत होता. पण त्यामुळे माझी उत्सुकता दिवसेंदिवस वाढू लागली. दादाने हा कागद देवीच्या मूर्तीखाली लपवून ठेवलाय, ह्याचा मला पत्ता लागला. मग मी त्या पेटीची दुसरी चावी बनवून घेतली आणि कागदावरच्या लिखाणाची व आकृत्यांची रोज थोडी थोडी नक्कल करू लागलो. ज्या दिवशी

त्या संपूर्ण कागदाची नकल पूर्ण झाली, त्याच दिवशी गुप्तधनाच्या शोधासाठी घराबाहेर पडलो. मलाही बायको होती, लहान मूल होतं. आज दोघंही ह्या जगात नाहीत.''

''किती प्रदेश फिरलो,ते विस्तारानं सांगण्याची गरज नाही.संन्याशानं दिलेलं हे कोडं,एखादा संन्याशीच उलगडून दाखवील असा विचार करून, अनेक संन्याशांची मी सेवा केली. माझ्याजवळील कागदाचा पत्ता लागताच, काही लबाड संन्याशांनी तो चोरायचा देखील प्रयत्न केला.अशी वर्षामागून वर्ष गेली,पण मला एक दिवससुद्धा सुखशांती मिळाली नाही.''

''शेवटी पूर्वजन्मीची पुण्याई म्हणूनच कुमायून पर्वतावर बाबा स्वरूपानंद स्वामींची भेट झाली. त्यांनी उपदेश केला, 'बाबा, हाव करू नकोस. मग सर्व विश्वाला व्यापून टाकणारे धन, तुला आपोआपच प्राप्त होईल.' त्यांनी माझ्या मनातली आग विझविली. त्यांच्या कृपेने आकाशातील प्रकाश आणि धरतीची श्यामलता हेच माझे ऐश्वर्य झाले. एके दिवशी, पर्वताच्या पायथ्याशी, हिवाळ्यातील संध्याकाळी परमहंसबाबांच्या धुनीत तो कागद मी टाकून दिला. बाबांनी स्मितहास्य केले. त्याचा अर्थ तेव्हा कळला नाही, पण आता समजला. 'कागदाची राख करणं सोपं आहे, पण वासना इतक्या सहज भस्मसात होत नाहीत बरं!' असाच त्या हास्याचा अर्थ असावा. बाबा मनातल्या मनात असेच बोलले असतील.''

''कागद संपूर्णपणे नष्ट होताच, माझ्या मनाला पडलेला नागपाश सुटला. मुक्तीचा अपूर्व आनंद मला झाला. 'मला आता कसलीही भीती नाही. – कसलीही इच्छा नाही.' असेच मला वाटले.''

''या घटनेनंतर काही दिवसांतच माझी व परमहंसबाबांची ताटातूट झाली. त्यांना मी खूप शोधलं, पण ते भेटले नाहीत.''

''मग मी संन्यासी होऊन निरासक्त मनानं भटकू लागलो. अशीच बरीच वर्षे उलटली. मी ते रहस्य विसरलोही होतो.''

''पण, एके दिवशी, या धारागोलच्या रानातील, ह्या पडक्या देवळात, आश्रय घेतला. एक-दोन दिवस राहिल्यावर लक्षात आलं की देवळाच्या भिंतीवर, जागोजागी, निरनिराळ्या प्रकारची यंत्र रेखाटलेली होती. ती यंत्र माझ्या चांगल्याच परिचयाची होती.''

''येवढे दिवस जे शोधलं, ते सापडलं,

 असंबद्ध बोलणे, मौन वा विलंब अथवा प्रयाणही. भाळी आठ्या, जमीन बघणे, तऱ्हा नकाराच्या ह्याही.

ह्यात शंकाच राहिली नाही. 'इथं आता राहायचं नाही. ही जागा मी सोडलीच म्हणून समजा.' असा मी मनात निश्चय केला खरा, पण इथून जाणं झालं नाही.''

''काय आहे ते पाहू या तर खरं! जिज्ञासा शमवून जाणं चांगलं असं वाटलं. त्या यंत्रांचं गूढ उकलण्याचा अनेकदा प्रयत्न केला, पण काहीच हाती आलं नाही. 'कशाला जाळला तो कागद? राहिला असता तर काय बिघडलं असतं?' असं सारखं वाटायला लागलं.''

''मग मी माझ्या गावी गेलो. माझ्या वाडवडिलांच्या वास्तूची अत्यंत दुरवस्था झालेली पाहून मी ठरवलं की मी संन्यासी असल्यानं मला ह्या धनाचा काहीच उपयोग नाही, पण ह्या गरीब, संसारी माणसांसाठी हे धन शोधण्यात काहीही गैर नाही.''

''तो कागद कुठं आहे, हे मला माहीत होतंच! तेव्हा तो मिळवणं मला मुळीच कठीण नव्हतं.''

''त्यानंतर, एक वर्ष, हा कागद घेऊन, ह्या निर्जन रानात, आकडेमोड करीत, शोध घेत राहिलो. मनाला कोणतीच चिंता नव्हती, पण जसजसे अडथळे येऊ लागले, तसतसा माझा हट्टही वाढला. – बेभान होऊन, अहोरात्र, ह्यातच गुंतून पडलो.

''त्यामुळेच तू माझ्या मागावर आहेस, हे कधीच मला कळलं नाही. मी जर बेसावध नसतो, तर तुला माझ्यापासून कधीच लपून राहता आलंच नसतं. पण मी कोड्याचं रहस्य उलगडण्यात मग्न झालो होतो, इतरत्र माझं लक्षच नव्हतं.''

''जे शोधीत होतो, ते मला आजच सापडलंय्.इथं जेवढं धन आहे,तेवढं तरह्या पृथ्वीवरच्या कोणाही सम्राटाजवळसुद्धा नाही. आता फक्त एकच गूढ उकलायचंय्. मग ते धन मिळालंच म्हणून समज.''

(क्रमश:)

माकडं मजुरी करतात तेव्हा !

(पान क्र. ४७ वरून पुढे चालू)

होती ज्यांच्या शेंड्यापर्यंत पोहोचणं माणसाला अशक्य होतं. 'मेराह'मात्र अशा झाडांवर लीलया चढत असे आणि त्यांच्या शेंड्यावरल्या फळा-फुलांचे आणि पानांचे नमुने गोळा करून कॉर्नर ह्यांना अचूक आणून देत असे! आपल्या गळ्यात बांधलेल्या एका पिशवीत तो हे नमुने जमवत असे. 'मेराह'च्या या असामान्य गुणामुळे डायरेक्टर कॉर्नर यांना माणसाला अज्ञात असलेल्या अशा अनेक वनस्पती प्राप्त होऊ शकल्या नि त्यावर मौलिक संशोधन करता आलं.

मलायामधल्या 'वा-नरां'च्या असामान्य क्षमतेच्या आणि बुद्धिमत्तेच्या विलक्षण हकीकती तुम्हाला सांगितल्या. मनुष्य हा पृथ्वीवरला सर्वात बुद्धिमान प्राणी आहे असं म्हटलं जातं. माकड हा त्यांचा पूर्वज! आता माणसासारखं, किंबहुना त्याच्यापेक्षाही जास्त निष्ठेनं, प्रामाणिकपणानं कामं करणारी माकडं हुशार म्हणायची की आपले कष्ट वाचवण्यासाठी नि स्वत:च्या फायद्यासाठी आपल्या या पूर्वजांना कामाला लावणारा माणूस अधिक हुशार म्हणायचा?

छोटे दोस्त हो, तुम्हाला काय वाटतं?

गुलाबाला फुलांचा राजा म्हणतात. सुंदर सुंदर रंगांची गुलाबाची ताजी टवटवीत फुले सगळ्यांचेच मन जिंकून घेतात. फुलदाणीत गुलाबाची ताजी फुले ठेवल्यावर, ती फुलदाणी ठेवलेल्या खोलीच्या सौंदर्यात भर पडते. परंतु दर वेळी फुलदाणीत ताजी फुले ठेवता येतातच असे नाही. काही ना काही कारणांमुळे ताजी फुले मिळाली नाहीत तर कृत्रिम फुले त्याची जागा घेऊ शकतात.

तुम्ही आत्तापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी प्रदर्शनात, बाजारात कृत्रिम फुले पाहिली असतील. तुमच्यापैकी काहींनी तयारही केली असतील. तसे पाहिले तर सॅटीन,

करून तर पाहा

ऑरगंडी, वेलवेट, क्रेप पेपर, सोलावूड यांच्यापासून वेगवेगळी फुले बनविता येतात. एकच फूल वेगवेगळ्या माध्यमातून बनवता येते. या लेखात आपण ऑरगंडीचे कापड व ड्युप्लेक्स पेपर यांपासून गुलाबाचे फूल कसे बनवायचे ते पाहू.

सदाबहार गुलाब







ऑरगंडीच्या कापडाचा गुलाब.

सौ. रेखा जोशी

साहित्य – ऑरगंडीचे कापड पाव मीटर, जाड तार, बारीक तार, कापूस, ऑरगंडीच्या कापडाच्या रंगाचा कॉटनचा तुकडा, ग्रीन टेप किंवा शेवाळी रंगाचा क्रेप कागद, दोरा, शेवाळी रंगाची सॅटीनची रिबिन, फेव्हिकॉल.

कृती – पाने व फुले तयार करण्यासाठी बारीक तारेचे १२ सें.मी.चे तुकडे कापणे व मधल्या देठासाठी ३० से.मी. लांबीचा जाड तारेचा तुकडा कापणे. पाकळ्या तयार करणे – लहान पाकळ्यांसाठी ६ सें.मी. ह्न ६ से.मी. असा चौरस तुकडा कापणे व मोठ्या पाकळ्यांसाठी ७ सें.मी. ह्न ७ सें.मी. असा चौरस तुकडा कापणे. कापलेल्या चौरस कापडाचा तुकडा आकृतीत दाखवल्याप्रमाणे घडी करून घ्यावा. त्या चौरसाची अ व ब ही टोके एकमेकांस जुळतील अशी ठेवावी. त्यानंतर वरील क भाग दुमडून 'ड' या टोकाशी जुळवून घ्यावा व तयार झालेल्या भागाच्या कडा हातानी सर्व बाजूने सारख्या दाबून घ्याव्यात. आता क्रोशाची सुई घेऊन त्यावर म आणि न ही बाजू ठेवून अनुक्रमे आडवी गुंडाळून घ्यावी व दाबून नंतर आतील सुई काढून घ्यावी.

तारेच्या टोकावर कापूस लावून त्यावर साध्या कापडाचा ४ सें.मी. ह्न ४ सें.मी. या मापाचा तुकडा कॉटनच्या कापडात कापून वर लावून त्यावर दोरा गुंडाळावा. त्याच्यावर ५ सें.मी.ह्न ५ सें.मी. या मापाचा ऑरगंडीचा तुकडा लावून वर परत दोरा गुंडाळावा. त्यानंतर ७ सें.मी. ह्न ७ सें.मी. या मापाचा चौरस आकार कापून त्याचे दोन एकसारखे त्रिकोणी तुकडे तयार करावेत. या तुकड्याच्या लांब बाजूवर क्रोशाच्या सुईवर आडवे गुंडाळून थोडा पीळ द्यावा. पीळ दिलेली बाजू वर येईल असा पदरा सारखा तो तुकडा लावावा व दोरा गुंडाळावा. त्यामुळे तारेला तो कापडाचा तुकडा घट्ट बांधला जाईल, त्यानंतर

छोट्या पाकळ्या व शेवटी मोठ्या पाकळ्या लावून दोरा गुंडाळून पाकळ्या घट्ट बांधव्यात. दोरा गुंडाळला होता त्या ठिकाणी फेव्हिकॉल लावून त्यावर कापूस लावावा. आकृतीत दिल्याप्रमाणे शेवाळी रंगाच्या क्रेप कागदाचा कॅलीक्स कापून तो कापसावर चिकटवावा. कॅलीक्स लावल्यानंतर तारेला ग्रीन टेप (चिकटपट्टी) गुंडाळावी. एका फांदीवर एक लहान कळी, एक छोटे फूल, एक मध्यम फूल व एक मोठे फूल असे एका रंगाच्या ऑरगंडीच्या कापडात करावे. असे आणखी २ रंगाच्या ऑरगंडीच्या कापडात २ फांद्या कराव्यात. या तिन्ही फांद्या एकत्र करून गुलाबाच्या फुलांचा सुंदर गुच्छ तयार होईल.

१) कळी – कापसाची कळी तयार करून त्यावर कापडाचा पीळ दिलेला भाग पदरासारखा दोन वेळा लावणे.

२) छोटे फूल – मध्यभागी कापसाची कळी तयार करणे व त्याच्या भोवती छोट्या पाच पाकळ्या (टोकाशी पीळ देऊन वळवलेल्या) लावणे. पीळ दिलेला भाग मागच्या बाजूला येईल हे पाहणे.

३) मध्यम फूल – कळी जरा लहान (कापूस कमी) करणे. लहान पाकळ्या तीन व मोठ्या पाकळ्या चार लावणे.

४) मोठे फूल – यामध्ये कळीच्या बाजूला लहान पाकळ्या तीन व मोठ्या पाकळ्या पाच लावणे.

५) पान तयार करणे – आकृतीत दाखवल्याप्रमाणे सॅटीनच्या रिबीनवर आकार कापून घेणे. मधल्या शिरांच्या खुणा कात्रीच्या टोकाच्या बोथट बाजूने करणे. बारीक तारेवर ग्रीन टेप किंवा क्रेप कागद गुंडाळून ती तार पानाच्या मागच्या बाजूस फेव्हिकॉलने चिकटवणे. असे पान तयार होईल. एका फांदीसाठी अशी साधारण चार पाने लागतात.

जाड तारेच्या टोकाशी वर कळी, त्यानंतर लहान फूल, मध्यम फूल व शेवटी मोठे फूल असे लावून एक फांदी पूर्ण करावी.

ड्युप्लेक्स कागदाचा गुलाब

सौ. शशिकला सुराणा

ड्युप्लेक्स पेपरची स्वत:ची विशेषत: आहे, ती म्हणजे हा पेपर चिवट असतो. त्यामुळे आपल्याला पाहिजे तसा आकार आपण



चित्र २



चित्र ३



चित्र ४ पुष्पकोश

पाकळ्यांना देऊ शकतो. हा पेपर दोन रंगात (एका बाजूने लाइट दुसऱ्या बाजूने डार्क) असतो. त्यामुळे एकाच पेपरात दोन कलरची फुले बनविता येतात. या कागदावर धूळ चिकटून बसत नाही.

साहित्य :- ड्युप्लेक्स पेपर (लाल, गुलाबी, पिवळा, पांढरा, हिरवा) वहीचा पुठ्ठा, कात्री, पातळ तार, फेव्हिकॉल, धागा (पेपरला मॅच होईल असा).

कृति :- चित्र १ व २ प्रमाणे पुठ्ठ्यावर आकार काढून घेऊन कापून घ्या. पाहिजे त्या कलरचा ड्युप्लेक्स क्रेप पेपर घ्या. पुठ्ठ्याच्या साह्याने चित्र १ व २ च्या आकाराच्या ५-५ पाकळ्या कापा. येथे प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात ठेवा की पाकळ्यांची लांबी ही पेपरवर असलेल्या उभ्या लाइनिंगच्या दिशेनेच आली पाहिजे. आवडीप्रमाणे पाकळ्या कमी जास्त केल्या तरी चालतील.

आता तुम्ही पाकळीचा जो रंग निवडला असेल त्या बाजूने पेन्सिलच्या मदतीने वरचा भाग गुंडाळी करून सोडून द्या. त्यामुळे पाकळीला गोलाकार येईल याप्रमाणे सर्व पाकळ्या करून घ्या. आता पाकळी दोन्ही हातात अशा प्रकारे पकडा की चार बोटे पाकळीच्या मागच्या भागावर व दोन्ही अंगठे पाकळीच्या मध्यावर येतील. अंगठ्याच्या साह्याने पाकळीवर दाब देऊन पेपर बाहेरच्या बाजूने ओढा म्हणजे पाकळीच्या मध्यावर खळगा तयार होईल. वरील प्रमाणे चित्र नं.१च्या मदतीने बाहेरच्या पाकळ्या तयार करून घ्या. जेवढी फुले तयार करायची आहेत तेवढेच चित्र ३ प्रमाणे हिरव्या रंगाचे आकार कापून घ्या. आता २० ते २५सें.मी. तार घ्या. त्याला वरच्या बाजूला हुक तयार करा. त्यावर गोलाकार आकाराचा तुकडा धाग्याने बांधा. आता १-१ करून आतील पाकळ्या अशा प्रकारे बांधा की प्रत्येक दुसरी पाकळी पहिल्या पाकळीच्या मध्यातून सुरू व्हायला पाहिजे. अशाप्रकारे बाहेरच्या पाकळ्या बांधून घ्या. आता हिरव्या रंगाचे पुष्पकोश (कॅलीक्स) फुलाच्या खालच्या भागावर गोलाकारात चिकटवा. नंतर हिरव्या कागदाची लांब पट्टी काढून फेव्हिकॉलच्या साहाय्याने तारेवर लपेटा. आता आपले सदाबहार गुलाबाचे फूल तयार झाले. वेलवेटची तयार पाने मिळतात. त्याने फुलांची रचना पाहिजे तशी करा किंवा हिरव्या क्रेप कागदाची पाने बनविली तरी चालतील. दोन-तीन फुलांची फांदी तयार करून आपण पिन होल्डरमध्ये लावू शकता किंवा परडी अथवा बंचही तयार करू शकता. मोठी फुले पाहिजे असतील तर पाकळ्यांचा आकार वाढवा. तर मित्रांनो, येत्या मे-महिन्याच्या सुट्टीत अशी सुंदर गुलाबाची फुलं बनवून पाहाणार ना!आपल्या मित्रांच्या वाढदिवसाला असा छोटा गुच्छ तुम्ही भेट देऊ शकाल.फुलांची सुंदर भेट आणि तीही तुम्ही स्वत: बनवलेली. त्यामुळे त्याला जास्तच सौंदर्य प्राप्त होईल.

मी कसा घडलो

आभाळ मुठीत आलंसं वाटतं तेंव्हा !

– सुभाष देशपांडे

शाळेतले दिवस कोणाला आठवत नाहीत? अमाप उत्साहानं भरलेला आणि आवडत्या शिक्षकांच्या आठवणी मनावर कोरवत ठेवण्याचा तो काळ. पुण्यातल्या बाजीराव रस्त्यावरच्या पूना इंग्लिश स्कूलचा मी विद्यार्थी.इयत्ता आठवीतून नववीत जातांना प्रबोधिनीच्या संध्याकाळच्या वर्गात निवड झाली. १९६५ साली प्रबोधिनीत दाखल झालो. त्यावेळेपासून जे नातं जमलं ते आज ३० वर्ष झाली, तसंच कायम आहे. इ.नववी ते अकरावी हा त्यावेळचा काळ खूप काही नवं शिकण्याचा. प्रबोधिनीला त्यावेळी स्वत:ची इमारत नव्हती. न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड या शाळेत आमचे वर्ग भरायचे. इंग्रजी शिकवायला एक टंगाळ्या अमेरिकन 'टॉम' यायचा. २६'' सायकलचे सीट जास्तीतजास्त उंच केले तरी, त्याचे पाय जमिनीवर टेकायचे. गोरा माणूस आम्हाला इंग्रजी शिकवतो याचं फारच अप्रूप वाटे. प्रबोधिनीचे संस्थापक आप्पा पेंडसे हे सुद्धा 'इंग्रजी ग्रामर' आम्हाला शिकवायचे. कॉम्प्रिहेन्शनचा पाठ शिकवण्यासाठी त्यांनी डॉ.आयडा स्कडरची गोष्ट निवडली होती. इंग्रजी शिकविता– शिकविता डॉ. स्कडरच्या कर्तृत्वाचं ते असं काही वर्णन करायचे की आम्ही दंग होऊन जायचो.

गणपती उत्सव आला की मैदानावर ढोल–ताशे घुमू लागायचे. लाकडी बरच्यांचे हात म्हणजे सामुदायिक कवायत मिरवणुकीत सादर करण्यासाठी आमचा सराव चालायचा. सगळ्या गटाला योग्य त्या हालचाली डौलदारपणे करता येईपर्यंत प्रॅक्टिस चाले. मैदानावर अंधारून आलं तरी खेळ चालूच.उलट ताशा आणखी जोराने कडाडायचा. अनंत चतुर्दशीला रात्री १० वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी सकाळी ६ पर्यंत गणपती विसर्जनाची मिरवणूक चाले. पायाचे अगदी तुकडे पडेपर्यंत आम्ही खेळायचो. ती धुंदीच अशी

होती, की वेळेचं भान उरत नसे. आजही त्या मिरवणुकीत ताशा वाजविताना मला आजूबाजूचं जग विसरायला होतं.

इ. अकरावीच्या वर्षात आप्पांनी त्यांच्या घरीच राहायला बोलावलं. ते एस.एस.सी. चं वर्ष असल्यानं अभ्यासाची तंत्रं त्यांनी शिकवली. परीक्षा जसजशी जवळ येत गेली, तसतसे अभ्यासाचे रोजचे तास ते वाढवत असत. एका कागदावर आलेख काढलेला असे. मार्चमध्ये तर दिवसाला १८ तासांपर्यंत अभ्यास जाऊन पोहोचला. माझ्या अपेक्षेपेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण झालो. गुणवत्ता यादीत क्रमांक आल्यानं माझं कौतुकही खूप झालं आणि मी 'सुभ्या' चा सुभाष आणि पुढे 'सुभाषराव' झालो. परीक्षा झाल्यावर लगेच दुसऱ्या दिवशी आम्ही वर्गातले सगळेजण सिंहगड पायथ्याच्या कल्याण गावी गेलो. कात्रज घाटातून सायकलवर जायला घरच्यांची परवानगी नव्हती. मित्रमंडळाची चौकडी पालकांच्या समजुती घालत, हिंडत होती. कल्याणला त्या वेळी प्रबोधिनीचं एका बंधाऱ्याचं काम चालू होतं. आम्ही गावकऱ्यांबरोबर श्रमदान केलं. कुदळ हातात कशी धरतात हे मला माहीतच नव्हतं. समोरच्या जमिनीतला मुरूम निघायच्या ऐवजी कुदळ माझ्या पायावरच आली आणि अंगठ्याचं नख निघालं. वडिलांना कळू नये म्हणून मी पुण्याला आल्यावर कापडी पट्टीही सोडून टाकली. अर्थातच जखमेत पाणी गेल्यामुळे ती मला महिनाभर पुरली. पण बंधारे आणि श्रमदान यांची आवड निर्माण झाली ती कायमचीच. नसते उद्योग करण्याचा माझा सपाटा नंतरही चालूच राहिला. प्रबोधिनीच्या नवीन इमारतीचं काम चालू होतं. दुसऱ्या मजल्याच्या व्हरांड्यात आम्ही दोघे तिघे मित्र गप्पा मारीत उभे होतो. चौकात खाली वाळूचा ढीग पडला होता. विसू गुर्जरला लहर आली. 'चल मारायची का उडी?' तो मला म्हाला. 'चल, तिघेही पाठोपाठ मारू--,' मलाही स्फुरण चढलं. दुसऱ्या मजल्याच्या कठड्यावरून छलांग मारून विसू झेपावला सुद्धा. मी ही इकडे - तिकडे न बघता दाणकन उडी ठोकून दिली. पायात झिणझिण्या आल्या. वाळूच्या ढिगावरून बाजूला होई - होईतो पाठोपाठ धप्पकन आवाज आला आणि पाठोपाठ'अयाय गऽऽ' म्हणून विव्हळण्याचा एक आवाज आला.

आमच्यातला तिसरा भिडू म्हणजे अनिल देशमुख उडी मारून आला होता आणि पायावर पडण्याऐवजी बच्चमजी हातावर पडला होता. झालं! सणसणीत फ्रॅक्चर! नंतर लोखंडी सळई घालून ३ महिने गडी जायबंदी. आप्पा जाम उखडले. कोणी ही भन्नाट आयडिया काढली म्हणून विसूला आणि मला त्यांचं 'समन्स' म्हणजे बोलावणं आलं. आमचं तथाकथित उसनं शौर्य चेहऱ्यावर आणून आम्ही त्यांना भेटायला गेलो. ''शहाणे आहात! ही वाळू तुम्हाला काय वाटलं खेळायला आणली आहे? आणि त्या अनिलच्या एका हातावर निभावलं म्हणून, नाहीतर काय प्रसंग ओढवला असता! असल्या मूर्खपणाच्या धाडसाबद्दल तुम्हाला शिक्षाच झाली पाहिजे.'' आप्पा कडाडले. विसूला आणि मला त्यांनी दंड ठोठावला आणि दुसऱ्या दिवशी भरणा करण्याची तंबीही दिली! दंड न भरण्याची आमची काय शामत होती?

पुढे ५-६ वर्षांनी मी पदवीचं शिक्षण पूर्ण करून शिवापूरला प्रबोधिनीचं काम करू लागलो.१९७८ साली प्रबोधिनीने शिवगंगा नदीच्या खोऱ्यात दारूबंदीचं आंदोलन छेडलं. हातभट्टीची दारू गाळणाऱ्या कंजारभाटांचे अड्डे शिवापूरच्या युवकांनी उद्ध्वस्त केले. रामभाऊ डिंबळे आणि मी हे प्रबोधिनीचे कार्यकर्ते त्यात आघाडीवर. पोलिसांनी आम्ही दोघे व इतर २१ जणांना अटक केली. खरे गुन्हेगार मोकळेच होते! आम्ही दोन दिवस पोलिस कस्टडीची हवा खाल्ल्यावर जामीन मंजूर होऊन बाहेर आलो. आप्पांच्या रागाचा पारा खूप उंच चढला होता. आता पुन्हा 'नसता उद्योग' करण्याबद्दल तंबी मिळणार असं आम्हाला वाटलं. अंदाज अगदीच चुकीचा निघाला

ज्ञान प्रबोधिनीचे सहकार्यवाह आणि शिवगंगा-गुंजवणी खीरे ग्रामविकसनाचे प्रमुख म्हणून सुभाषराव गेली अनेक वर्षे काम बघत आहेत. प्रबोधशाळेतून मॅट्रीकच्या गुणवत्ता यादीत आल्यानंतर विज्ञान, इतिहास, व्यवस्थापन अशा अनेक लौकिक पदव्या मिळवणाऱ्या सुभाषरावांची खरी ओळख एक कुशल प्रशासक आणि उत्तम प्रशिक्षक अशीच आहे.

प्रबोधिनीच्या धारक विभाग, खांडसरी साखर कारखाना, यंत्रशाळा यात प्रमुख प्रशासनापासून ते युवकविभागात खो खोच्या हुकांड्या देणारे, महाराष्ट्र विस्ताराचे काम बघणारे आणि कोयता परजणाऱ्या हातभट्टीवाल्यासमोर छाती काढून जाणारे म्हणून सुभाषराव विविध वयोगटांना परिचित आहेत. प्रबोधिनीबाहेरही स्वयंसेवी संस्था, शासकीय संस्था व UNDP सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये विविध प्रकल्प प्रमुख व प्रशिक्षक म्हणून त्यांचा परिचय आहे.

निर्मळ, शीतल सत्संगतिच्या गंगेतच जो स्नान करी, दान, तीर्थ, तप आणि यज्ञही कशास त्याला हवे तरी?

नाही. त्यांनी झाड झाड झाडलं. शेवटी म्हणाले ''वेड्यांनो त्या गुन्हेगारांचे अड्डे तुडविलेत म्हणून मी रागावत नाहीये, तर तुमचं नियोजन अपूर्ण कसं राहिलं आणि कस्टडीत त्यांच्या ऐवजी तुम्ही कसे गेलात? असो. पण तुम्ही भेकडासारखे पळून आला नाहीत आणि त्या गुंडांचा प्रतिकार केलात यातच सगळ आलं.आपण प्रबोधिनीत असंच वागलं पाहिजे.''

त्या दिवशी रात्री अंथरूणावर मी अंग टेकले, तरी रात्रभर जागाच होतो. प्रबोधिनीतला एक धडा मी शिकलो होतो. त्यावेळी आभाळ मुठीत आल्यासारखं वाटल्याचं आाठवतंय.

अशा एक ना अनेक प्रसंगांनी प्रबोधिनीतला माझा सहभाग वाढतच गेला. युवक कार्यकर्ता म्हणून अनेक उपक्रम योजायला मिळाले. एका स्नेहसंमेलनात 'एकलव्य' नाटक आम्ही बसवलं. मी 'द्रोणाचार्य' झालो होतो. एकलव्यानं अंगठा तोडून गुरुदक्षिणा देण्याचा गंभीर प्रसंग. मी पल्लेदार वाक्य फेकण्यास सुरुवात केली. एवढ्यात श्रोत्यात एकच खसखस पिकली. मला कळेना काय झालं ते. गंभीर प्रसंगाला लोक हसताहेत का, याचा उलगडा होईना. मी विंगेत पाहिलं. लाईट घालवावेत असं वाटलं. पण पाहतो तो आमचा लाईटवाला 'डीमर' वर डोकं टेकून झोपला होता. नंतर हळूच मला खूण करण्यात आली. मग समजलं की माझ्या डोक्यावरचा नाटकातला पांढऱ्या केसांचा विग (टोप) सरकून मूळचे काळे केस दिसू लागले होते. कसाबसा प्रसंग उरकून मी विंगेत घुसलो. घामाने डबडबलेला होतो!

नंतर एके वर्षी आम्ही ''चंद्रशेखर आझाद'' हे नाटक बसवलं. त्यात मी सुखदेवचं काम केलं. अशी नाटकं बसविताना नकळत अनेक प्रकारचे संस्कार मनावर झाले. मैदानावर मुलांपुढे कथाकथन करू लागलो. क्रांतिकारकांच्या कथा ऐकताना मुलांना काय वाटत असेल कोणास ठाऊक, पण सांगताना मात्र मला स्फुरण चढत असे. प्रबोधिनीचे सगळेच उपक्रम असे मनावर ठसा उमटविणारे. त्यात सुरेल पद्यांची भर. सांगणाराही जीव ओतून सांगत असे 'दीपक तू हरदम जलता जा' पासून ते 'नव्या युगाचे पाईक आम्ही' पर्यंतची गाणी तोंडपाठ होऊन गेली. एवढेच नव्हे, तर व्यक्तित्त्वाचा एक भाग होऊन गेली. शिक्षण चालू असतानाच प्रबोधिनीच्या औद्योगिक विभागांमध्ये माझे काम सुरू झाले. कुठल्याच अपरिचित विषयाचा बाऊ करायचा नाही. तो समजावून घेण्याचा प्रयत्न करायचा याचे धडे तेव्हा मिळाले. गुजराथ इलेक्ट्रिसिटी बोर्ड आणि आंन्ध्र प्रदेश इले.बोर्ड याच्या अध्यक्षांना वयाच्या २० व्या वर्षी प्रबोधिनीचा परिचय करून देताना मला बरं वाटे. पाँडिचेरीच्या एका दौऱ्याच्या वेळी मी आप्पांना पत्रात लिहिलं. "It is a privilege to represent Prabhodhini outside" लोक जे आतिथ्य करीत, त्यातून प्रबोधिनीविषयी लोकांना वाटणारी कुतूहलमिश्रित आत्मीयता जाणवत असे.

कामाच्या गरजेप्रमाणे माझं प्रबोधिनीतलं काम बदलत गेलं.विद्युतधारक काय आणि खांडसरी साखर काय दोन्हीच्या उत्पादनात माझ्यासारख्या इतिहासाच्या विद्यार्थ्याला काहीच फरक पडत नव्हता. प्रबोधिनीच्या आग्रहाखातर एम.बी.ए.केलं. त्यामुळे औद्योगिक व्यवस्थापकाची भूमिका नंतर बराच काळ बजावीत राहिलो.

करंजावण्याच्या खांडसरी साखर कारखान्याच्या निमित्ताने (१९७६ ते ८० प्रबोधिनीने राजगड किल्ल्याजवळ गुंजवणी नदीच्या खोऱ्यात खांडसरी साखर कारखाना चालवला होता) ४ वर्षे खेड्यात वावरण्याची संधी मिळाली. त्यातून खेड्याचे प्रश्न ते आपले प्रश्न वाटू लागले. पाण्याचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न, रोजगार आणि एकत्र काम करण्याचा अभाव हा डाचत राहिला. आज ग्रामवीकसन विभागाचे काम करताना असं वाटतं आपण समाजाचं ऋण फेडतो आहोत. यश कमी – जास्त होतं. पण कामातला आनंद कधी दुणावत नाही तो शतगुणित होतो. प्रबोधिनीने बांधलेल्या एखाद्या पाझर तलावात भरलेलं पाणी पाहिलं की त्यात खाली उतरलेलं आभाळ दिसतं. त्यावेळी मुठीत आलेलं निळंशार पाणी अर्घ्य म्हणून सोडताना अजून खूप काही करायचं बाकी आहे, आत्ता तर कोठे सुरुवात आहे, असं वाटतं.

खुलासा व नम्र आवाहन

दोन वर्षांपूर्वी मासिकाची वार्षिक वर्गणी रु.४० होती. त्यावेळी मासिक फक्त ३२ पानांचे व मुखपृष्ठ साधे दुरंगी छपाईचे होते. त्या तुलनेत गेल्या वर्षी मासिकाची पाने ४८ झाली व मुखपृष्ठ आर्टपेपरवर बहुरंगी छपाईचे झाले. तेव्हा गेल्या वर्षीची वर्गणी रु.६० केली होती.

ही दोन्ही वर्षे आपले मासिक तोट्यातच चालू होते. ते फायद्यात चालावे अशी अपेक्षा नसली तरी निदान ते स्वयंपूर्ण व्हावे अशी अपेक्षा निश्चितच आहे. गेल्या २ वर्षात कागद व छपाईमधील झालेली प्रचंड भाववाढ लक्षात घेता वार्षिक वर्गणी किमान १०० रुपये तरी ठेवावी लागेल. तथापि वर्गणीत एकदम वाढ न करता टप्प्याटप्प्याने करावी असा विचार करून यंदाच्या वर्षी वार्षिक वर्गणी रु.७५ केली आहे. येत्या २–३ वर्षात ती क्रमाक्रमाने वाढत जाईल. आपण एकदम दोन अथवा तीन वर्षाची वर्गणी भरली तर आपल्याकडून १५० अथवा २२५ रुपये इतकीच वर्गणी घेतली जाईल. २/३ वर्षातील वाढीव रक्कम आपल्याला भरावी लागणार नाही. तेव्हा दरवर्षी वाढणाऱ्या वर्गणीतून तेवढी सूट तुम्हाला मिळू शकेल व दरवर्षी लक्षात ठेवून पुन्हा पुन्हा वर्गणी भरण्याचे कष्टही वाचतील. वर्गणी व्यतिरिक्त देणग्या, प्रायोजक व जाहिरातींच्या आधारे यावर्षीचा तोटा भरून काढायचे आपण ठरवले आहे. त्यासाठी तुम्हा सर्वांचे सहकार्य हवे आहे.

आपले मासिक स्वयंपूर्ण होऊन, उत्तमोत्तम दर्जा गाठणारे, हजारो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणारे व दीर्घकाळ चालणारे व्हावे यासाठी यंदाच्या वार्षिक वर्गणीत केलेली छोटीशी वाढ आपण समजून घ्याल. विविध मार्गांनी आर्थिक मदत करून अथवा/आणि मिळवून देऊन या कार्यास हातभार लावाल असा विश्वास वाटतो.

धडपडणारे प्रबोधक मागील अंकात मी कॉपी करणार नाही, करू देणार नाही असे आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद म्हणून गोव्यातील श्री कमलेश्वर हायस्कूल, कोरेगाव येथील शाळेतील वर्गप्रतिनिधींनी प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थ्यांसह तसा शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित केला. वर्गावर्गातून 'मी कॉपी करणार नाही' असा मजकूर असलेल्या पत्रकावर सह्या घेऊन ती पत्रके मुख्याध्यापकांकडे सुपूर्त करण्यात आली. इतरही ठिकाणी असे प्रयत्न प्रबोधकांनी निश्चितपणे केले असतील असा विश्वास वाटतो. याबाबतची तुमची मते, अभिप्राय, आलेले अनुभव, अडचणी आमच्या पर्यंत जरूर पोहोचवा.

'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

निगडी : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. ☎ ८४३८०

सोलापूर : ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, डफरीन चौक, सोलापूर. ☎ २५७८२

सातारा : सौ. सुषमा हाडप, साकेत, एल.आय.सी. कॉलनी, शाहुपुरी बसस्टँड जवळ, सातारा. ☎ ३१००२

सांगली : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२, गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली.

कोल्हापूर : डॉ. शुभांगी कुलकर्णी (सोलापूरकर), आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ २१५३४

नाशिक : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम,श्रीरामवाडी,म.गांधी रोड, नाशिक ☎ ७४८३०

ठाणे : डॉ. अजित दातार, बी-२०, अहिल्या सोसा., घंटाळी रोड, घंटाळी मंदिराजवळ, ठाणे (प.) ☎ ५३९१०८७.

डोंबिवली : श्री. दीपक वसंत नामजोशी, १३ कौस्तुभ सह. संस्था, सावरकर पथ, डोंबिवली (पू.)

पनवेल : सौ. मेधा मयुरेश सोहोनी, पी एल-६-१३-६ सेक्टर १७ सिडको कॉलनी, अभ्युदय बँकेमागे, नवीन पनवेल.

रत्नागिरी : कु.नीता अ.श्रीखंडे, २९२३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागिरी. ☎ २२४८७.

धुळे : सौ.उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूड बाग, धुळे ☎ २३४८७.

चाळीसगाव : कु. प्रणव महाजन, दिलीप गॅस एजन्सीजवळ, स्टेशन रोड, चाळीसगाव. ☎ २४६२

लातूर : सौ. रजनी वैद्य, 'रुपाली',आंबेजोगाई रोड,एस.टी.वर्कशॉपसमोर,लातूर. ☎ ४२५२८.

परभणी : श्री. दिलीप राके. 'पारस' नाथनगर, परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी.

या कार्यालयांमध्ये मासिकाची वर्गणी भरून सभासद होता येईल.ज्ञान प्रबोधिनी व छात्र प्रबोधन द्वारा प्रकाशित विविध पुस्तके या कार्यालयांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहेत.छात्र प्रबोधन साठी आपले लेखनसाहित्य या केंद्रावर आपण हस्ते देऊ शकाल.तेथून ते पुण्याला पाठविले जाईल.छात्र प्रबोधनद्वारा आयोजित विविध शिबिरांची व उपक्रमांची माहिती व नावनोंदणी येथे करता येईल.

हे मासिक 'ज्ञान प्रबोधिनी'या संस्थेच्या मालकीचे असून सौर २५ चैत्र शके १९१७ (१५ एप्रिल १९९५) या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस, येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले आहे.

भारतीय सौर दिनदर्शिका

विक्रम संवत् २०५१-५२ शके १९१७ इसवी सन १९९५-९६

वार	चैत्र	Mar.	वैशाख	Apr.	ज्येष्ठ	May	आषाढ	June	श्रावण	July	भाद्रपद	Aug.	आश्विन	Sept.	कार्तिक	Oct.	मार्गशीर्ष	Nov.	पौष	Dec.	माघ	Jan.	फाल्गुन	Feb.
सोम					१	22									१	23								
मंगळ					२	23									२	24							१	20
बुध	१	22			३	24					१	23			३	25	१	22					२	21
गुरु	२	23			४	25	१	22			२	24			४	26	२	23					३	22
शुक्र	३	24	१	21	५	26	२	23			३	25			५	27	३	24	१	22			४	23
शनि	४	25	२	22	६	27	३	24			४	26	१	23	६	28	४	25	२	23			५	24
रवि	५	26	३	23	७	28	४	25	१	23	५	27	२	24	७	29	५	26	३	24	१	21	६	25
सोम	६	27	४	24	८	29	५	26	२	24	६	28	३	25	८	30	६	27	४	25	२	22	७	26
मंगळ	७	28	५	25	९	30	६	27	३	25	७	29	४	26	९	31	७	28	५	26	३	23	८	27
बुध	८	29	६	26	१०	31	७	28	४	26	८	30	५	27	१०	1Sep	८	29	६	27	४	24	९	28
गुरु	९	30	७	27	११	1Jun	८	29	५	27	९	31	६	28	११	2	९	30	७	28	५	25	१०	29
शुक्र	१०	31	८	28	१२	2	९	30	६	28	१०	1Aug	७	29	१२	3	१०	1Dec	८	29	६	26	११	1Mar
शनि	११	1Apr	९	29	१३	3	१०	1Jul	७	29	११	2	८	30	१३	4	११	2	९	30	७	27	१२	2
रवि	१२	2	१०	30	१४	4	११	2	८	30	१२	3	९	1Oct	१४	5	१२	3	१०	31	८	28	१३	3
सोम	१३	3	११	1May	१५	5	१२	3	९	31	१३	4	१०	2	१५	6	१३	4	११	1Jan	९	29	१४	4
मंगळ	१४	4	१२	2	१६	6	१३	4	१०	1Aug	१४	5	११	3	१६	7	१४	5	१२	2	१०	30	१५	5
बुध	१५	5	१३	3	१७	7	१४	5	११	2	१५	6	१२	4	१७	8	१५	6	१३	3	११	31	१६	6
गुरु	१६	6	१४	4	१८	8	१५	6	१२	3	१६	7	१३	5	१८	9	१६	7	१४	4	१२	1Feb	१७	7
शुक्र	१७	7	१५	5	१९	9	१६	7	१३	4	१७	8	१४	6	१९	10	१७	8	१५	5	१३	2	१८	8
शनि	१८	8	१६	6	२०	10	१७	8	१४	5	१८	9	१५	7	२०	11	१८	9	१६	6	१४	3	१९	9
रवि	१९	9	१७	7	२१	11	१८	9	१५	6	१९	10	१६	8	२१	12	१९	10	१७	7	१५	4	२०	10
सोम	२०	10	१८	8	२२	12	१९	10	१६	7	२०	11	१७	9	२२	13	२०	11	१८	8	१६	5	२१	11
मंगळ	२१	11	१९	9	२३	13	२०	11	१७	8	२१	12	१८	10	२३	14	२१	12	१९	9	१७	6	२२	12
बुध	२२	12	२०	10	२४	14	२१	12	१८	9	२२	13	१९	11	२४	15	२२	13	२०	10	१८	7	२३	13
गुरु	२३	13	२१	11	२५	15	२२	13	१९	10	२३	14	२०	12	२५	16	२३	14	२१	11	१९	8	२४	14
शुक्र	२४	14	२२	12	२६	16	२३	14	२०	11	२४	15	२१	13	२६	17	२४	15	२२	12	२०	9	२५	15
शनि	२५	15	२३	13	२७	17	२४	15	२१	12	२५	16	२२	14	२७	18	२५	16	२३	13	२१	10	२६	16
रवि	२६	16	२४	14	२८	18	२५	16	२२	13	२६	17	२३	15	२८	19	२६	17	२४	14	२२	11	२७	17
सोम	२७	17	२५	15	२९	19	२६	17	२३	14	२७	18	२४	16	२९	20	२७	18	२५	15	२३	12	२८	18
मंगळ	२८	18	२६	16	३०	20	२७	18	२४	15	२८	19	२५	17	३०	21	२८	19	२६	16	२४	13	२९	19
बुध	२९	19	२७	17	३१	21	२८	19	२५	16	२९	20	२६	18			२९	20	२७	17	२५	14	३०	20
गुरु	३०	20	२८	18			२९	20	२६	17	३०	21	२७	19			३०	21	२८	18	२६	15		
शुक्र			२९	19			३०	21	२७	18	३१	22	२८	20					२९	19	२७	16		
शनि			३०	20			३१	22	२८	19			२९	21					३०	20	२८	17		
रवि			३१	21					२९	20			३०	22							२९	18		
सोम									३०	21											३०	19		
मंगळ									३१	22														

छात्र प्रबोधन ..... ज्ञान प्रबोधिनीद्वारा कुमारांसाठीचे अभिनव मासिक !

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन - PNCW/349 तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

उजळवू या नभाला



विश्वास हा मनीचा सांवू उभ्या जगाला
आम्ही रवी उद्याचे, उजळवू या नभाला ॥

अन्याय, भ्रष्टतेला अमुच्या जगी न थारा
जे जे अनाथ त्यांना पंखात घ्या निवारा
जाणून मंत्र घेऊ दध्या ऋषीवरांचा
देवत्व त्यात पाहू जो दीन गांजलेला ॥

उधळून मेघ टाकू जलहीन गर्जणारे
घडवू सशक्त बाहू अविराम कष्टणारे
हा कोण? जात कुठली? खोडून छाप सारे
स्नेहार्द्र साद घालू साऱ्याच बांधवांना ॥

उन्मत्त शाक कधि ना ढळवेल निश्चयाला
भूलवील ना धनाची राशी समर्पणाला
वज्रास भेदणारी उभवू अभिन्न हृदये
सामर्थ्य मेळवू या काळास जिंकण्याला ॥

विज्ञान ज्ञान सरितेचा साधून तोल न[illegible]
नवनिर्मितीस लागू समरूपात ठेवू आ[illegible]
चारित्र्य शुद्ध भावा फुलवून अंतरंगी
सुकुमार सु-मने ही अर्पून मातृभूला ॥

संपर्क पत्ता

संपादक, छात्र प्रबोधन,
ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
☎ ४७७६९१

कार्यालयाची वेळ : स. १० ते संध्या ७.
वार्षिक वर्गणी : रुपये ७५/- फक्त.
या अंकाची किंमत रु. १२/- फक्त.
प्रकाशन दिनांक : सौर २५ चैत्र, शके १९१७
१५ एप्रिल १९९५